म. ग्रं. सं. ठाणें

सन

विषय

लेखक गोविंद शंकर

ग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

Sāva

BOMBAY:
PRINTED AT THE "NIRNAYA-SAGARA" PRESS.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# पञ्चतन्त्रसार.

अथवा

# विष्णुशर्मनीतिकथा.

हें पुस्तक

गोविन्द शङ्कर शास्त्री बापट

ह्यांनीं लिहिलें.

आवृत्ति दुसरी.—२,००० प्रती.

याची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली असे.

मुंबई,

गवर्नमेंत सेंत्रल बुकदिपो.

सन १८८९ इ०.

ह्या ग्रंथासंबंधी सर्व अधिकार सरकारानें आपलेकडे ठेविले आहेत.

किंमत ८ आणे.

यन्नवे भाजने लग्नः संस्कारो नान्यथा भवेत् ॥
कथाछलेन बालानां नीतिस्तदिह कथ्यते ॥

विष्णुशर्मा.

---

मुंबईमध्यें :
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

प्राचीनकाळीं आपला भरतखंडदेश इतर देशांपेक्षां विद्याकलादिकांनीं श्रेष्ठ होता, तेव्हां त्यांतील अनेक विद्या व कला इतर देशच्या लोकांनीं आपल्या देशांत नेल्या. जगाची स्थिति चक्रगतीप्रमाणें आहे. जो भाग वर असतो, तोच क्षणमात्रेंकरून खालीं जातो. त्याचप्रमाणें जो मनुष्य राव असतो तो रंक होतो. सावकार असतो तो कुळ होतो. तसेंच जो देश परदेशांस जिंकून त्यांतील लोकांस विद्याज्ञानसंपन्न करितो, तोच कालांतरानें नीच स्थितीस येऊन जिंकिला जातो, आणि त्यांतील लोकांस दुसऱ्यांपासून ज्ञान प्राप्त करून घेण्याची वेळ येते. इतिहास पाहिला असतां या गोष्टीचीं अनेक उदाहरणें सांपडतील, त्यांतीलच आपला देश हें एक होय. 'सांगे वडिलांची कीर्ति, तो एक मूर्ख.' या रामदासांच्या वचनाप्रमाणें पूर्वज मोठे होते म्हणून आपणास मोठेपणा घेणें हा मूर्खपणा आहे. तथापि आपणास जी एकादी वस्तु प्राप्त झाली ती पूर्वीं आपलीच असून नाहींशी झाली होती ती पुनः सांपडली असें कळल्यामुळें मनुष्यास आनंद होणें हें स्वाभाविक आहे. शेंकडों वर्षांपूर्वीं, ग्रीस देशांतील महापंडित जो इसाप् त्यानें ज्या नीतिपर पशुपक्ष्यांच्या गोष्टी लिहिल्या त्या तेव्हांपासून आजपर्यंत सर्व युरोपखंडभर अत्यंत लोकप्रिय झाल्या आहेत. ग्रीस देशाचें वैभव, रोमनलोकांचें सार्वभौमत्व, हीं रसातळास गेलीं तरी इसापाच्या ज्ञानसूर्याचे किरण आहेत तसे उज्वलित आहेत. काय हा ज्ञानाचा महिमा! युरोपांतील सर्व भाषांत इसापाच्या गोष्टींचें भाषांतर होऊन कोट्यावधि लोकांच्या मनांस त्यांच्या वाचनापासून किती आनंद झाला असेल! आपणास या गोष्टी राज्यकर्त्यांच्या द्वारें प्राप्त झाल्या. परंतु प्राचीनकाळीं या गोष्टी आपल्या देशांतील पंडितमुकुटमणि विष्णुशर्मा यानें लिहिलेल्या सर्वमान्य पंचतंत्र ग्रंथावरून इतर देशांत गेल्या हें फार थो-

ह्यांसच प्रचलित असेल. या गोष्टी प्रथमतः हिंदुस्थानांतून आरबस्थानांत जाऊन तेथून ग्रीस देशांत गेल्या असाव्या, असा विद्वानांचा तर्क आहे. जें ज्ञान आपल्या देशांतून फार लांब जाऊन व अनेक रूपांतरें पावून आपणास प्राप्त झालें, तें आपल्या पंडिताच्या ग्रंथावरून देशबांधवांस साक्षात् प्राप्त व्हावें, या हेतूनें पंचतंत्र ग्रंथांतून निवडक गोष्टी घेऊन 'इसापनीती'च्या नमुन्यावर हें पुस्तक लिहून इसापाप्रमाणेंच आपल्या पंडिताचें नांव चालावें, म्हणून यास विष्णुशर्मनीतिकथा हें नांव दिलें आहे. परमेश्वरकृपेनें हें पुस्तक प्रसिद्ध होऊन तरुणवाचकांच्या मनावर नीति संस्कार करो.

मुंबई, एल्फिस्टन हैस्कुल.
नोव्हेंबर १८८८.

गो. शं. शा. वा.

४

# अनुक्रमणिका.

17/4/1957


| गोष्ट. | | पान. |
|---|---|---|
| १ | खुंटी उपटणारा वानर | १ |
| २ | कोल्हा आणि नौबत | १ |
| ३ | कावळा आणि साप | २ |
| ४ | बगळा आणि खेंकडा | ३ |
| ५ | सिंह आणि ससा | ५ |
| ६ | ऊ आणि ढेंकूण | ८ |
| ७ | कोल्हा आणि पशु | ९ |
| ८ | सिंह आणि उंट | १० |
| ९ | टिटवी आणि समुद्र | १४ |
| १० | कासव आणि हंस | १८ |
| ११ | तीन मासे | १९ |
| १२ | चिमणी आणि हत्ती | २० |
| १३ | वानर आणि पक्षी | २२ |
| १४ | चिमणी आणि वानर | २३ |
| १५ | धर्मबुद्धि आणि पापबुद्धि | २४ |
| १६ | बगळे आणि खेंकडा | २७ |
| १७ | जशास तसें | २७ |
| १८ | राजा आणि माकड | २९ |
| १९ | शहाणा चोर | ३० |
| २० | लोभी कोल्हा | ३१ |
| २१ | प्रधान आणि हुजऱ्या | ३२ |
| २२ | बैल आणि कोल्हा | ३५ |
| २३ | हत्ती आणि ससा | ३७ |
| २४ | चिमणा आणि कवडा | ३८ |
| २५ | तीन ठक | ४० |
| २६ | सिंह आणि कोल्हा | ४२ |
| २७ | बेडुक आणि साप | ४३ |
| २८ | कोल्हा, सिंह आणि गाढव | ४६ |

| | गोष्ट. | पान. |
|---|---|---|
| २९ | राजा आणि कुंभार ... ... ... ... ... | ४८ |
| ३० | सिंह आणि कोल्ह्याचें पिलूं ... ... ... ... | ५० |
| ३१ | वाघाचें कातडें पांघरलेला गाढव ... ... ... | ५१ |
| ३२ | चार जांवई ... ... ... ... ... ... | ५२ |
| ३३ | म्हातारा नवरा ... ... ... ... ... | ५३ |
| ३४ | जारिणी आणि कोल्ही ... ... ... ... | ५४ |
| ३५ | शहाणा कोल्हा ... ... ... ... ... | ५६ |
| ३६ | कुत्रा आणि परदेश ... ... ... ... ... | ५८ |
| ३७ | मुंगुस आणि पोर ... ... ... ... ... | ५८ |
| ३८ | बुद्धि आणि विद्या ... ... ... ... ... | ६० |
| ३९ | विद्या आणि व्यवहारज्ञान ... ... ... ... | ६१ |
| ४० | कोल्हा आणि गाढव ... ... ... ... | ६३ |
| ४१ | यक्ष आणि कोष्टी ... ... ... ... ... | ६५ |
| ४२ | दोन मासे आणि बेडुक ... ... ... ... | ६७ |
| ४३ | मनोरथ ... ... ... ... ... ... | ६८ |
| ४४ | ब्राह्मण आणि वाघ ... ... ... ... ... | ६९ |
| ४५ | हरिण, कावळा आणि कोल्हा ... ... ... | ७० |
| ४६ | न्हावीण आणि कोष्टीण ... ... ... ... | ७३ |
| ४७ | गृध्र आणि बोका ... ... ... ... ... | ७७ |
| ४८ | हत्ती आणि कोल्हा ... ... ... ... ... | ७८ |
| ४९ | कुत्रा आणि गाढव ... ... ... ... ... | ७९ |
| ५० | सिंह आणि मांजर ... ... ... ... ... | ८० |
| ५१ | साप आणि बेडुक ... ... ... ... ... | ८१ |
| ५२ | म्हातारी आणि राक्षस ... ... ... ... | ८२ |
| ५३ | हंस आणि कावळा ... ... ... ... ... | ८३ |
| ५४ | ऋषी आणि उंदीर ... ... ... ... ... | ८४ |
| ५५ | न्हावी आणि बैरागी... ... ... ... ... | ८५ |
| ५६ | वानर आणि मगर ... ... ... ... ... | ८७ |
| ५७ | कावळे आणि घुबड ... ... ... ... ... | ९३ |
| ५८ | सिंह आणि बैल ... ... ... ... ... | १०७ |
| ५९ | कावळा, उंदीर, कांसव आणि हरिण ... ... | १२२ |

# विष्णुशर्मनीतिकथा.

## गोष्ट १.

### खुंटी उपटणारा वानर.

एका शहराच्या बाहेरच्या बाजूस एक वाणी देऊळ बांधीत होता. तेथें कारखान्यावरचे सुतार वगैरे कामगार दुपारच्या वेळीं जेवावयास घरीं जात. एके दिवशीं ते गेल्यावर वानरांचा कळप तेथें आला. सर्व वानर झाडांच्या खांद्या, घरें वगैरे यांवर उड्या मारून खेळूं लागले. तेथें अरेकसांनीं एक लांकूड अर्धेच चिरून आंत पुनः करवत घालण्यास अडचण पडूं नये ह्मणून मध्यें खुंटी घालून ठेविलें होतें. एका वानराचा मृत्यु जवळ आला होता, तो त्या लांकडावर जाऊन बसला. वानराची जात स्वभावतः चपळ व खोडकर असते, त्यामुळें तो ती खुंटी धरून बाहेर काढूं लागला, तेव्हां ती खुंटी पट्‌दिशीं बाहेर निघाल्यामुळें वानराचा वृषण आंत चिरडून तो मरून गेला.

#### तात्पर्य.

ज्या कामाची आपणास माहिती नाहीं, त्यांत हात घालूं नये. घातला तर विचारपूर्वक घालावा; नाहीं तर नाश होतो.

---

## गोष्ट २.

### कोल्हा आणि नौबत.

एका रानांत एका मैदानावर कांहीं दिवसांपूर्वी मोठी लढाई झाली होती. तेथें सैन्यांतील एक नौबत एका झाडाखालीं राहिली होती. त्या झाडावर वेली लोंबत होत्या, त्या वाऱ्यानें हालूं लागल्या म्हणजे नौबतीवर आपटत त्यामुळें ती वाजे. एके दिवशीं एका कोल्ह्यानें तो आवाज ऐकिला तेव्हां तो भिऊन ह्मणाला, मेलोंरे मेलों. नंतर, आवाज ज्यानें केला त्याच्या दृष्टीस न पडतां तो दूर पळून गेला आणि विचार करून म्हणाला, "पण हें आपलें वडिलोपार्जित अरण्य एकदम सोडून जाणें ठीक नाहीं. कारण भय, हर्ष, हीं प्राप्त

झाली तर विचार करून काय करणें तें करावें, एकदम करूं नये, म्हणजे पश्चात्ताप होत नाहीं. तर हा आवाज कोणीं केला याचा शोध करावा;" असा विचार करून हळुहळू पुढें गेला, तेव्हां नौबत त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां जवळ जाऊन आपण ती मौजेनें वाजवूं लागला. नौबतीवरचें कातडें पाहून त्याला वाटलें, यांत पुष्कळ रक्तमांस भरलेलें असेल तें खाण्यास सांपडल्यानें आपली चंगळ होईल. असें मनांत आणून तें जाड कातडें मोठ्या कष्टानें फाडून आंत शिरून पाहतो तों कांहीं नाहीं, सर्व पोकळ. कातडें चावतांना दांत मात्र पडले.

### तात्पर्य.

बाहेरच्या डौलावरून खरी परीक्षा होत नाहीं. खरी परीक्षा झाल्याशिवाय कोणाचा आश्रय अथवा संगति धरली तर हानि होते.

---

## गोष्ट २.

### कावळा आणि साप.

एका मोठ्या वृक्षावर कावळ्याचें जोडपें रहात होतें. त्या झाडाच्या ढोलींत एक मोठा कृष्णसर्प होता, तो कावळीनें अंडीं घातलीं म्हणजे लागलींच तीं खाऊन टाकीत असे, त्यामुळें त्यांस फार दुःख होई. त्या झाडाखालीं एक कोल्हा रहात होता; तो कावळ्याचा मित्र होता. त्यास त्यांनीं विचारलें, मित्रा, हा दुष्ट साप ढोलींतून येऊन अंडीं खातो याला काय करावें? कांहीं तरी उपाय सांग. कदाचित् हा आम्हांला देखील खाऊन टाकील. घरांत साप असल्यावर सुख कोठून होणार? कोल्हा म्हणाला, भिऊं नका. त्याला युक्तीनें मारितां येईल. शत्रूचा युक्तीनें ज्याप्रमाणें नाश करितां येतो त्याप्रमाणें शस्त्रानेंही करितां येत नाहीं. कावळा ह्मणाला, बरें तर कोणती युक्ति योजावी ती सांग. कोल्हा म्हणाला, तू नगरांतील राजवाड्यांत जा आणि तेथें कोणाचा हार वगैरे कांहीं अलंकार सांपडेल तो आणून सापाच्या ढोलीजवळ ठेव म्हणजे साप मेला म्हणून समज. हें ऐकतांच कावळा आणि कावळी हीं दोघेंही उडून नगराजवळच्या नदीवर गेलीं. तेथें राजाच्या स्त्रिया अंगावरील वस्त्रालं-

कार काढून तीरावर ठेवून नदीमध्यें स्नान करीत होत्या. इतक्यांत रखवालदारांचा डोळा चुकवून कावळी त्यांतला हार चोंचींत धरून आपल्या घरट्याकडे घेऊन चालली. हें पाहून रखवालदार दांडकीं घेऊन तिच्यामागें धांवले. सापाच्या ढोलींत हार फेंकून कावळी दूर गेली. लोक ढोलीजवळ जाऊन पहातात तों आंत साप त्यांच्या दृष्टीस पडला. त्यास सोडग्यांनीं मारून हार घेऊन ते परत गेले. मग कावळा आणि कावळी हीं उभयतां सुखानें नांदूं लागलीं.

### तात्पर्य.

युक्तीनें मोठ्या बलाढ्य शत्रूचा देखील नाश करितां येतो.

---

## गोष्ट ४.

### बगळा आणि खेंकडा.

एके ठिकाणीं मोठें सरोवर होतें, त्यांत नानाप्रकारचे जलचर रहात असत. तेथें एक बगळा होता. तो म्हातारा झाल्यामुळें त्यास पाण्यांत जाऊन मासे मारण्याची शक्ति नाहींशी झाली. तेव्हां क्षुधेनें व्याकुळ होऊन तीरावर तो मोठ्यानें रडत बसला. तें पाहून एका खेंकड्यास फार वाईट वाटलें. तो त्या बगळ्यास ह्मणाला, 'मामा, आज कांहीं जेवणखाण करावयाचें नाहीं काय? उगाच रडत कां बसला आहेस?'

**बगळा**—मुला, तू बोलतोस तें खरें, पण आजपासून मासे खाणार नाहीं अशी मीं शपथ वाहिली आहे. यामुळें वाळून मरावें ह्मणून मी उगाच येथें बसलों आहें. मासे जवळ आले तरी मी त्यांस खात नाहीं. तें ऐकून खेंकडा ह्मणाला, असें वैराग्य उत्पन्न होण्याचें कारण काय?

**बगळा**—मी या सरोवराच्या कांठीं जन्मून लहानाचा मोठा झालों. पण आतां असें ऐकिलें कीं, लवकरच अवर्षण पडेल. एकसारखा बारा वर्षे पाऊस पडणार नाहीं.

**खेंकडा**—तुह्मीं हें वर्तमान कोठून ऐकिलें?

**बगळा**—जोशाच्या मुखांतून. बारा वर्षे अवर्षण होण्याचें

कारण असें कीं, शनि रोहिणीशकटभेद* करणार आहे. हें सरोवर आधींच आटलें आहे. त्यांत असें झालें तर अगदींच वाळून जाईल. मग अर्थातच ज्या प्राण्यांबरोबर मी लहानाचा मोठा झालों व खेळलों ते सर्व प्राणी मरून जातील. त्यांचा वियोग माझ्यानें सोसवणार नाहीं. याकरितां अगोदरच मरून जावें हें बरें असा निश्चय करून बसलों आहें. हल्लीं लहान लहान जलाशयांतील सर्व प्राणी मोठ्या जलाशयाकडे जात आहेत. या सरोवरांतील मात्र जलचर स्वस्थ निष्काळजी बसले आहेत, त्यामुळें मला फार रडूं येतें. कारण, या योगानें यांचा संहार होऊन नांव देखील रहाणार नाहीं.

हें बगळ्याचें भाषण ऐकून खेंकड्यानें तें सर्व जलचरांस कळविलें. तेव्हां मासे, कांसव वगैरे सर्व मिळून बगळ्याकडे आले आणि म्हणाले, मामा, या संकटांतून बचाव होण्याची कांहीं तोड आहे काय?

**बगळा**—येथून कांहीं अंतरावर कमलांनीं भरलेलें मोठें सरोवर आहे, तें चोवीस वर्षें अवर्षण झालें तरी आटावयाचें नाहीं. माझ्या पाठुंगळीस बसाल तर मी एकेकाला तेथें नेऊन सोडतों.

हें भाषण त्यांस खरें वाटून ते सगळे, मामा मला आधीं, मामा मला आधीं, असें म्हणत त्याच्या भोंवतालीं जमले. तेव्हां तो दुष्ट बगळा एकेकास पाठुंगळीस घेऊन कांहीं दूर जाऊन दगडावर आपटून खाऊन टाकी, आणि पुनः सरोवराजवळ परत येऊन घेऊन गेलेल्या जलचरांचे नानाप्रकारचे खोटे खोटे निरोप तेथील जलचरांस सांगून फसवीत असे. याप्रमाणें पुष्कळ दिवस त्याची चैन चालली होती. एके दिवशीं खेंकडा त्यास म्हणाला, मामा, पहिल्यानें माझें तुझें बोलणें झालें असून मला टाकून दुसऱ्यांलाच आधीं नेतोस. आज मला घेऊन जा. हें ऐकून बगळा मनांत म्हणाला, मासे खाऊन खाऊन माझें तोंड विटलें आहे. आतां या खेंकड्याला खाऊन तोंडपालट करावा. असें मनांत आणून त्यास पाठुंगळीस घेऊन तो त्या दगडाकडे चालला. कांहीं दूर गेल्यावर खेंकड्यास माशां-

---

* रोहिणीनक्षत्राच्या दोन तारा आहेत. त्यांमधून शनि हा ग्रह गेला म्हणजे त्यास रोहिणीशकटभेद म्हणतात. असें झालें म्हणजे बारा वर्षें अवर्षण होतें; असें वराहमिहिर म्हणून प्राचीन ज्योतिषशास्त्रवेत्ता होऊन गेला त्याचें मत आहे. याप्रमाणें अनुभव आला आहे असें म्हणतात.

च्या हाडांचा ढीग दुरून दिसला, तेव्हां तो बगळ्यास ह्मणाला, मामा, तें सरोवर अजून किती दूर आहे? माझ्या भारानें तू थकला असशील ह्मणून विचारितों. त्या मूर्ख बगळ्यास वाटलें हा जलचर आहे, याच्यानें आतां जमिनीवर कांहीं होणार नाहीं. यामुळें तो हंसून ह्मणाला, अरे खेंकड्या, कोठलें सरोवर आणि कोठलें काय, ही माझ्या पोटाची तजवीज. आतां देवाचें नांव घे. तुला या दगडावर आपटून खातों. असें ऐकल्याबरोबर खेंकड्यानें कमळाच्या देंठासारख्या त्याच्या नाजुक मानेला असा डांस मारला कीं, लागलाच तो मरून गेला.

नंतर तो खेंकडा बगळ्याचें मुंडकें घेऊन हळुहळू सरोवराकडे परत आला. तेव्हां जलचर ह्मणाले कां खेंकडेदादा, परत कां आलास? बरें खुशालना? मामा कोठें आहेत? बोल लवकर, आह्मांला घाई झाली आहे. हें ऐकून खेंकडा हंसून ह्मणाला, त्या लुच्चानें येथून नेलेल्या सर्व जलचरांस खाऊन टाकिलें. माझें आयुष्य संपलें नव्हतें ह्मणूनच मला त्या विश्वासघातक्याचा मतलब कळला, यामुळें त्याला मारून मीं त्याचें मुंडकें घेऊन आलों. आतां भिऊं नका. सर्व स्वस्थ रहा.

### तात्पर्य.

कपटी असतात त्यांनीं बाहेरून चांगल्या गोष्टी सांगितल्या तरी त्यांवर भरंवसा ठेवूं नये. ते कोणत्या रीतीनें आपला नाश करितील याचा नेम नाहीं. तसेंच पातक फार झाल्यावर पाप करणाऱ्याचा नाश झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

## गोष्ट ५.

## सिंह आणि ससा.

एका अरण्यांत भासुरक नांवाचा सिंह रहात असे. तो मदोन्मत्त होऊन अनेक पशूंस मारीत असे. हें पाहून एके दिवशीं त्या रानांतील हरिण, डुकर, टोणगे, ससे वगैरे सर्व पशु एके ठिकाणीं मिळून त्याकडे गेले आणि ह्मणाले, महाराज, तुह्मांस रोज एक पशु खाण्यास पुरतो. मग उगाच पुष्कळ पशु कशास मारितां? आजपासून आह्मी आपणाशीं ठराव करतों कीं, दररोज क्रमानें आपापल्या

जातींपैकीं एकेक पशू आपणास खाण्याकरितां आह्मी पाठवून देत जाऊं. असें केल्यानें आपला निर्वाह चालून आमचें निसंतान होणार नाहीं. प्रजेचें रक्षण करून तिजपासून थोडथोडा करभार घ्यावा, हा राजाचा धर्मच आहे. हें ऐकून सिंह म्हणाला, तुम्ही म्हणतां हें खरें आहे; परंतु कराराप्रमाणें जर रोज एक पशु आला नाहीं तर मी सर्वांस मारून टाकीन.

याप्रमाणें सिंहाशीं करार करून सर्व पशु निघून गेले, आणि दररोज प्रत्येक जातींपैकीं म्हातारा, दुःखानें त्रासलेला, निर्वंशी, असा कोणी तरी एक पशु कराराप्रमाणें त्याकडे ते पाठवूं लागले. एके दिवशीं एका म्हाताऱ्या सशावर पाळी आली. त्याच्या मनांत जावयाचें नव्हतें; तरी सर्वांनीं बलात्कारानें त्यास पाठवून दिलें. तो वाटेनें हळुहळू जात असतां सिंहास मारण्यास काय उपाय करावा, याचा विचार करूं लागला. इतक्यांत वाटेंत एक विहिर त्याच्या दृष्टीस पडली. त्या विहिरीजवळ जाऊन त्यानें आंत पाहिलें तेव्हां त्याचें प्रतिबिंब त्याच्या दृष्टीस पडलें. त्यावरून त्याला एक युक्ति सुचली. तो मनांत म्हणाला, हा चांगला उपाय आहे. सिंहाला राग आणून या विहिरींत उडी घालण्यास लावतों. नंतर तो मुद्दाम उशीर करून संध्याकाळच्या वेळेस भासुरकाजवळ जावयास निघाला. इकडे खाण्यास उशीर झाल्यामुळें भूक लागून रागानें सिंह दोन ओंठ चावून म्हणाला, उद्यां सगळ्याच पशूंची न्याहारी करून टाकितों. इतकें म्हणत आहे तोंच ससा तेथें जाऊन पोहोंचला आणि मुजरा करून पुढें उभा राहिला. त्यास शिव्या हांसडून सिंह म्हणाला, रे नीचा सशा, एक तर तू लहान आणि दुसरें उशीरानें आलास. याकरितां सध्यां तुझी चटणी करून सकाळीं सगळे पशु पार करून टाकीन.

**ससा**—महाराज, हा माझा अपराध आहे. इतर पशूंकडे कांहीं नाहीं. मी काय ह्मणतों तेवढें ऐका ह्मणजे झालें.

**सिंह**—बोल लवकर, आतां तोंडांत टाकितों.

**ससा**—अगोदरच सशाची जात लहान. एकानें आपली क्षुधा शांत होणार नाहीं असें समजून सर्व पशूंनीं आह्मां पांच सशांस पाठविलें होतें; परंतु वाटेंत एक मोठा सिंह गुहेंतून बाहेर आला आणि आम्हांस म्हणाला, कोठें चाललां रे ? आतां घ्या देवाचें नांव.

हें ऐकून मीं ह्मटलें, आम्ही कराराप्रमाणें भासुरक सिंह महाराजांकडे जात आहों. हें ऐकून तो ह्मणाला, सर्व पशूंनीं माझ्याशीं करार करून वागलें पाहिजे. या अरण्याचा राजा मी आहें. तो भासुरक चोर आहे. तो राजा आहे असें तुमचें ह्मणणें असेल तर चार असामी येथें ओलीस ठेवून एकानें त्याकडे जाऊन त्यास लवकर घेऊन यावें. आम्ही दोघे युद्ध करूं; त्यांत ज्याचा जय होईल तो राजा खरा; तो तुह्मा सर्वांस खाऊन टाकील. असें बोलून मला त्यानें आपणाकडे पाठविलें. हें मला उशीर लागण्याचें कारण. यापुढें महाराजांच्या मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें.

हें ऐकून सिंह ह्मणाला, तो चोर सिंह कोठें आहे? तो मला दाखीव. त्याचा आतांच नाश करून टाकितों. कारण असें केल्यावांचून आपलें राज्य सुरक्षित होणार नाहीं.

**ससा**—महाराज म्हणतात हेंच खरें आहे. शत्रूचा पराभव करून आपला मान राखिला पाहिजे. पण महाराज, तो किल्ल्यांत आहे. आमच्याकडे किल्ल्यांतूनच येऊन त्यानें आह्मांस अडविलें. किल्ल्यांत असलेल्या शत्रूचा पराजय करणें कठिण. किल्ल्यांत असलेला एकटा बाहेरच्या शंभरांस भारी होतो.

**भासुरक**—किल्ल्यांत कां असेना. दाखीव ह्मणजे झालें. एकदम ठार मारून टाकितों. रोगाची आणि शत्रूची उपेक्षा करितां कामा नये.

**ससा**—महाराज, गोष्ट खरी आहे; तरी त्याचें सामर्थ्य जाणल्याशिवाय अंगावर जाणें ठीक नाहीं.

**भासुरक**—कसेंही असो, त्याला दाखीव ह्मणजे झालें; आतां मारून टाकितों.

**ससा**—बरें आहे. चलावें.

असें म्हणून ससा पुढें चालूं लागला आणि त्या विहिरीजवळ आल्यावर भासुरकास ह्मणाला, महाराज, आपला प्रताप कोणाच्यानें सोसवणार आहे? आपणाला दुरून पाहतांच तो चोर सिंह किल्ल्यांत जाऊन लपला. आतां या माझ्या मागून. त्याला दाखवितों.

**भासुरक**—त्याचा किल्ला कोठें आहे? तो पाहूं दे तर खरा.

असें बोलल्यावर सशानें ती विहीर दाखविली. तेव्हां तींत आपलें प्रतिबिंब पाहून तो मूर्ख सिंह गर्जना करूं लागला. त्याबरोबर

दुप्पट मोठा प्रतिध्वनि त्या विहिरींतून बाहेर आला. तेव्हां आपला शत्रु दुसरा सिंह आंत आहे असें मानून रागानें चवताळून भासुरकानें आंत उडी टाकिली आणि बुडून मेला. तेव्हां सशानें सर्व पशूंचें कल्याण केल्यामुळें त्यांनीं त्याची मोठी वहावा केली.

### तात्पर्य.

बुद्धि हेंच मुख्य बल होय. ज्याला बुद्धि नाहीं, त्याच्या बलाचा काय उपयोग?

---

## गोष्ट ६.

### ऊ आणि ढेंकूण.

एका राजाच्या बिछान्यावरील पलंगपोसाच्या दुणींत एक मंदविसर्पिणी नांवाची ऊ रहात होती. ती राजाचें रक्त खाऊन स्वस्थ रहात असे. एके दिवशीं अग्निमुखनांवाचा ढेंकूण तेथें आला. त्यास पाहून ती ह्मणाली, अरे अग्निमुखा, येथें भलत्याच ठिकाणीं तू कशाकरितां आलास? बरें, आतां कोणीं पाहिलें नाहीं तोंच पोबारा कर. तो म्हणाला, काकू, घरीं पाहुणा आला म्हणजे तो हलका असला तरी त्याचा अव्हेर करूं नये. कोणी आला तरी तुम्ही कोण, कोठून आलां, बरें आहेना, असें विचारावें. मीं आजपर्यंत पुष्कळ माणसांचीं रक्तें खाल्लीं, तीं त्यांच्या आहाराप्रमाणें कडू, तिखट, खारट अशीं लागलीं. गोड रक्त मला अद्यापि खावयास मिळालें नाहीं. गोड गोड पदार्थ खाल्ल्यानें या राजाचें रक्त मिष्ट झालें असेल. तू कृपा करशील तर तें खाऊन जिभेची तृप्ति करीन. गोड खाण्याची आवड ही लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांस सारखीच आहे. मी आज तुझ्या घरीं पाहुणा आलों असून भुकेनें पीडलों आहें. तर त्वां मला आज जेऊं घालावें. राजाचें गोड गोड रक्त एकटीच खाऊं नको.

**मंदविसर्पिणी**—ढेंकूण बोवा, राजा निजला ह्मणजे मी त्याचें रक्त खातें. तुझें नांव अग्निमुख आणि तू जात्या मोठा चपळ. मजसारखें हळुहळू रक्त खाणें असेल तर थांब, जाऊं नको. मी सांगेन तेव्हां यथेच्छ रक्तपान कर.

**अग्निमुख**—बरें आहे. तू सांगतेस तसेंच करीन. तू राजाचें रक्त खाऊं लागल्याशिवाय त्याला शिवेन तर शपथ आहे.

असें त्यांचें बोलणें चाललें आहे तों राजा बिछान्यावर येऊन निजला. ढेंकणाच्या तोंडाला पाणी सुटलें होतें त्यामुळें राजास झोंप लागण्यापूर्वींच तो त्यास डसला. कारण कितीही उपदेश केला तरी मूळस्वभाव जावयाचा नाहीं. ढेंकूण चावल्याबरोबर सुई टोंचल्यासारखें होऊन राजा एकदम उठला आणि चाकरांस ह्मणाला, पहारे या पलंगपोसांत ढेंकूण, ऊ, कांहीं तरी आहे तें मला चावलें. चाकर लागलेच दिवा घेऊन पलंगपोसावर शोधूं लागले. इतक्यांत ढेंकूण जलदी करून पलंगाच्या गातांत शिरला. ऊ पलंगपोसाच्या दुणींत सांपडली तिला त्यांनीं मारून टाकिलें.

### तात्पर्य.

दुष्टाच्या संगतीनें सज्जनांचा नाश होतो. दुष्ट घरीं आला तरी त्यास जागा देऊं नये.

---

## गोष्ट ७.

### कोल्हा आणि पशु.

एका रानांत चंडरव नांवाचा कोल्हा रहात असे. एके दिवशीं फार भूक लागल्यामुळें तो कांहीं तरी चांगलें भक्ष्य मिळविण्याकरितां शहरांत शिरला. त्याला पाहून सगळे कुत्रे भोंकत त्याच्या पाठीस लागले. तेव्हां मरणाच्या भयानें तो एका घरांत शिरला. तें घर परटाचें होतें. तेथें निळीच्या रंगानें भरलेलें एक भांडें होतें; त्यांत तो कुत्रे पाठीस लागल्यामुळें घाबरून धांवत असतां पडला. त्यांतून बाहेर निघाला तों त्याचें सर्वांग निळें झालें. तेव्हां हा कोल्हा नाहीं असें समजून कुत्रे निघून गेले. तितक्यांत चंडरवही रानांत पळून गेला. पण त्याचा निळा वर्ण नाहींसा होईना. निळीचा रंग एकदा बसला ह्मणजे वज्रलेप होतो तो कधीं जावयाचा नाहीं. त्यास पाहून सिंह, वाघ, चित्ते, लांडगे वगैरे सर्व पशूंस वाटलें कीं, हा कोणी तरी नीलवर्णाचा अपूर्व पशु आला आहे. हा किती बलाढ्य आहे कोण जाणे. असें मानून ते सर्व भयानें पळून गेले; आणि एकमेकांस हा कोण आहे? असें विचारूं लागले. ते सर्व भ्याले असें पाहून चंडरव सर्वांस हाका मारून म्हणाला, पशु हो, मला पाहून भिऊन कां पळतां? भिऊं नका. मला ब्रह्मदेवानें सांगितलें कीं,

सध्यां श्वापदांना कोणी राजा नाहीं, याकरितां तुला श्वापदांचें राज्य दिलें आहे. सर्वांनीं स्वस्थ असावें. मी रक्षण करणारा असल्यावर तुह्मांस भिण्याचें कारण नाहीं. माझें नांव ककुद्रुमराजा. पृथ्वीवरील सर्व श्वापदांवर माझा अंमल आहे.

हें ऐकून सिंह, वाघ वगैरे सर्व पशु जवळ जाऊन, महाराज आज्ञा करा, असें ह्मणूं लागले. नंतर त्यानें सिंहास आपला प्रधान नेमिलें. वाघास खाजगीकडील कारभारी नेमिलें. चित्यास दरबारची व्यवस्था ठेवण्यास सांगितलें. लांडग्यास चोपदार नेमिलें. पण कोल्ह्यांबरोबर भाषण देखील करीना. त्यांना उलट्या गचांड्या देऊन त्यानें घालवून दिलें. याप्रमाणें व्यवस्था होऊन सिंहादि सर्व श्वापदें शिकार मारून त्यापुढें आणून ठेवीत. तोही ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें वांटून देई. याप्रमाणें चाललें असतां एके दिवशीं सर्व कोल्हे दूर जमून संध्याकाळच्या वेळेस 'कोल्हेकुई' करून ओरडूं लागले. त्यांचा शब्द ऐकून ककुद्रुमाच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले. तेव्हां देहभान विसरून तोही जातिस्वभावाप्रमाणें ओरडूं लागला. त्याचा शब्द ऐकून सिंहादिक सर्व श्वापदें लज्जेनें खालीं मान घालून परस्पर बोलूं लागलीं, काय हो, या लुच्चा कोल्ह्यानें आह्मांस फसविलें! मारा गुलामाला. हें ऐकतांच तोही पळूं लागला; परंतु श्वापदांनीं तत्काळ त्यास पकडून त्याचे तुकडे तुकडे करून टाकले.

### तात्पर्य.

जो मोठेपणाचें ढोंग माजवून आप्तांस घालवून मोठ्या लोकांमध्यें डौलानें वागूं लागतो, त्याचें तें ढोंग बाहेर पडतें, आणि फजिती होऊन नाश होतो. कांहीं केलें तरी मूळस्वभाव जावयाचा नाहीं.

---

## गोष्ट ८.

### सिंह आणि उंट.

एका अरण्यांत मदोत्कट नांवाचा सिंह रहात होता. वाघ, कावळा, आणि कोल्हा हे त्याचे कारभारी होते. एके दिवशीं कथनक नांवाचा एक उंट आपल्या कळपांतून चुकून रानांत एकीकडे राहिला. तो त्यांच्या दृष्टीस पडला. त्यास पाहून सिंह म्हणाला, काय

चमत्कारिक प्राणी आहे हा! चौकशी करा बरें, हा रानटी आहे किंवा गांवठी आहे. हें ऐकून कावळा ह्मणाला, महाराज, हा गांवठी पशु आहे. यास उंट असें म्हणतात. हा आपलें भक्ष्यच आहे. यास मारण्यास हरकत नाहीं.

**सिंह**—हा आमच्या राज्यांत आला आहे, याकरितां मी याला मारीत नाहीं. कारण विश्वासानें आपल्या घरीं शत्रु जरी आला तरी त्यास मारूं नये. याकरितां त्यास अभयवचन देऊन मजकडे आणा म्हणजे मी त्यास येथें येण्याचें कारण विचारीन.

या प्रकारें मदोत्कटाचें भाषण ऐकून सर्वांनीं त्या उंटास अभयवचन देऊन मदोत्कटाजवळ आणिलें. सिंहाजवळ आल्यावर त्यास मुजरा करून तो उभा राहिला. सिंहानें विचारल्यावर त्यानें आपली व कळपाची चुकामूक कशी पडली वगैरे सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून सिंह म्हणाला, अरे कथनका, आतां ओझीं वाहण्याचे कावाडकष्ट करण्यास गांवांत कशास जातोस? येथें पाचेसारखें हिरवेंगार कोवळें लुसलुशीत गवत खाऊन मजपाशीं स्वस्थ रहा. तुला कशाची काळजी नाहीं. उंटही बरें आहे असें ह्मणून तेथें राहिला आणि त्यांच्याबरोबर फिरूं लागला.

एके दिवशीं रानांतल्या हत्तीबरोबर मदोत्कटाचें युद्ध झालें. त्यांत हत्तीच्या दातांच्या जखमा लागून सिंह अगदीं घायाळ होऊन आजारी पडला. त्याच्यानें पाऊलभर देखील चालवेना. त्यामुळें खावयास न मिळाल्याकारणानें कावळा वगैरे त्याचे कारभारी भुकेनें पीडित झाले तेव्हां सिंह त्यांस म्हणाला, एकादी शिकार पहा. मी असा पडलों आहें तरी ती मारून तुह्मांस खावयास देतों. नंतर ते चारी असामी शिकार शोधण्याकरितां गेले, परंतु कोणतेंही जनावर दृष्टीस पडलें नाहीं. तेव्हां कोल्हा, कावळा आणि वाघ हे एकमेकांत मसलत करूं लागले.

**कोल्हा**—काऊ दादा, फार फिरून काय उपयोग? हा आपल्या महाराजांचा कथनक आहे कीं नाहीं, यासच मारवून खाण्याची तजवीज करावी.

**कावळा**—मित्रा, तू ह्मणतोस तें बरोबर आहे. पण महाराजांनीं त्याला अभयवचन दिलें आहेना?

**कोल्हा**—त्याला महाराजच मारतील अशी युक्ति करितों.

तुम्ही येथेंच बसा, मी घरीं जाऊन महाराजांना भेटून येतों.

असें म्हणून कोल्हा सिंहाजवळ गेला आणि म्हणाला, महाराज, सगळें रान धुंडून आलों, परंतु शिकार कोठें दृष्टीस पडत नाहीं. आतां काय करावें, पाऊलभरसुद्धां चालण्याची शक्ति नाहीं. महाराजांनाही पथ्यास कांहीं नाहीं. आज्ञा होईल तर आज कथनकाच्या मांसानें पथ्याची तजवीज करितों.

हें भयंकर क्रूर भाषण ऐकून रागावून सिंह म्हणाला, दुष्टा नीचा जर पुनः असें बोललास तर लागलींच तुला ठार करीन. त्याला मीं अभयवचन दिलें आहे, हें तुला ठाऊक नाहीं काय? हें ऐकून कोल्हा ह्मणाला, अभय देऊन आपण त्याला मारिलें तर दोष खरा. पण त्यानेंच भक्तीनें आपलें शरीर महाराजांस अर्पण केलें तर त्यांत कांहीं दोष होणार नाहीं. याकरितां त्यानें संतोषानें आपलें शरीर अर्पण केलें तर मारा, नाहीं तर आमच्यांपैकीं कोणा एकास तरी मारून पथ्याचें घ्यावें. दुखण्यांत उपासमारा झाला तर महाराजांच्या प्राणावर संकट येईल. महाराजांकरितां या आमच्या शरीराचा जर उपयोग झाला नाहीं तर हें बाळगून तरी काय करावयाचें? आपलें बरें वाईट झालें तर आह्मी जीवच ठेवणार नाहीं. आपल्याशिवाय आमचें उपजीवन कशानें होणार?

**मदोत्कट**—असें असेल तर तुह्मांस वाटेल तसें करा.

हें ऐकून कोल्हा परत जाऊन मंडळीस म्हणाला, अहो, महाराजांची अवस्था अति कठिण आहे. आतां हिंडून काय करितां? त्यांशिवाय आमचें रक्षण कोण करील? ते उपाशीं मरणार त्यापेक्षां आपला देह त्यांस अर्पण करून इतके दिवस त्यांचें अन्न खाल्लें, त्या ऋणांतून मुक्त होऊं. आपण जिवंत असून महाराजांस मरूं देणें हें फारच वाईट.

हें ऐकून सर्व कष्टी होऊन रडत ओरडत मदोत्कटाजवळ गेले, आणि मुजरा करून उगीच बसले. त्यांस पाहून मदोत्कट म्हणाला, एकादी शिकार आढळली काय? हें ऐकून कावळा ह्मणाला, महाराज, पुष्कळ हिंडलों पण एक देखील जनावर आढळलें नाहीं. आतां मला खाऊन महाराजांनीं आपलें उपजीवन करावें. असें केल्यानें महाराजांचें रक्षण होऊन मला स्वर्गप्राप्ति होईल. कारण धन्याकरितां प्राण सोडिला तर अक्षय स्वर्ग प्राप्त होतो असें म्हणतात.

कावळ्याचें भाषण ऐकून कोल्हा ह्मणाला, अरे, तुझें शरीर तें केवढें ? त्यानें होणार काय ? महाराजांची क्षुधा शांत न होतां तूमात्र प्राणास मुकशील. त्वां स्वामिभक्ति दाखविली, एवढ्यानेंच खाल्लेल्या अन्नाच्या ऋणांतून तू मुक्त झालास. तुझी इहपरलोकीं कीर्ति होईल. चल आतां एकीकडे, दूर हो. असें बोलून मदोत्कटास दंडवत घालून म्हणाला, महाराज, मला भक्षण करा. ह्मणजे इहलोकीं कीर्ति होऊन मला स्वर्गप्राप्ति होईल. आपल्या अन्नानेंच माझें शरीर वाढलें आहे; म्हणून तें आपण कारणीं लाविलें तर दोष लागणार नाहीं.

हें ऐकून वाघ म्हणाला, वा ! शाबास; चांगलें बोललास. परंतु तू देखील लहानच आहेस; म्हणून तुला मारून खाल्ल्यानें महाराजांची क्षुधा शांत होणार नाहीं. तुझ्या या बोलण्यानें तू मोठा कुलीन आहेस हें स्पष्ट दिसून येतें. राजे कुलीन चाकर बाळगितात ते एवढ्याचकरितां. कसाही प्रसंग आला तरी त्यांचा स्वभाव पालटत नाहीं. असो, आतां तू एकीकडे हो. मी प्रभुचरणांपाशीं प्रार्थना करितों. असें म्हणून वाघ पुढें झाला आणि मदोत्कटापुढें साष्टांग-नमस्कार घालून म्हणाला, महाराज, माझ्या शरीरानें आपलें प्राणरक्षण करावें, म्हणजे मला अक्षय स्वर्गवास घडेल, आणि या भूमंडळावर माझी कीर्ति पसरेल.

हें भाषण ऐकून कथनक मनांत ह्मणतो, या सर्वांनीं उत्तम भाषणें केलीं; परंतु स्वामींनीं कोणाचाही नाश केला नाहीं. तर मीही असें समयोचित आणि सुंदर भाषण करितों कीं, तें ऐकतांच सर्वजण माना डोलवितील. असा विचार करून तो म्हणाला, अहो, तुह्मी ह्मणता तें खरें; पण तुह्मी नखायुध आहां; याकरितां तुम्हांसही मारणें महाराजांस योग्य नाहीं. त्यापासून अपकीर्ति होऊन पातकही लागेल. आतां दूर व्हा, मला विनंति करूंद्या. असें बोलून कथनक मदोत्कटापुढें उभा राहून म्हणाला, महाराज, मी आपला भक्ष्यच आहें. मला खाऊन निर्वाह करावा. म्हणजे इहपरलोकीं माझी कीर्ति होईल. मोठमोठ्या पुण्यवानांस जें पद मिळत नाहीं, तें धन्याकरितां प्राण सोडणाऱ्या चाकरास मिळतें.

असें म्हटल्याबरोबर कोल्हा आणि वाघ यांनीं त्याच्या दोन्ही कुशी फाडिल्या, त्याबरोबर त्यानें प्राण सोडिला.

### तात्पर्य.

लुच्यांची चांडाळचौकडी जमली म्हणजे गोड बोलून ते कोणत्या रीतीनें घात करतील याचा नेम नाहीं, याकरितां त्यांच्या वाऱ्यास देखील उभें राहूं नये. तसेंच दुष्टांची कृपा असली तरी वेळ आल्यास ते नाश केल्याशिवाय रहाणार नाहींत.

---

## गोष्ट ९.

## टिटवी आणि समुद्र.

एके ठिकाणीं समुद्रकिनाऱ्यावर एक टिटवीचा जोडा रहात होता. कांहीं काळानें टिटवी गरोदर होऊन तिचा प्रसूत होण्याचा समय जवळ आला, तेव्हां ती टिटव्यास ह्मणाली, "प्राणनाथ, माझे दिवस भरत आले; याकरितां बाळंत होण्यास एकादी चांगली जागा शोधून काढा, म्हणजे मी तेथें अंडीं घालीन."

**टिटवा**—प्रिये, ही समुद्रकांठची जागा चांगली हवाशीर आहे, हीच बाळंतपणास चांगली आहे.

**टिटवी**—प्राणनाथ, येथें अंवसेपौर्णिमेस जोहारगतीच्या भरतीचें पाणी फार वाढतें. त्या वेळेस येथें हत्ती देखील बुडतात. याकरितां येथून दूर कोठें तरी जागा पहावी.

हें ऐकून टिटवा हंसून म्हणाला, प्रिये, तुला कांहीं समजत नाहीं. अंः, समुद्र म्हणजे काय पदार्थ आहे? माझीं अंडीं नेण्याची त्याची काय प्राज्ञा लागली आहे? तू स्वस्थपणें बाळंत हो. अंड्यांविषयीं कांहीं काळजी करूं नको. अशा प्रकारच्या यःकश्चित् भयानें जो आपली जागा सोडून जातो तो जन्मून तरी काय उपयोग? त्यापेक्षां त्याची आई वांझ असलेली बरी.

ही गर्वोक्ति ऐकून समुद्र मनांत म्हणाला, किड्यासारख्या एवढ्याशा पाखराला काय हा गर्व? आकाश* कोसळेल म्हणून टिटवी पाय वर करून निजते असें म्हणतात तें खरें आहे. जो तो आपल्या मनांत आपणास मोठें समजतो. याचीं अंडीं मुद्दाम नेऊन हा काय

---

* टिटवी हा पक्षी निजते वेळेस पाय वर करून निजतो. यावरून आकाश खालीं कोसळलें असतां सांवरून धरावें ह्मणून तो पाय वर करितो, अशी कवींनीं कल्पना बसविली आहे.

करितो ती मौज तर पाहूं. असा विचार करून समुद्र उगाच बसला.

कांहीं दिवसांनीं टिटवी प्रसूत झाल्यावर चारा आणण्यास बाहेर गेली असतां समुद्रानें भरतीच्या वेळीं वाहून तिचीं अंडीं नेलीं. कांहीं वेळानें टिटवी घरट्याजवळ येऊन पहाते तों अंडीं नाहींत. तेव्हां ती मोठ्यानें रडून आक्रोश करून विलाप करूं लागली; आणि रागानें नवऱ्यास ह्मणाली, "तुह्मांस तिळाइतकी देखील अक्कल नाहीं. मी मागेंच ह्मणत होतें कीं, समुद्र जवळ असल्यामुळें अंडीं वाहून जातील. दुसरीकडे लांब कोठें तरी जाऊं. गर्वानें हवी तशी बडबड करून माझें ऐकिलें नाहीं. नशीब फुटकें असलें ह्मणजे चांगलें सांगितलें तरी ऐकावेंसें वाटत नाहीं."

**टिटवा**—प्रिये, तू रागावूं नको. ज्यांच्या अंगांत सामर्थ्य आहे ते लहान असले तरी मोठ्यांची सुद्धां खोड मोडितात. आपणांपेक्षां बलाढ्य अशा शत्रूबरोबर स्पर्धा केली तर प्रतिष्ठा आहे. चंद्र पूर्ण असला तर राहु त्याला पीडा करितो. हत्ती मोठा थोरला लठ्ठ असतो आणि सिंह एवढासा असतो, तरी तो हत्तीच्या गंडस्थळावर उडी मारून बसतो. सूर्य नुकताच उगवला असला तरी पर्वतांच्या शिखरांवर किरण पाडितो. जन्मतः तेजस्वी आहे त्याच्या वयाची कोण चौकशी करितो? पहा, याच चोंचीनें समुद्राचें पाणी उपसून टाकून येथें मैदान करून टाकितों.

**टिटवी**—अहो, ज्यास भागीरथी हजार मुखांनीं मिळते, तशाच सिंधुनदीसारख्या मोठाल्या शेंकडों नद्या मिळतात, अशा समुद्रास जींत एक थेंबभर पाणीं मावतें अशा चोंचीनें कसें उपसून टाकणार? असें भलभलतेंच बोलून काय उपयोग?

**टिटवा**—धैर्य खचूं न देणें हेंच संपत्ति मिळविण्याचें मुख्य साधन होय. माझी चोंच लोखंडासारखी टणक आहे. दिवस व रात्रीही मोठाल्या आहेत. तर मग समुद्र कां उपसतां येणार नाहीं? पराक्रम केल्याशिवाय ऐश्वर्य कशानें प्राप्त होणार?

**टिटवी**—तुम्हांस समुद्राबरोबर वैरच करणें असेल तर दुसऱ्या पक्ष्यांची मदत तरी घ्या. गवताची काडी अगदीं निर्जीव असते, पण तसल्या काड्यांचें चऱ्हाट केलें ह्मणजे त्यानें हत्ती देखील बांधितां येतो. त्याप्रमाणें अशक्त असूनही पुष्कळ लोक असले तर त्यांचा मोड करणें कठिण पडतें.

**टिटवा**—प्रिये, तू ह्मणतेस तें खरें आहे. मित्रमंडळींची मदत घेऊन समुद्र सुकविण्याचें काम करितों. असा विचार करून बगळे, मोर, सारस वगैरे पक्ष्यांस बोलावून त्यांस तो ह्मणाला, मित्रहो, समुद्रानें माझीं अंडीं नेऊन मला फार दुःख दिलें आहे, याकरितां त्यास शोषून टाकण्याचा कांहीं तरी उपाय योजा.

हें ऐकून ते पक्षी म्हणाले, आमची शक्ति किती? उगाच समुद्रशोषणाचा व्यर्थ प्रयास करून काय उपयोग? बलवानाबरोबर अशक्तानें वैर मांडिलें तर अशक्ताचाच नाश होतो. याकरितां आपला राजा जो गरुड; त्याच्या कानावर ही सगळी हकीकत घालावी, म्हणजे आपल्या प्रजेला पीडा दिल्याबद्दल त्यास राग येऊन तो याची खोड मोडील. कदाचित् आपल्या विनंतीकडे त्यानें लक्ष्य दिलें नाहीं तर आपलें प्रारब्ध. पीडा झाली असतां धन्याला कळवून स्वस्थ बसावें एवढेंच आपलें काम आहे. याकरितां त्याकडे फिर्याद करण्यास जाऊं चला. तो आपला राजा आहे. तो या गोष्टीची कांहींतरी दाद घेईल.

याप्रमाणें विचार करून सर्व पक्षी तोंडें हिरमुसलेलीं करून डोळ्यांत आसवें आणून गरुडाजवळ गेले, आणि मोठ्यानें रडूं लागून म्हणाले, बुडालों हो सर्व बुडालों. आपण आमचे प्रभु असतां आज या बिचाऱ्या टिटव्याचीं अंडीं समुद्रानें नेलीं. तर आतां पक्ष्यांचें निसंतान होण्याची वेळ आली आहे. कारण तो आतां दुसऱ्या पक्ष्यांस तरी जिवंत कां ठेवील? अशा प्रसंगीं राजानेंच रक्षण केल्यास जीव वांचणार. या वेळेस राजाच आईबाप आहे. तसेंच प्रजा सुखी असली तरच राजाचें ऐश्वर्य, नाहीं तर राजास ऐश्वर्य कोठून प्राप्त होणार?

याप्रमाणें पक्ष्यांचें भाषण ऐकून गरुडास फार वाईट वाटलें. त्यास समुद्राचा मोठा राग आला. तो मनांत म्हणाला, पक्षी म्हणतात तें सर्व खरें आहे. आजच समुद्राला आटवून टाकलें पाहिजे. असा विचार करीत होता, इतक्यांत विष्णुदूत त्यास बोलावण्यास आला.

**विष्णुदूत**—गरुडा, भगवान् नारायणानें तुजकडे मला पाठविलें आहे. देवांचें जरुरीचें कांहीं काम आहे, त्याकरितां भगवानास अमरावतीस जावयाचें आहे, म्हणून तुला लवकर बोलाविलें आहे.

हें ऐकून गरुड रागानें म्हणाला, विष्णुदूता, भगवानास मजसार-

ह्या वाईट चाकराचा काय उपयोग ? याकरितां त्यास माझा नमस्कार सांगून सांग कीं, बसण्याकरितां माझ्या जागीं दुसऱ्या कोणाची तरी योजना करावी. आपले गुण ज्यास समजत नाहींत अशाची सेवा करणें म्हणजे खडकावर बीं टाकिल्याप्रमाणेंच आहे. अशाची चाकरी मुळींच पतकरूं नये हें चांगलें.

**विष्णुदूत**—गरुडा, आजपर्यंत नारायणास कधीं देखील त्वां असें उत्तर दिलें नाहीं. आतांच भगवानानें इतका राग येण्यासारखा असा तुझा कोणता अपराध केला. ?

**गरुड**—भगवानाचा आश्रित समुद्र. त्यानें आमच्या टिटव्याचीं अंडीं नेलीं. याकरितां भगवान् जर आज त्यास शिक्षा न करतील, तर मी त्याचा नोकर नाहीं. हा निश्चय टळणार नाहीं, असें तू लवकर परत जाऊन त्यांस कळीव.

गरुड रागावला आहे असें दूताच्या मुखानें ऐकून भगवान् म्हणाला, तो रागावला हें बरोबर आहे. आतां आपण स्वतः जाऊन त्यास समजावून घेऊन यावें. कारण तो विश्वासु, उपयुक्त, कुलीन असा चाकर आहे. त्याचा अपमान करूं नये. पुत्राप्रमाणें ह्याचें पालन केलें पाहिजे. धनी खुष झाला तर चाकराला बक्षीस देईल एवढेंच काय तें; पण चाकरास खुष टेविलें तर तो धन्याकरितां आपला प्राण देखील देईल. असा विचार करून भगवान् गरुडाच्या घरीं आला. आपल्या घरीं भगवान् आले असें पाहून गरुड लज्जेनें खालीं मान घालून नमस्कार करून म्हणाला, आपल्या आश्रयानें उन्मत्त झालेल्या समुद्रानें माझ्या प्रजेचीं अंडीं नेऊन माझा अपमान केला. मी त्याला आतां आटवून टाकीन. परंतु आपला अपमान होईल म्हणून भय वाटतें. कारण, म्हटलें आहे कीं, 'समर्था घरींचें श्वान, त्यासि सर्वही देती मान.' धन्याची अप्रतिष्ठा होईल किंवा त्याला वाईट वाटेल असें कर्म जीव गेला तरी करूं नये, म्हणून मी उगाच बसलों.

हें ऐकून नारायण म्हणाला, गरुडा, तू म्हणतोस तें सर्व खरें आहे. आश्रितानें गुन्हा केला म्हणजे धन्यास जशी लाज वाटते तशी आश्रितास देखील वाटत नाहीं. असो, ये, आतां समुद्रापासून अंडीं घेऊन टिटव्याला देऊं आणि अमरावतीस जाऊं. असें म्हणून समुद्राकडे गेला आणि हातांत धनुष्यबाण घेऊन त्याची निर्भर्त्सना करून

म्हणाला; दुष्टा, टिटव्याचीं अंडीं दे नाहीं तर आतांच शोषून तुझें मैदान करून टाकितों. हें ऐकून समुद्र फारच भ्याला; आणि त्यानें टिटव्यास लागलींच अंडीं परत दिलीं. तीं घेऊन टिटव्यानें आपल्या बायकोस दिलीं; त्यामुळें तिला मोठा आनंद झाला.

### तात्पर्य.

शत्रु क्षुल्लक आहे म्हणून बलवानानें त्यास उगाच त्रास देऊं नये. तो शहाणा असला तर कोणत्या रीतीनें खोड मोडील याचा नेम नाहीं. शत्रु मोठा असला आणि उगाच त्रास देईल, तर निमूटपणें सोसून न घेतां लोकांचें साहाय्य घेऊन त्याचें शासन करण्यास यत्न करावा. राजा चांगला असला तर त्यास दंड केल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

## गोष्ट १०.

### कांसव आणि हंस.

एका सरोवरांत कंबुग्रीव नांवाचा कांसव राहत असे. त्याचे संकट आणि विकट या नांवाचे दोन हंस मित्र होते. ते नेहमीं सरोवराच्या कांठीं येऊन कंबुग्रीवाबरोबर गोष्टी सांगून संध्याकाळीं आपल्या घरट्यांत जात. एके वर्षी पाऊस थोडा पडल्यामुळें पाणी आटून तळें सुकून गेलें. तेव्हां मित्राच्या संकटानें दुःखी होऊन हंस त्यास म्हणाले, मित्रा, आतां येथें शेवाळ मात्र उरलें आहे. पुढें तुझी काय अवस्था होणार, याची आम्हांस मोठी काळजी लागली आहे. हें ऐकून कंबुग्रीव म्हणाला, आतां पाणी नाहींसें झाल्यावर आमचें उपजीवन होणार नाहीं, तथापि कांहीं उपाय केला पाहिजे. कारण प्रसंग कठिण गुदरला तरी धैर्य सोडूं नये. धैर्य धरिल्यानें कदाचित् संकटांतून पार पडण्यास सांपडेल. समुद्रांत गलबत फुटलें तरी खलाशी जीव वांचविण्याचा यत्न करतोच. शहाणे असतात ते मित्रास आपत्ति प्राप्त झाली असतां ती दूर करण्याचा यत्न करितात. एकादें मोठें भरलेलें सरोवर पाहून या. नंतर एक दोरी किंवा काटुक घेऊन या. मी तें मध्यें तोंडांत धरिलें म्हणजे तुम्ही दोघेजण दोन टोकें उचलून मला त्या सरोवराकडे घेऊन जा.

**हंस**—मित्रा, आम्ही असें करितों; पण तू अगदीं मुकाट्यानें रहा. नाहीं तर काठीपासून सुटून खालीं पडशील.

वर सांगितल्याप्रमाणें हंस कांसवास घेऊन जात असतां मध्यें एक शहर लागलें, तेथील लोक हंसांकडे पाहून आश्चर्यानें बोलूं लागले. 'अहो पहा पहा, हें काय, चाकासारखें हे पक्षी घेऊन चालले आहेत?' हें ऐकून कंबुग्रीव म्हणाला, मित्रहो, खालीं कशाची गडबड आहे? असें म्हटल्याबरोबर खालीं पडला तेव्हां लोकांनीं लागलीच त्यास मारून टाकिलें.

### तात्पर्य.

जे हितेच्छु मित्राच्या सांगण्याप्रमाणें वागत नाहींत, त्यांचा नाश होतो. तसेंच जीभ स्वाधीन ठेवून अप्रासंगिक भाषण करूं नये. केल्यास नाश होतो.

---

## गोष्ट ११.

### तीन मासे.

एका सरोवरांत तीन मासे रहात होते. त्यांच्या वेगळाल्या स्वभावांवरून तिघांसही वेगळालीं नांवें पडलीं होतीं. एकाचें नांव अनागतविधाता[1], दुसऱ्याचें नांव प्रत्युत्पन्नमति[2] आणि तिसऱ्याचें नांव यद्भविष्य[3]. एके दिवशीं त्या तळ्याजवळून मासे मारणारे कोळी जात होते; ते म्हणाले, या सरोवरांत पुष्कळ मासे दिसतात. आजपर्यंत आम्हीं यांत कधीं जाळीं टाकिलीं नाहींत. आज दुसरीकडे बरेच मासे सांपडले असून आतां संध्याकाळही झाला आहे, तर उद्यां येथें खास येऊं. याप्रमाणें वज्रप्रहारासारखें तीक्ष्ण असें त्यांचें भाषण ऐकून अनागतविधाता सर्व माशांस जवळ हाका मारून म्हणाला, अहो, कोळी काय बोलले तें ऐकिलेंना? याकरितां जवळ एकादें तळें पाहून

---

१. संकट प्राप्त होण्यापूर्वीच त्याचें निवारण करण्याविषयीं उपाय योजणारा.

२. संकट आल्यावर उपाय करणारा.

३. संकट आलें असतांही जें होणें असेल तें होईल, असें ह्मणून स्वस्थ बसणारा.

रात्रीसच तेथें निघून जावें. कारण, बलाढ्य शत्रु आला म्हणजे पळून जावें हें चांगलें. सकाळींच येथें कोळी येऊन माशांचें निसंतान करणार त्यापेक्षां आतां येथें क्षणभर देखील रहाणें ठीक नाहीं. दुसरीकडे सुख होत असेल तर शहाण्यानें स्वदेशत्यागाचें दुःख करूं नये.

हें ऐकून प्रत्युत्पन्नमति म्हणाला, मित्रा, तू म्हणतोस तें खरें आहे; दुसरीकडे जावें असेंच मलाही वाटतें. दुसरीकडे जाण्याच्या भयानें जागच्या जागीं मरणें हा मूर्खपणा होय. दुसरीकडे जाऊन कल्याण होत असेल तर स्वदेशप्रीति धरून नाश कां करून घ्यावा? दुसरीकडे चांगलें गोडें पाणी मिळत असलें तरी, ही आमच्या बापाची विहीर, असें म्हणून खारेंच पाणी पिऊन रहावें काय?

वरील भाषण ऐकून यद्भविष्य मोठ्यानें हंसून म्हणाला, मित्र हो, ही तुमची मसलत मूर्खपणाची आहे. कोळी बोलले एवढ्यानेंच हें आपलें वडिलोपार्जित सरोवर टाकावें काय? जर आयुष्यच संपलें असलें तर दुसरीकडे गेल्यानें मृत्यु टळेल काय? दैव अनुकूल असलें म्हणजे संकट आलें तरी रक्षण होतें. दैव प्रतिकूल असलें म्हणजे कोठेंही असलें तरी नाश होतोच. याकरितां मी येत नाहीं. तुमची मर्जी असली तर तुम्ही जा.

याप्रमाणें त्याचा निश्चय पाहून, अनागतविधाता आणि प्रत्युत्पन्नमति हे दोघे आपापला परिवार घेऊन दुसरीकडे निघून गेले. नंतर सकाळच्या प्रहरीं कोळी संकेताप्रमाणें तेथें आले आणि जाळीं टाकून यद्भविष्य व दुसरे पुष्कळ मासे मारून घेऊन गेले.

### तात्पर्य.

पुढें विपत्ति यावयाची असली तर आधींच सावध होऊन ती येऊं देऊं नये हें उत्तम. निदान विपत्ति जवळ येऊन ठेपल्यावर तरी तींत सांपडण्यापूर्वी सुटून जाण्याचा यत्न करावा. जें होईल तें होईल असें म्हणून संकटकाळीं जो स्वस्थ बसतो त्याचा नाश होतो.

---

## गोष्ट १२.

## चिमणी आणि हत्ती.

एका वनांत ताडाच्या झाडावर चिमणीचें एक घरटें होतें. त्यांत

चिमणीचें जोडपें रहात असे. एके वेळीं चिमणीनें अंडीं घातलीं. तेथें एक माजलेला हत्ती ऊन लागल्यामुळें सावलीकरितां त्या झाडाखालीं आला. मस्तीमुळें त्यानें झाडाची एक झांवळी सोंडेनें मोडली. त्यामुळें चिमणीचीं सर्व अंडीं फुटून गेलीं. चिमणी देखील मरावयाचीच, पण आयुष्य भरलें नसल्यामुळें मोठ्या आयासानें ती वांचली. परंतु अंडीं फुटल्यामुळें ती एकसारखा विलाप करूं लागली. तेव्हां एक सुतारपक्षी तिचा मित्र होता; त्यास तिचा विलाप ऐकून फार दुःख झालें. तो तिला म्हणाला, चिमाबाई, उगाच विलाप करून काय उपयोग ? शहाण्यानें गतगोष्टीचा शोक करूं नये. अंडीं गेलीं तीं काय आतां परत मिळणार आहेत ? असा विलाप करून तू आपल्या जिवाला व्यर्थ इजामात्र करून घेशील. याकरितां रडूं नको.

**चिमणी**—बाबा, तू म्हणतोस तें खरें, परंतु त्या दुष्ट हत्तीनें मस्तीनें माझ्या अंड्यांचा नाश केला आहे; याकरितां तू आमचा खरा मित्र असशील तर, त्या मेल्याला ठार मारण्याचा कांहीं तरी उपाय कर; म्हणजे माझें दुःख कमी होईल. आपत्कालीं उपकार करील तोच खरा मित्र होय.

**सुतार**—बाई, म्हणतेस तें खरें. संकटकाळीं उपयोगीं पडेल तोच मित्र. असो, आतां माझी युक्ति तर पहा. वीणारवा नांवाची एक माशी माझी मैत्रीण आहे, तिला बोलावून आणितों ह्मणजे तो दुष्ट हत्ती मेला म्हणून समज.

नंतर तो चिमणीला बरोबर घेऊन माशीकडे गेला आणि म्हणाला, आका, ही चिमाताई माझी मैत्रीण आहे. एका दुष्ट हत्तीनें हिचीं अंडीं फोडून टाकिल्यामुळें हिला फार दुःख झालें आहे. त्याला मारण्याचा उपाय मी करणार आहें. मला मदत करशील काय ?

**माशी**—मित्रा, मदत करण्याचें विचारण्यास देखील नको. जर आपण दुसऱ्याच्या उपयोगीं पडलों नाहीं, तर आपल्या उपयोगीं कोण पडणार आहे ? मित्राचा मित्र तो आपलाच मित्र. मित्राप्रमाणें त्याचें हित केलें पाहिजे. बरी आठवण झाली. मेघनाद नांवाचा एक बेडूक माझा स्नेही आहे त्याचीही या कामीं मदत घेऊं. कारण अशा कामीं शहाण्याची मदत घेतली पाहिजे.

याप्रमाणें विचार करून त्या तिघांनीं झालेली सर्व हकीकत मेघ-

नादाजवळ सांगितली. तेव्हां तो ह्मणाला, अरे, यःकश्चित् हत्ती म्हणजे काय पदार्थ आहे? बुद्धिमानाला राग आला नाहीं तोंपर्यंत. माझी मसलत ऐका ह्मणजे झालें. दुपारच्या वेळीं माशीनें त्या हत्तीच्या कानाशीं जाऊन विण्यासारखा मंजूळ शब्द करावा. तो ऐकून आनंद झाला म्हणजे हत्ती डोळे मिटील. असें झालें म्हणजे सुतारानें जाऊन त्याचे डोळे फोडावे. डोळे फुटतांच तो आंधळा होऊन त्यास दिसेनासें होईल, आणि उन्हानें तापला म्हणजे पाण्याकरितां हिकडे तिकडे फिरूं लागेल. त्या वेळेस मी आपली मंडळी घेऊन एका मोठ्या खड्ड्याजवळ जाईन; आणि तेथें आम्ही सर्वजण डरांव् डरांव् करून ओरडूं लागूं. त्यामुळें त्याला वाटेल कीं, बेडूक ओरडतात तेथें मोठें पाण्याचें तळें आहे, असें समजून तो पाणी पिण्यास येईल, आणि लागलाच खड्ड्यांत पडून मरून जाईल. अशी मसलत केल्याशिवाय त्याचा नाश होणार नाहीं.

याप्रमाणें ठरल्यावर दुपारच्या वेळीं माशी हत्तीच्या कानाशीं गुणगुण शब्द करूं लागली, तेव्हां हत्तीस मंजूळ शब्द ऐकण्याची गोडी लागून त्यानें डोळे मिटले. इतक्यांत सुतारानें त्याचे डोळे फोडिले. त्यामुळें दिसत नाहींसें होऊन ताहानेनें व्याकुळ झाल्यामुळें तो इकडे तिकडे फिरूं लागला. तेव्हां बेडकांचें ओरडणें ऐकून तेथें तळें आहे, आपणास पाणी मिळेल असें वाटून तिकडे गेला तों खड्ड्यांत पडून मेला.

### तात्पर्य.

बलिष्ठानें उन्मत्त होऊन बुद्धिमान् अशक्त असला तरी त्यास पीडा देऊं नये. तो युक्तीच्या वाटेनें नाश कसा करील याचा नेम नाहीं.

---

## गोष्ट १३.

### वानर आणि पक्षी.

एका पर्वतावर वानरांचा कळप राहत होता. एके वर्षी हेमंत ऋतूंत फार थंडी पडली; आणि तशांत थोडासा पाऊसही पडला, त्यामुळें वानर कुडकुडूं लागले. तेथें कित्येक वानरांस एका झाडाखालीं गुंजा सांपडल्या, त्या विस्तवाच्या ठिणग्याच आहेत असें समजून खालींवर पातेरा घालून शेकोटी करण्याकरितां ते फुंकूं लागले. तेथें सूचिमुख नांवाचा एक पक्षी होता, तो वानरांचे हे व्यर्थ श्रम

पाहून म्हणाला, 'कायहो, तुम्ही सर्वच कसे मूर्ख झालां? या विस्तवाच्या ठिणग्या नव्हेत. त्यांसारखीं हीं फळें आहेत. यांस गुंजा असें म्हणतात. उगाच कां दमतां? यांच्या योगानें थंडी कमी होणार नाहीं. गुहावगैरे एकादी निवाऱ्याची जागा पहा. अजून पुष्कळ ढग येत आहेत.

हें ऐकून त्यांपैकीं एक म्हातारा वानर त्यास म्हणाला, बाबा, या गोष्टीची चौकशी करण्याची तुला काय गरज आहे? आपल्या वाटेनें चालता हो. आधींच आम्ही त्रासलों आहों, त्यांत तुझी बडबड नको. असें पुष्कळ वेळ सांगितलें तरी तो पक्षी थांबेना. उगाच व्यर्थ श्रम कां करितां? असें वारंवार म्हणे. एक वानर थंडीनें फार त्रासला होता, त्यास याच्या बडबडण्याचा फार कंटाळा आल्यामुळें त्यानें त्याचे दोन्ही पंख धरून त्यास दगडावर आपटिलें त्यामुळें तो मरून गेला.

### तात्पर्य.

टणक लांकूड लवावयाचें नाहीं, वस्तऱ्यानें दगड तुटावयाचा नाहीं, त्याप्रमाणेंच मूर्खाला उपदेश करून उपयोग नाहीं. उपदेश करणाऱ्यांचीच हानि होते. याकरितां योग्यायोग्य पाहिल्याशिवाय पाहिजे त्यास उपदेश करूं नये. सापाला दूध पाजिलें तर त्याच्या शरीरांत विष वाढणार. त्याप्रमाणेंच मूर्खाला उपदेश केला तर त्याचा कांहींएक उपयोग न होतां त्यास राग मात्र येतो.

---

## गोष्ट १४.

### चिमणी आणि वानर.

रानांत एका शमीच्या झाडावर एक चिमणी घरटें करून रहात होती. वर्षाकाळीं एके समयीं पाऊस पडूं लागला, त्यामुळें एका वानरास वाऱ्यानें व पावसानें फार थंडी लागून त्याची दांतखिळी वाजूं लागली; तेव्हां तो त्या शमीच्या झाडाखालीं येऊन बसला. त्याचें सर्वांग लटलटां कांपत आहे असें पाहून चिमणी म्हणाली, अरे तूं चांगला धट्टाकट्टा पुरुषासारखा पुरुष आहेस. देवानें हातपाय दिले आहेत, तर असा थंडीनें कां कुडकुडतोस? घर कां बांधित नाहींस?

हें ऐकून वानर रागावून म्हणाला, तुझ्यानें उगीच बसवत नाहीं

काय ? काय रांड दांडगी आहे. मला शहाणपण शिकविते ! रांडे नकट्ये, शहाणपणाचा व्यर्थ डौल घालून माझ्यापुढें बडबड करण्यास तुला लाज वाटत नाहीं काय ? दम खा, तुला ठार मारून टाकितों. गाढवी, तुलाग माझी काळजी कशाला ? जो विचारील त्याला सांगावें. ज्याला ऐकण्याची इच्छा नाहीं, त्याला सांगणें हें रानांत जाऊन रडण्यासारखेंच आहे. तू घरट्यांत बसली आहेस म्हणून तुला इतकी मस्ती आली आहे काय ? बरें आहे तर मग. असें म्हणून शमीच्या झाडावर चढून त्यानें त्या घरट्याचे तुकडे तुकडे करून टाकिले.

### तात्पर्य.

लठ्ठमारती, दांडगे असे असून सुस्त आळशी असतात त्यांस उद्योगी अशक्तानें उपदेश करून उपयोग नाहीं. ते रागावून अशक्ताचा नाश मात्र करतील.

---

## गोष्ट १५.

### धर्मबुद्धि आणि पापबुद्धि.

एका शहरांत धर्मबुद्धि आणि पापबुद्धि असे दोन मनुष्य राहत होते. त्या उभयतांचा अत्यंत स्नेह होता. एके समयीं पापबुद्धीनें विचार केला कीं, आपण तर अगदीं मूर्ख आणि दरिद्री आहों, याकारितां धर्मबुद्धीला बरोबर घेऊन देशांतरीं जावें, आणि त्याच्या आश्रयानें द्रव्य मिळवून त्याला फसवून आपणच सगळें घेऊन यावें. असा विचार करून पापबुद्धि धर्मबुद्धीला म्हणाला, मित्रा, म्हातारपणीं आठवण होण्यासारखें कांहींतरी कृत्य करून ठेव. देशाटन केल्याशिवाय लोकांच्या रीतीभाती तुला कशा कळतील ? देशांतरीं जाऊन जो अनेक प्रकारचे लोक पहात नाहीं, अनेक भाषा शिकत नाहीं, तो जन्मास येऊन काय उपयोग ? विद्या, वित्त, चातुर्य हीं देशाटन केल्याशिवाय प्राप्त होत नाहींत.

हें ऐकून धर्मबुद्धीस आनंद झाला. नंतर एके दिवशीं चांगल मुहूर्त पाहून वडील माणसांचा निरोप घेऊन पापबुद्धीबरोबर तो देशांतरीं जाण्यास निघाला. अनेक देश फिरतां फिरतां धर्मबुद्धीच्य विद्वत्तेमुळें उभयतांस पुष्कळ द्रव्य मिळालें, तेव्हां ते दोघेही आनंदित होऊन घरीं येण्यास निघाले.

गांवाजवळ आल्यावर पापबुद्धि धर्मबुद्धीला म्हणाला, मित्रा, हें सगळें द्रव्य घरीं एकदम घेऊन जाणें बरोबर नाहीं. सगळे सोयरेधायरे मागूं लागतील. याकरितां येथेंच कोठें तरी खूण करून रानांत पुरून ठेवावें, आणि थोडेंसें घेऊन घरीं जावें. तें खर्चिल्यावर गरज लागेल तेव्हां पुनः घेऊन जावें. द्रव्य पाहिलें म्हणजे चांगल्याचें देखील मन बदलतें, याकरितां तें कोणासही दाखवूं नये.

हें ऐकून धर्मबुद्धि म्हणाला, बरें आहे, असेंच करूं. असें म्हणून त्यांणीं बहुतेक द्रव्य तेथें पुरून ठेविलें, आणि घरीं जाऊन ते दोघेही सुखानें राहूं लागले. एके दिवशीं मध्यरात्रीस पापबुद्धीनें गांवाबाहेर जाऊन तें सर्व द्रव्य उकरून खळगा पुनः मातीनें भरून होती तशी जागा करून घरीं आणिलें आणि दुसरे दिवशीं धर्मबुद्धीकडे जाऊन म्हणाला, मित्रा, चार माणसें पदरीं खावयास असल्यामुळें आणलेलें द्रव्य संपून गेलें; याकरितां त्या जागीं जाऊन आणखी थोडेंसें घेऊन येऊं. धर्मबुद्धि ह्मणाला, बरें आहे.

नंतर दोघांनीं जाऊन ती जागा उकरिली आणि पाहतात तों आंतील भांडें रिकामें दृष्टीस पडलें. तेव्हां पापबुद्धि डोकींत माती घालून छाती बडवून कपाळ फोडून घेऊन ओरडूं लागला आणि धर्मबुद्धीस म्हणाला, अरे, त्वां द्रव्य चोरून नेलें, यांत संशय नाहीं. दुसऱ्या कोणासही ही जागा माहीत नाहीं. हा खळगा होता तसा त्वां पुनः करून ठेविला. माझें अर्धें द्रव्य दे, नाहीं तर मी फिर्याद करीन.

**धर्मबुद्धि**—दुष्टा, असें बोलूं नको. मी धर्मबुद्धि आहें, मी चोऱ्या करीत नसतों. दुसऱ्याचें द्रव्य मला मृत्तिकेप्रमाणें आहे.

याप्रमाणें त्या दोघांची बोलाचाली होऊन दोघांनींही एकमेकांवर फिर्यादी केल्या. न्यायाधीशानें दोघांसही शपथ करण्यास सांगितलें. तेव्हां पापबुद्धि म्हणाला, "न्यायाधीश महाराज, माझी आपणास विनंती आहे कीं, आपण म्हणतां हें बरोबर नाहीं. कारण, वादांत लेखी पुरावा असला तरच चांगला. लेखी पुरावा नसेल तर साक्षीदार सांगतील त्याप्रमाणें न्याय करावा. साक्षीदार नसतील तर मात्र शपथ करावयाची; असें शास्त्रांत सांगितलें आहे. या कामीं वनदेवतांची साक्ष घ्यावी. तिजवरून आह्मांपैकीं चोर कोण, आणि सात्र कोण याचा निर्णय करावा."

**न्यायाधीश**—ठीक आहे. अरे, चांडाळाची साक्ष असली

तरी न्यायाच्या कामीं उपयोगीं पडते. मग देवानें साक्ष दिल्यास उत्तमच आहे. तर उद्यां सकाळीं तुम्हां दोघांस घेऊन आम्ही जाऊं.

नंतर पापबुद्धि घरीं गेला आणि बापास म्हणाला, "बाबा, हें सगळें द्रव्य धर्मबुद्धीचें आहे, तें मी चोरून आणिलें, ह्यासाठीं मी सांगतों असें बोलाल, तर आपणाला तें जिरेल; नाहीं तर तें जाऊन आणखी माझा जीवही जाईल."

**बाप**—मुला, सांग लवकर, काय बोलूं तें ?

**पापबुद्धि**—बाबा, गांवाबाहेर शमीचें एक मोठें झाड आहे. त्याला मोठी ढोल आहे. आतांच तींत जाऊन बसा. सकाळीं न्यायाधीश आह्मा उभयतांस तेथें घेऊन येईल आणि वनदेवतांस विचारील, त्या वेळेस धर्मबुद्धि चोर आहे, असें सांगा.

याप्रमाणें तजवीज झाल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळींच न्यायाधीश त्या दोघांस बरोबर घेऊन रानांत गेला आणि मोठ्यानें म्हणाला, 'वनदेवतांनो, ह्या दोघांतून चोर कोण ? तें तुह्मीं सांगा.' हें ऐकून पापबुद्धीचा बाप झाडाच्या ढोलींतून म्हणाला, 'धर्मबुद्धीनें द्रव्य हरण केलें.'

हें ऐकून न्यायाधीशास मोठें आश्चर्य वाटलें, धर्मबुद्धि चोर आहे अशी त्याची खात्री झाली. नंतर त्याच्या मुसक्या बांधवून त्याला या चोरीबद्दल कोणती शिक्षा करावी, हें तो कायद्यांत पाहूं लागला. इतक्यांत धर्मबुद्धीनें कापूर वगैरे शीघ्रज्वालाग्राही पदार्थ शमीच्या झाडाभोंवतालीं रचून आग लाविली. त्या भडाक्यानें डोळे फुटून अर्धवट करपलेला असा पापबुद्धीचा बाप बाहेर पडला. तेव्हां न्यायाधीशानें धर्मबुद्धीची वहावा केली; आणि पापबुद्धीस मोठी शिक्षा दिली.

## तात्पर्य.

खोटें बोलून सज्जनास फसविण्याचा यत्न केला तर आपलाच नाश होतो. खरें बाहेर पडल्याशिवाय कधीं रहात नाहीं. दुष्टानें कितीही कुकल्पना रचिल्या, तरी शहाणा आहे तो तितक्यांवरही तोड काढील. याकरितां शहाण्यास फसविण्याच्या किंवा फसविण्याविषयीं मदत करण्याच्या कामांत पडूं नये.

---

# गोष्ट १६.

## बगळे आणि खेंकडा.

एका रानांत एक मोठा वटवृक्ष होता, त्यावर पुष्कळ बगळे रहात असत. एके वेळीं एक कृष्णसर्प त्या वृक्षाच्या ढोलींत येऊन राहिला. तो नेहमीं बगळ्यांचीं पिलें खात असे. एके दिवशीं त्यानें एका बगळ्याचीं सर्व पिलें खाल्लीं. त्यामुळें त्यास फार दुःख होऊन तो सरोवराच्या कांठीं रडत बसला. तेथें एक खेंकडा होता. तो बगळा रडत आहे असें पाहून त्यास म्हणाला, मामा, आज आपण रडता कां?

**बगळा**—बाबा, काय करूं, मी हतभाग्य आहें. ढोलींतल्या सापानें माझीं सर्व अंडीं खाल्लीं म्हणून रडतों. या सापाला मारण्याचा कांहीं उपाय असला तर सांग.

हें ऐकून खेंकडा मनांत म्हणतो, "हा तर आमचा हाडवैरी. याला असा उपाय सांगतों कीं, तेणेंकरून सगळ्या बगळ्यांचें निसंतानच होईल. हृदय सुरीसारखें असलें तरी बाहेरून गोड बोलून शत्रूला फसविलें पाहिजे." नंतर बगळ्याकडे पाहून म्हणतो; "मामा, असें आहे तर मासे मारून त्यांचे तुकडे मुंगसाच्या बिळापासून सापाच्या ढोलीपर्यंत ठेवून द्या; म्हणजे त्या वाटेनें मुंगस सापाच्या ढोलींत जाऊन त्यास खाऊन टाकील."

याप्रमाणें बगळ्यानें केल्यावर मुंगूस मासे खात खात आला तो सापाच्या ढोलींत शिरला. त्यानें लागलेंच सापास खाऊन झाडावरील सगळे बगळेही खाऊन टाकिले.

### तात्पर्य.

संकट आलें असतां उपाय योजावयाचा तो विचार करून योजावा. त्या उपायापासून दुसराच एकादा अपाय होईल कीं काय, याचा पूर्वींच विचार केला पाहिजे. नाहीं तर एक नाश झाला तो होऊन केलेल्या उपायापासून भलताच परिणाम होतो.

---

# गोष्ट १७.

## जशास तसें.

एका शहरांत जीर्णधन नांवाचा एक वाण्याचा मुलगा होता.

दारिद्र्य आल्यामुळें त्याला वाटूं लागलें कीं, आजपर्यंत येथें श्रीमंतींत राहून आतां लोकांस दैन्य दाखविणें चांगलें नाहीं. त्याच्या घरांत वडिलोपार्जित एक लोखंडाची चांगली तराजू होती, ती शेजारच्या वाण्याच्या दुकानीं ठेवून तो देशांतरीं गेला, आणि कांहीं दिवस परदेशीं राहून तेथें थोडेंबहुत द्रव्य मिळवून घरीं परत आला. नंतर ज्या वाण्याच्या घरीं त्याणें तराजू ठेविली होती त्याकडे जाऊन ह्मणाला, "शेटजी, आमची तागडी तुमच्याकडे ठेविलेली आहे, तेवढी द्या."

हें ऐकून तो वाणी म्हणाला, "बाबा, आतां ती तागडी कोठली? ती उंदरांनीं खाल्ली." जीर्णधन म्हणाला, "उंदरांनींच खाल्ली असली तर तुह्मी तरी काय कराल? संसार हा असाच. काय होईल याचा नेम नाहीं. मी नदीवर अंघोळीला जात आहें. याकरितां माझीं सोंवळीं धोतरें घेऊन येण्यास तुमच्या मुलाला मजबरोबर धाडा." हें ऐकून त्यास आपल्याबद्दल संशय येऊं नये म्हणून तो वाणी म्हणाला, "बरें आहे. मुला, काका नदीवर अंघोळीला जात आहेत त्यांबरोबर त्यांचीं धुतलेलीं धोतरें घेऊन जा."

हें ऐकून मुलगाही धोतरें घेऊन हौसेनें त्याबरोबर नदीवर गेला. नंतर त्या मुलास नदीवर एक गुहा होती तींत ठेवून तिच्या तोंडावर एक मोठी धोंड ठेऊन जीर्णधन स्नान करून घरीं आला. तेव्हां वाणी म्हणाला, "अहो आमचा मुलगा तुमच्या बरोबर धोतरें घेऊन नदीवर गेला होता तो कोठें आहे?"

**जीर्णधन**—तो नदीच्या कांठावर उभा होता, इतक्यांत त्यास चोंचींत धरून घार उडून गेली.

**वाणी**—लुच्चा, खोट्या माणसा, घार कधीं पोरांना धरून नेते कायरे?

**जीर्णधन**—अहो, खरे साळसूत, उंदीर लोखंडी तराजू खाऊं लागल्यापासून घारी पोरें नेऊं लागल्या. बच्याजी, मुलाची गरज असली तर तराजू तेवढी द्या, एरवीं मुलगा मिळणार नाहीं.

याप्रमाणें भांडत भांडत ते दोघेही फिर्याद करण्यास न्यायाधीशाकडे गेले. तेथें वाणी मोठ्यानें ओरडून म्हणाला, 'अन्याय हो अन्याय. या चोरट्यानें माझा मुलगा नेला.'

हें ऐकून न्यायाधीशानें जीर्णधनास मुलगा कोठें आहे म्हणून विचारिलें.

**जीर्णधन**—काय करूं! माझ्यादेखत घारीनें त्यास नेलें!

**न्यायाधीश**—खोटें बोलतोस. घारीच्यानें मुलगा कसा नेववेल?

**जीर्णधन**—जेथें लोखंडाची तराजू उंदरांनीं खाल्ली, तेथें घारीनें मुलगा नेला ह्मणून काय झालें?

**न्यायाधीश**—तूं काय ह्मणतोस तें स्पष्ट सांग.

नंतर जीर्णधनानें मुळापासून सर्व हकीकत सांगितली. तेव्हां न्यायाधीशास हंसूं आलें. त्यानें शिपायांस सांगून तराजू व मुलगा ज्याचीं त्यास देवविलीं.

### तात्पर्य.

जशास तसें भेटे, आणि मनींचा संशय फिटे.

---

## गोष्ट १८.

### राजा आणि माकड.

एका राजानें एक माकड पाळिलें होतें. तें त्यास फारच आवडत असे. त्याला मनुष्यासारख्या अनेक प्रकारच्या कृति करण्यास शिकविलें होतें. त्यामुळें त्यास पंख्यानें वारा घालितांही येत असे. उन्हाळ्यांत एके दिवशीं राजा हांतरुणावर पडला होता, आणि माकड वारा घालीत होतें. इतक्यांत राजास किंचित् झोंप लागली. तेथें एक माशी होती ती राजाच्या आंगावर बसे. माकड तिला हाकून लावी, तरी ती पुनःपुना उरावर येऊन बसे. तेव्हां माकडास फार राग आला. जवळच एक नुक्तीच पाजवलेली सुरी होती ती घेऊन त्यानें जोरानें माशीवर मारिली. ती राजाच्या उरांत गेल्यामुळें तो मेला.

### तात्पर्य.

मूर्खाला भलतेंच काम सांगूं नये. सांगितलें असतां नाश होतो. हित करणारा मूर्ख असला तर त्यापासून हित न होतां उलटें अहित मात्र होतें.

---

# गोष्ट १९.

## शहाणा चोर.

एका शहरांत एक ब्राह्मण रहात होता. तो विद्वान् होता, तरी लहानपणापासून वाईट संगत लागल्यामुळें चोऱ्या करूं लागला.

त्या शहरांत दोन व्यापारी होते. त्यांच्या घरीं युक्तीनें चोरी करावी म्हणून त्यानें त्यांच्याशीं स्नेह केला. परंतु ते हुशार असल्यामुळें त्याचा कावा साधेना. एके दिवशीं ते दोघेही देशांतरीं माल खरेदी करण्यास चालले. तेव्हां त्या चोर ब्राम्हणानें विचार केला कीं, यांच्या बरोबर जाऊन यांस वाटेंतच विष वगैरे घालून यांचें द्रव्य घेऊन यावें. असें मनांत आणून तो त्या व्यापाऱ्यांस ह्मणाला, "मित्रहो, मलाही देश पाहण्याची इच्छा झाली आहे. तुह्मी कृपा कराल तर तिकडे एक दोन देवस्थानें आहेत तेथें जाऊन यात्रा करून येईन. मला तुह्मी आपल्या सोबतीनें न्या." हें ऐकून त्या व्यापाऱ्यांनींही त्याचें म्हणणें कबूल केलें. नंतर ते तिघेही प्रवासास निघाले. सावकार जिकडे खरेदीस चालले होते, तिकडे जवाहिराचा खप चांगला असे, व वाटेंत चोरांचें भय असे, ह्मणून त्यांनीं एक एक हजाराचा हिरा आपणाबरोबर घेतला. तो विकून तेथेंच माल खरेदी करावा असा त्यांचा बेत होता. कांहीं मजला गेल्यावर एका डोंगराच्या खिंडींतून जात असतां त्यांस चोर भेटले. तेव्हां त्या दोघां सावकारांनीं आपल्या जवळचे हिरे गालफडांत घालून ठेविले आणि आह्मांजवळ कांहीं नाहीं म्हणून चोरांस सांगितलें. चोरांस त्यांचें ह्मणणें खरें वाटेना. त्यांनीं त्यांस नागवें करून पाहिलें तरी कांहीं सांपडेना. परंतु कोणी सावकार हिरे घेऊन गेले अशी त्या चोरांस खबर होती, त्यामुळें सावकारांनीं हिरे कोठें तरी ठेविले असावे असा त्यांस संशय आला. ते त्यांस दरडावून म्हणूं लागले "तुमच्या जवळ हिरे वगैरे जें कांहीं असेल तें द्या, नाहीं तर ठार मारून टाकूं."

हें ऐकून तो चोर ब्राम्हण मनांत ह्मणाला, यांनीं आपले हिरे तोंडांत घातले असतील पण मजजवळ कांहींच नाहीं. माझा प्राण फुकट जाणार. सर्वच नाहीं म्हणतात यामुळें यांस सर्वच खोटें वाटतें. यांस अगोदर मारून यांजवळ कांहीं सांपडल्यास मजपाशींही

कांहीं असेल असें समजून मलाही ते मारतील. मला आधीं मारून मजपाशीं कांहीं सांपडलें नाहीं तर कदाचित् त्यांस असें वाटेल कीं, सर्वच असे असतील. यामुळें ते त्यांस सोडूनही देतील. असें झालें असतां ते आपल्या मुलांबाळांसहवर्तमान् सुखी रहातील. आपणासही पुण्य लागेल. मरण हें कधींतरी आल्याशिवाय रहाणार नाहीं. मागल्या जन्मीं कांहीं पातक केलें होतें, त्यामुळें चोरी करण्याच्या दुष्कर्मांत पडलों, त्याचेंच हें फळ म्हटलें पाहिजे.

असा विचार करून तो चोरांस म्हणाला, "बाबांनो, हे माझे परम मित्र आहेत. माझ्यानें यांचा मृत्यु पहावत नाहीं. अगोदर मला मारा आणि मजपाशीं कांहीं सांपडल्यास यांचें तुम्ही काय वाटेल तें करा."

चोर म्हणाले "असें कां होईना. अमक्या जवळच द्रव्य असेल असें आपणांस तरी कोठें ठाऊक आहे? ठारच मारावयाचें मग याचें एवढें तरी कां ऐकूं नये?" असें म्हणून त्यांनीं त्याचे दोन तुकडे केले. आणि तोंडांत वगैरे सर्व ठिकाणीं शोधून पाहिलें तरी कांहीं सांपडलें नाहीं. हें पाहून त्या चोरांपैकीं एकजण म्हणाला, अरे उगाच यांचा प्राण घेऊन काय करणार? जी एकाची दशा तीच बाकीच्यांची. चला या सोडून. आपणांस ज्यांची बातमी लागली ते हे नसतील. असें बोलून ते चोर त्यांस सोडून पुढें चालते झाले.

### तात्पर्य.

शत्रु शहाणा असला तर त्यापासूनही प्रसंगीं उपयोग होतो. मूर्ख मित्रापेक्षां शहाणा शत्रु बरा.

---

## गोष्ट २०.

## लोभी कोल्हा.

एका अरण्यांत एक पारधी शिकारीस गेला होता. तेथें त्यानें एक मोठा डुकर पाहून त्यावर तीर सोडिला. तो लागल्याबरोबर डुकरानें पारध्याच्या आंगावर चवताळून जाऊन त्यास ठार मारिलें. नंतर त्या तीराच्या वेदनेनें आपणही मेला. इतक्यांत फिरत फिरत तेथें एक कोल्हा आला. डुकर आणि पारधी यांचीं प्रेतें पाहून त्यास मोठा

आनंद झाला. तो मनांत ह्मणाला "आज मी मोठा भाग्यवान् आहें, आज माझी चंगळ झाली, नशीबीं असलें म्हणजे उद्योगाशिवाय देखील पाहिजे तें प्राप्त होतें. आतां हें प्राप्त झालेलें अन्न पुष्कळ दिवस पुरवून खावें. या वेळेस भूक फार लागली आहे. अशा वेळीं कसेंही असलें तरी गोड लागेल. ह्मण आहे, भुकेस कोंडा आणि निजेस धोंडा. पोट भरल्यावर वाईट अन्न गोड लागत नाहीं. याकरितां आज ही धनुष्याची वाळलेली दोरी आंतड्यांची आहे ती खावी." असें ह्मणून तो ती दोरी खाऊं लागला तों दोरी तुटतांच धनुष्य ताडूदिशीं कपाळांत बसून तो मरून गेला.

### तात्पर्य.

अतिलोभ धरूं नये. कृपण असतात ते पुष्कळ मिळालें तरी लोभानें आणखी मिळवूं लागतात. त्यामुळें मिळाल्याचा उपभोग न होऊन त्यांचा नाश होतो.

---

## गोष्ट २१.

### प्रधान आणि हुजऱ्या.

वर्धमान नांवाच्या शहरांत दंतिल नांवाचा एक लक्षाधीश सावकार रहात असे. तो मोठा उदार असल्यामुळें लोकप्रिय असे. याकरितां राजानें त्यास कारभारी नेमिलें. त्यानें राज्यकारभार उत्तम रीतीनें चालवून राजा व प्रजा या दोघांसही संतुष्ट ठेविलें. राजाची त्यावर फारच मर्जी बसली. दंतिलाच्या मुलाचें लग्न झालें त्या वेळेस सर्व लोकांची खाण्यापिण्याची चैन उडाली. सर्व लोकांस दंतिलानें लग्नाचे पोपाक दिले. लग्नसमारंभ आटोपल्यावर लग्नाच्या निमित्तानें राजासही मेजवानी देण्याचा त्यानें बेत केला. मेजवानीच्या दिवशीं सोन्यारुप्यांच्या पात्रांचा लखलखाट व पक्वान्नांचा घमघमाट चालला होता. पाट रांगोळ्या वगैरे सर्व तयारी झाली, तेव्हां मंडळी पात्रावर बसूं लागली. राजाबरोबर गोरंभ नावाचा त्याचा चाकर आला होता, तो गृहस्थांच्या पंक्तींतच एका पात्रावर बसला ह्मणून त्यास गचांडी देऊन तेथून उठवून लाविलें. या अपमानामुळें गोरंभास फारच राग आला. त्यामुळें खोड मोडण्याकरितां दंतिलावर राजाची गैरमर्जी होईल असा यत्न करण्याचा त्यानें बेत केला. एके दि-

वर्शी पहांटेस राजा साखरझोंप घेऊन अर्धवट जागा झाला होता. तेथें गोरंभही जवळच केर काढीत होता. तेव्हां तो आपणाशींच ह्मणाला, "दंतिल मोठा वाईट मनुष्य आहे. बेलाशक राणीजवळ पलंगावर जाऊन बसतो. काय असेल तें असो." हें ऐकून राजा पट्टदिशीं हांतरुणावर बसून म्हणाला, कायरे गोरंभा, काय बोलतोस?

**गोरंभ**—महाराज, रात्रीस सोंगट्या खेळत बसलों होतों त्यामुळें मला फार जागरण झालें आहे, झोंपेंत काय चावळलों तें मला ठाऊक नाहीं.

हें ऐकून राजा मनांत ह्मणाला, याला वाड्यांत पाहिजे तिकडे जाण्याची परवानगी आहे. कदाचित् असलें कांहीं याच्या दृष्टीस पडलें नसेल कशावरून? कारण मनुष्य दिवसास मनांत जें आणितो, जें पहातो, जें करितो, तसलें स्वप्न त्यास पडतें. [बायका तर काय करतील याचा नेम नाहीं. त्या एकाबरोबर गोड बोलतील, मनांत प्रेम असेल दुसऱ्याविषयींच, पहातील तिसऱ्याकडेसच. एकांतस्थल, वेळ आणि पुरुष, हीं तीन्ही एके कालीं जमत नाहींत म्हणून स्त्रियांचें पातिव्रत्य रहातें; नाहीं तर रहाणें कठीण असें म्हटलें आहे तें खरें आहे. अमक्या स्त्रीचें मजवर प्रेम आहे असें ह्मणून जो निःकाळजी रहातो त्या मूर्खास स्त्रिया हव्यातशा फसवितात. त्या कशाही बोलल्या तरी त्यांवर विश्वास ठेवून चाललें तर केव्हां फजिती होईल याचा नेम नाहीं. जवळ वृक्ष असला म्हणजे त्यावर वेल वळयते तसाच स्त्रियांचा स्वभाव आहे. याकरितां त्यांस परपुरुषाचा प्रसंगच येऊं देऊं नये. जवळच्या मांणसांच्या भयानें स्त्रिया मर्यादेंत रहातात. नाहीं तर आपण पातक करून पुरुषांसही खाड्यांत घालतील.]

याप्रमाणें मनांत पुष्कळ दुःख करून राजा दंतिलास पाण्यांत पाहूं लागला. त्याचें काम काढून त्यास राजवाड्यांत येण्याचीही बंदी केली. दिवस उगवल्यावर दंतिल रोजच्याप्रमाणें राजवाड्यांत जाऊं लागला, तेव्हां चोपदारांनीं त्यास मज्जाव केली. तेव्हां आपणावर राजाची मर्जी खपा झाली आहे हें पाहून तो मनांत ह्मणाला, ["राजाचा खरा मित्र कोण आहे? कितीही प्रिय असला तरी राजे त्याचा केव्हां घात करतील याचा नेम नाहीं. जुगाऱ्याच्या ठायीं सत्यभाषण, सर्पाच्या ठिकाणीं शांति, नपुंसकाच्या ठायीं धैर्य, दारूबाजाच्या ठायीं विचार, राजाच्या ठायीं खरें मित्रत्व, या गोष्टी दुर्मि-

ळच आहेत.] मी राजाचें किंवा दरबारच्या लोकांचें कोणतेंही वाईट केलें नाहीं. असें असून अशी गोष्ट झाली, काय असेल तें असो."

देवडीवर दंतिलास मज्जाव झाली हें पाहून गोरंभ हंसून चोपदारांस म्हणाला, हे गृहस्थ अगदीं राजाच्या मर्जीतले, हे हो येथें उभे कां? कोणास बक्षीस देणें किंवा कोणास शिक्षा करणें वगैरे सर्व राजाचीं कामें यांनीं करावयाचीं. बघता काय, मला गचांडी मिळाली तशी याला मिळूंद्या.

हें ऐकून दंतिल मनांत म्हणाला, सगळें कृत्य या गोरंभाचें आहे यांत संशय नाहीं. [हीं थोरांच्या घरचीं कुत्रीं. हीं केव्हां कोणावर भोंकतील याचा नेम नाहीं. यांच्या तोंडावर तुकडा टाकिला पाहिजे.] असें ह्मणून तो घरीं गेला. नंतर रात्रीस गोरंभास घरीं बोलावून त्यास शेलापागोटें देऊन सन्मान करून ह्मणाला, अरे भलत्याच ठिकाणीं बसलास ह्मणून तुला उठविलें. एरव्हीं तुजवर माझा राग नाहीं. गोरंभासही शेलापागोटें मिळाल्यामुळें मोठा आनंद झाला. हलकटाला राग यावयास उशीर नाहीं, आणि खुष होण्यासही उशीर नाहीं. तराजूची दांडी थोडें वजन कमी झालें ह्मणजे वर जाते, थोडें जास्त झालें ह्मणजे लागलीच खालीं बसते. तशीच त्याची कृति असते. तो म्हणाला महाराज, झालें तें झालें. आतां तुह्मी माझी समजी केली, तर पहा माझें शहाणपण. पुन्हा पूर्वीप्रमाणें तुम्हांवर राजाची मर्जी फिदा होईल असें करितों.

नंतर एके दिवशीं पूर्वीप्रमाणेंच राजा पहांटेस अर्धवट जागा झाला असतां गोरंभ झाडतांना ह्मणाला, काय हो राजा वेडा आहे? परसाकडे बसतांना कांकडी खातो. हें ऐकून राजा ह्मणाला, कायरे गोरंभ्या, भलभलतेंच काय बडबडतोस? पुष्कळ दिवसांचा चाकर आहेस म्हणून, नाहींतर एकदम घालवून दिलें असतें. मूर्खा, परसाकडे बसून कांकडी खातांना मला त्वां कधीं पाहिलें?

**गोरंभ**—महाराज, रात्रीस गंजिफा खेळत बसलों होतों त्यामुळें जागरण होऊन आतां काम करीत असतां मला झोंप आल्यामुळें काय बडबडलों कोण जाणें. सरकार कृपा करा. एकवार माफ करा.

हें ऐकून राजा मनांत ह्मणाला, मीं परसाकडे बसतांना कधींही कांकडी खाल्ली नाहीं, असें असून हा मूर्ख झोंपेंत भलभलतेंच बडब-

डला. असेंच दंतिलाविषयीं असेल यांत संशय नाहीं. त्या बिचाऱ्याचा आपण उगाच अपमान केला. तसल्या गृहस्थाच्या हातून अशी गोष्ट होणेंच नाहीं. त्याला कामावरून दूर केल्यापासून कारभारांत जिकडे तिकडे अव्यवस्था झाली आहे. नंतर त्यानें दंतिलास बोलावून त्याची समजी करून मोठ्या सन्मानानें त्यास प्रधानकीचीं वस्त्रें पुनः दिलीं.

## तात्पर्य.

श्रीमंतांजवळ मनुष्यें असतात तीं हलकीं असलीं तरी त्यांचा मान ठेवावा लागतो. त्यांचा यजमानाजवळ सर्वदा प्रवेश असल्यामुळें ते एकाद्याविषयीं यजमानाच्या मनांत काय भरवून देतील याचा नेम नाहीं. असें झाल्यानें विनाकारण नाश व्हावयाचा. याकरितां त्यांविषयीं आरंभींच जपावें हें चांगलें.

---

# गोष्ट २३.

## बैल आणि कोल्हा.

एके ठिकाणीं तीक्ष्णविषाण नांवाचा एक मोठा माजलेला पोळ होता. तो नेहमीं रानांत पाहिजे तिकडे चरून शिंगांनीं दरडीची माती उकरीत असे. एके दिवशीं तो नदीवर पाणी पिण्यास गेला. तेथें एक कोल्हा आपल्या स्त्रीसहवर्तमान क्रीडा करीत होता. पोळ वाळवंटावर फिरत असतां त्याचा मोठा लांब वृषण कोल्हीच्या दृष्टीस पडला. तेव्हां ती कोल्ह्यास म्हणाली, प्राणनाथ, पहा त्या बैलाचा गुलगुलीत वृषण कसा लोंबत आहे तो! आतां खालीं पडेल असें वाटतें. तुम्ही त्याच्या मागून फिरत असा आणि पडल्याबरोबर तो घेऊन या.

**कोल्हा**—प्रिये, तो केव्हां पडेल कोणाला ठाऊक. उगीच त्याच्या मागोमाग फिरून कां दमावें? येथें जवळच्या शेतांत उंदीर पुष्कळ आहेत तेच मारून आपण खाऊं. तुला एकटीला येथें ठेवून पोळाच्या मागें फिरत बसणेंही चांगलें नाहीं. आपणाला थोडेंबहुत प्राप्त झालें असेल तेवढ्यांतच संतुष्ट असावें. जें मिळण्याचा संभव नाहीं त्याच्या नादीं लागूं नये.

**कोल्ही**—जळलें मेलें. तुमचें जेव्हां तेव्हां असेंच. आळस टाकून उद्योग केल्याशिवाय अधिक कोठून मिळेल? तिळांत तेल असतें पण घाण्यांत घातल्याशिवाय तें मिळत नाहीं. तुह्माला वाटतें तो वृषण पडेल कीं नाहीं कोण जाणे, पण अगदीं पडावयास झाला आहे, तो पडल्याशिवाय कसा राहील? जमिनींवरील पाणीं न पितां चातक पुष्कळ दिवस मेघाकडे पहात असतो, म्हणून त्याच्या तोंडांत मेघाचें पाणीं पडतें. तसें कांहीं वेळ दम खाल्ला तर तो वृषणही गळून आपणास मिळेल. आतांशीं मला उंदराच्या मांसाचा कंटाळा आला आहे. मला डोहाळे लागले आहेत, त्यामुळें हे पडावयास झालेले दोन गोळे खावे असें वाटतें.

कोल्हा बाईलबुद्धीच होता. बायकोचें तें भाषण ऐकून तो उंदीर मारण्यास शेतांत न जातां पोळाच्या मागें फिरूं लागला. (पुरुष बायकोच्या नादीं लागला ह्मणजे काय करील याचा नेम नाहीं.) पुष्कळ दिवस कोल्हा पोळाच्या मागें फिरत होता तरी वृषण खालीं पडेना. एक दोन वेळां त्याच्या लाथा मात्र मुसकटांत बसल्या. तेव्हां कोल्हा कंटाळून परत आला आणि कोल्हीस ह्मणाला, प्रिये, तो वृषण पडावयास झालेला दिसतो, पण इतके दिवस पोळाच्या मागें फिरून दमलों, तरी तो पडत नाहीं. पुढें तरी लवकर पडेल कशावरून? उपासमार होऊन जीव जावयाची वेळ आली, आतां ह्याचा नाद सोडून शेतांत उंदीर मारण्यास जातों. तुला पाहिजे असल्यास ये. असें ह्मणून कोल्हा चालता झाला.

## तात्पर्य.

कित्येक गरीब मनुष्यें उद्योग करून थोडेंबहुत मिळेल त्यांत संतुष्ट न रहातां उगाच श्रीमंतांचीं आर्जवें करूं लागतात. त्यांस वाटतें रावसाहेबांजवळ वस्त्रपात्र पुष्कळ आहे, आर्जव केलें असतां ते आपणास देतील. आशेनें ते त्यांची थुंकी झेलितात, पण एकादे वेळेस श्रीमंतांची इतराजी होऊन त्यांस गचांड्या मिळतात. किंवा निराशेनें श्रीमंतांचें आर्जव सोडून त्यांस उद्योग करण्यास दुसरीकडे जावें लागतें! याकरितां व्यर्थ आर्जवांत वेळ न घालवितां उद्योग करावा यांतच हित आहे.

# गोष्ट २३.

## हत्ती आणि ससा.

एका अरण्यांत चतुर्दंत नांवाचा एक मोठा हत्ती रहात असे. तो एका मोठ्या कळपाचा मुख्य होता. एके वर्षी पाऊस न पडल्यामुळें सर्व नद्या, सरोवरें, तळीं वगैरे आटून गेलीं. तेव्हां पाणी न मिळाल्यामुळें सर्व हत्ती त्यास म्हणाले, महाराज, छावे तान्हेनें व्याकुळ झाले, कित्येक मरूनही गेले, याकरितां एकादें सरोवर शोधून काढा म्हणजे पाणी मिळून सर्वांचे जीव वांचतील. हें ऐकून चतुर्दंत ह्मणाला, पाण्यानें तुडुंब भरलेलें एक सरोवर आहे, पण तें येथून फार लांब आहे तेथें चला. तेव्हां तिकडे जाऊं लागले व पंधरा दिवसांनीं त्या सरोवराजवळ पोहोंचले. पुष्कळ दिवसांनीं यथेच्छ पाणी मिळाल्यामुळें संध्याकाळपर्यंत डुंबून ते निघून गेले. त्या सरोवराच्या कांठीं दलदलींत पुष्कळ ससे रहात असत. त्यांपैकीं हत्तींच्या पायांनीं पुष्कळ जखमी झाले व मेले. हत्तींचा कळप गेल्यावर सर्व दुःखी होऊन एके ठिकाणीं जमून विचार करूं लागले. ते एकमेकांस म्हणाले, याप्रमाणें हत्तींचा कळप जर रोज येऊं लागला तर आमचें निसंतान होईल. याकरितां कांहीं तरी उपाय करावा. त्यांपैकीं एक ससा ह्मणाला येथून निघून जावें, याशिवाय दुसरा उपाय नाहीं. प्राणरक्षणाकरितां देशत्याग देखील केला पाहिजे. दुसरा ह्मणाला, ही वडिलोपार्जित जागा सोडून जाणें ठीक नाहीं. हत्तींलाच भिवविण्याची कांहीं तरी युक्ति करावी, म्हणजे ते येथें येणार नाहींत. अंगांत शक्ति नसली तरी बाहेरून डौल घालावा. युक्ति साधली तर बरेंच झालें नाहीं तर ही जागा सोडून जावें हें अखेरचें आहेच. हें ऐकून सर्व ससे त्यास म्हणाले, तुलाच जी युक्ति सुचेल ती कर, आम्हांस कांहीं सुचत नाहीं. तुझी युक्ति सिद्धीस गेली तर त्वां सर्वांस जीवदान दिलेंसें होईल. मग तुलाच आमचा राजा करूं.

हें ऐकून तो युक्तिमान् ससा हत्ती येण्याच्या वाटेवर एका उंच विकट जागीं जाऊन बसला, आणि कळप आला तेव्हां त्याचा मुख्य जो चतुर्दंत त्यास म्हणाला, अरे दुष्टा, तू निःशंकपणें या चंद्राच्या सरोवरावर कशाकरितां येतोस? खबरदार पुढें आलास तर. मागें परत.

हें ऐकून हत्ती आश्चर्ययुक्त होऊन म्हणाला, कोणरे तू ?

**ससा**—अरे; मी विजयदत्त नांवाचा ससा आहें. मी चंद्रमंडलावर रहातों. मला चंद्रानें तुजकडे पाठविलें आहे.

**हत्ती**—अरे शशका, चंद्राचें काय ह्मणणें आहे तें सांग.

**ससा**—चंद्र म्हणाला, काल त्वां आपला सगळा कळप आणून पुष्कळ ससे तुडवून टाकिले. अरे, हे सर्व ससे आह्मांपाशीं जो विजयदत्त नांवाचा ससा आहे, त्याचे आप्त आहेत. विजयदत्त सशास आह्मी आपणाजवळ ठेविल्यामुळें आम्हांस शशी किंवा शशांक असें म्हणतात. तुला जिवाची गरज असली तर या सरोवरावर येऊं नको.

**हत्ती**—चंद्र कोठें आहे ?

**ससा**—ज्या सशांचे इष्टमित्र मेले, त्यांचें सांत्वन करण्याकरितां या सरोवरांतच आला आहे. तेथूनच त्यानें मला तुजकडे पाठविलें.

**हत्ती**—असें आहे तर मला त्याचें दर्शन घेऊन नमस्कार करूंदे.

**ससा**—मजबरोबर एकटा ये ह्मणजे दर्शन होईल.

याप्रमाणें बोलून चंद्रोदय झाल्यावर ससा हत्तीस सरोवराजवळ घेऊन गेला. आणि सरोवरांत पडलेलें चंद्रबिंब दाखवून म्हणाला, हे पहा चंद्रमहाराज उदकांत ध्यानस्थ बसले आहेत. यांस पाण्यांत जाऊन नमस्कार कर. याप्रमाणें सशानें सांगितल्यावर हत्ती पाण्यांत गेला तेव्हां पाणीं हालल्यामुळें चंद्राचें बिंबही हालूं लागलें. तेव्हां ससा ह्मणाला, अरे चंद्रमहाराज तुला पाहून फार रागावल्यामुळें कांपूं लागले, तर लवकर नमस्कार करून चालता हो. नंतर, महाराज, एकवार क्षमा करून दासाच्या अपराधाची क्षमा करा, पुनः असें करणार नाहीं. असें ह्मणून हत्ती निघून गेला तो पुनः त्या सरोवरावर आला नाहीं.

### तात्पर्य.

युक्तीनें काम केलें तर महत्संकट देखील टाळितां येतें.

---

## गोष्ट २४.

## चिमणा आणि कवडा.

एका वृक्षावर कपिंजल नांवाचा चिमणा पुष्कळ दिवस रहात असे. एके समयीं एका भाताच्या खांचरांत साळी पिकून तयार

झाल्या होत्या, त्या खाण्याकरितां तो दुसऱ्या चिमण्यांबरोबर तेथें गेला. तें शेत त्याच्या घरट्यापासून बरेंच लांब असल्यामुळें कांहीं दिवस घरीं न येतां तो तेथेंच राहिला. इकडे त्याचें घरटें ओसाड पाहून त्यांत एक कवडा राहूं लागला. कांहीं दिवसांनीं शेत कापून साळी नाहींतशा झाल्यावर चिमणा आपल्या घरट्याकडे आला. तेव्हां आपल्या घरट्यांत कवड्यास पाहून म्हणाला, अरे लुच्चा, माझ्या घरट्यांत कां शिरलास? चल, लवकर निघून जा.

**कवडा**—तू तर मोठाच लुच्चा आहेस. लोकांचें घर आपलें म्हणतोस. उगाच खोटें बोलून लोक ऐकतील काय? मी येथें आज पुष्कळ दिवस रहात आहें. यास पुष्कळ साक्षीदारही आहेत.

**कपिंजल**—असेंच तुझें म्हणणें असेल तर एकाद्या शहाण्या तिऱ्हाइताकडे जाऊं. तो जो न्याय करील तो दोघांनीं मान्य करावा.

हें बोलणें कवड्यास कबूल होऊन ते दोघे तिऱ्हाइताकडे जाण्यास निघाले. इतक्यांत त्यांस तीक्ष्णदंष्ट्र नांवाचा एक बोका भेटला. तो त्यांस भांडतांना पाहून म्हणाला, अरे, संसार क्षणभंगुर आहे, केव्हां जीव जाईल याचा नेम नाहीं. हें सर्व मायाजाल आहे. उगाच कलह कां करितां? अरे धर्माचरण करा, हेंच परलोकीं उपयोगीं पडेल. अरे कांहीं तरी धर्माचरण केल्याशिवाय जो वांचतो, त्याचें जीवन व्यर्थ होय. अरे कुत्र्याचें शेंपूट गुह्य झांकीत नाहीं व माशाही वारीत नाहीं, त्याप्रमाणेंच अधर्मी मनुष्याचें पांडित्य व्यर्थ होय. कांहीं तरी परोपकार करावा, कधींही दुसऱ्यास पीडा देऊं नये.

याप्रमाणें त्याचें धर्मयुक्त भाषण ऐकून कवडा म्हणाला, तीक्ष्णदंष्ट्र हा मोठा धार्मिक आहे. हाच आपली पंचाईत करील.

**कपिंजल**—हा तर आमचा हाडवैरी. याजवळ जाणें देखील ठीक नाहीं. तुझी मर्जी असेल तर आपण त्यास दुरूनच विचारूं.

नंतर ते दोघेही त्यास दुरूनच विचारूं लागले. महाराज, आम्हां दोघांमध्यें तंटा लागला आहे, एवढा आपण तोडा. जो खोटा ठरेल, त्यास आपण खाऊन टाका.

**बोका**—अरे असें बोलणें असेल तर येथून निघून जा. मी मांसभक्षण वर्ज्य केलें आहे. अरे अहिंसा हाच मुख्य धर्म होय. पाहिजे असल्यास तुमचा न्याय करीन, परंतु मी कोणाला खाणार

नाहीं. पण म्हातारपणामुळें मला दुरून ऐकूं येत नाहीं. जवळ येऊन काय म्हणणें आहे तें सांगाल तर मला जें खरें दिसेल तें सांगेन. मला खोटें बोलून काय करावयाचें? असत्य भाषणानें नरकांत मात्र जावें लागेल. तुम्हांस गरज असेल तर तुमचें काय म्हणणें असेल तें माझ्या कानांत सांगा.

हें ऐकून ते दोघेही मूर्ख त्याच्या दोहों कानांजवळ गेले. तेव्हां त्यानें एकास पुढल्या पायांनीं व दुसऱ्यास मागल्या पायांनीं धरून खाऊन टाकिलें.

### तात्पर्य.

लोक उगाच तंटे उत्पन्न करून न्यायाधीशाकडे जातात, तो लबाड असला तर दोन्हीही पक्षांचा नाश होतो.

---

## गोष्ट २५.

### तीन ठक.

एके गांवीं मित्रशर्मा नांवाचा अग्निहोत्री ब्राम्हण रहात होता. एके वेळीं यज्ञ करण्याचें मनांत आणून तो जवळच्या खेड्यांत जाऊन कुणब्यास ह्मणाला, अरे, पुढल्या अंवसेस मी यज्ञ करणार आहें, याकरितां एक बोकड पाहिजे. हें ऐकून त्या कुणब्यानें मोठ्या भक्तीनें भटजीस यज्ञाकरितां एक चांगला लठ्ठ बोकड दिला. तो घेऊन वाटेनें चालला असतां बोकड चरावयास इकडे तिकडे धांवे म्हणून त्यास खांद्यावर घेऊन भटजी घरीं चालले. कांहीं वेळानें वाटेंत त्यास तीन ठक भेटले. भटजीच्या खांद्यावर तो लठ्ठ बोकड पाहून ते आपणाशीं म्हणाले, आज थंडी पडली आहे; परंतु जर हा बोकड खावयास मिळाला तर तिजपासून आह्मांस कांहींएक त्रास होणार नाहीं. कांहीं तरी युक्ति करून भटजीस फसवून हा बोकड घेतला पाहिजे. नंतर ते तिघेही वेष पालटून दुसऱ्या वाटेनें जाऊन कांहीं अंतरानें दूरदूर भटजीच्या वाटेवर जाऊन बसले. ओझ्यामुळें भट हळूहळू चालून जवळ आल्यावर एकजण त्यास ह्मणाला, भटो, हें काय भलतेंच करतां? लोक हंसतील ना. कुत्र्याला खांद्यावर कशाला घेतलें? ब्राम्हणानें तर त्याला शिवूं देखील नये.

हें ऐकून तो ब्राम्हण रागावून, म्हणाला, तुला बोकड दिसत नाहीं काय? हा कुत्रा नव्हे.

**ठक**—भटजीबावा, रागावूं नका; आपल्या वाटेनें जा.

कांहीं पुढें गेल्यावर दुसरा ठक भेटला. तो म्हणाला, देवा, हें काय? वेड तर लागलें नाहीं ना? खांद्यावर डुकराचें पिलूं घेतलें! कोणी ब्राम्हणानें पाहिलें तर वाळींत टाकीलना?

हें ऐकून ब्राम्हणही मनांत चपापून बोकडास खांद्यावरून खालीं उतरून पहातो तों तो पूर्वीप्रमाणेंच दिसला. तेव्हां तो त्या ठकास ह्मणाला, तू आंधळा तर नाहींस? बकऱ्याला डुकर कसें म्हणतोस? पलीकडल्या खेड्यांतील पाटलानें यज्ञाकरितां मला हा बोकड दिला आहे.

**ठक**—महाराज, रागावूं नका, हात जोडितों. मला दिसलें तें बोललों. तुम्हास खोटें वाटत असेल तर ऐकूं नका. तो पाटील मोठा लुच्चा आहे, त्यानें तुम्हांला फसविलें.

पुन: बोकडास खांद्यावर घेऊन ब्राह्मण चालला तों कांहीं वेळानें तिसरा ठक भेटला, तो ह्मणाला, शिव शिव! भटजी महाराज, खांद्यावर गाढवाचें पोर कशाला घेतलें? आम्ही कुणबी देखील त्याला शिवत नाहीं. कोणी बघितलें तर तो काय म्हणेल? कोणी आलें नाहीं तोंच याला टाकून निघून जा. मी कोणाजवळ बोलत नाहीं.

हें ऐकून तो ब्राम्हण मनांत म्हणाला, तीनदा असें झालें. तिघेही खोटें कसें बोलतील? आणि खोटें बोलून यांना तरी काय फायदा आहे? हा बकरा कोणी तरी मायावी राक्षस आहे, म्हणून वेगळालीं रूपें धरितो. पुढें गांवांत गेल्यावर काय होईल कोण जाणे. उगाच फजिती करून घेण्यापेक्षां याला टाकावें हें बरें. उद्यां दुसरा कोठें तरी खात्रीचा बोकड पाहूं, असें म्हणून तो अग्निहोत्री त्या बोकडाला तेथेंच टाकून देऊन आपणास कोणीं पाहूं नये म्हणून पळत घरीं गेला.

### तात्पर्य.

पुष्कळ ठक मिळाले ह्मणजे भोळसर मनुष्यास कसें फसवितील याचा नेम नाहीं. अशा प्रसंगीं फार जपून वागलें तरच त्यांच्या हातांतून सुटका होईल.

# गोष्ट २६.

## सिंह आणि कोल्हा.

एका अरण्यांत खरनखर नांवाचा सिंह रहात असे. तो एके दिवशीं भक्ष्य शोधण्यास रानांत हिकडे तिकडे पुष्कळ फिरला, तरी शिकार सांपडली नाहीं. तेव्हां एक गुहा आढळली, तींत तो शिरला. आणि म्हणाला, येथें जनावरांची रहाण्याची जागा दिसत आहे, येथें जें कोण रहात असेल तें वस्तीस आलें म्हणजे आपणास आयतेंच खावयास सांपडेल. असें म्हणून तो तेथें दडून राहिला. कांहीं वेळानें दिवस मावळून रात्र झाल्यावर तेथें रहाणारा कोल्हा गुहेजवळ आला, तेव्हां सिंहाचीं पावलें त्याच्या दृष्टीस पडलीं. तेव्हां तो म्हणाला, मेलोंरे मेलों. या गुहेंत सिंह गेला आहे यांत संशय नाहीं. आतां काय करावें? दुसरीकडे तरी कोठें जावें? पण खात्री करून घेतल्याशिवाय घर सोडून जाऊं नये असें मनांत आणून गुहेच्या दारापाशीं उभा राहून म्हणाला, हे गुहे, मला आज आंत कां बोलावीत नाहींस? रोज. मी आलों म्हणजे मला हाक मारितेस, आणि मींही तुला उत्तर देतों. जर आज तू मजशीं बोलणार नाहींस, तर मी दुसऱ्या गुहेंत रहावयास जाईन.

हें ऐकून सिंह मनांत म्हणाला, ही गुहा रोज याला हाक मारिते, पण आज माझ्या भयानें ती बोलत नाहीं असें दिसतें. तर गुहेबद्दल आपणच याला हाक मारावी म्हणजे हा आंत येईल. नंतर मोठ्यानें त्यास म्हणाला, मित्रा, लवकर ये. आज इतका उशीर कां झाला? सिंहाचा शब्द ऐकतांच कोल्हा पळून गेला. त्याच्या शब्दाचा गुहेंत प्रतिध्वनि झाला तो पुष्कळ लांब ऐकूं गेल्यामुळें रानांत सिंह आला आहे असें समजून सर्व जनावरें सावध होऊन पळून गेलीं, त्यामुळें सिंहास उपाशीं मरावें लागलें.

### तात्पर्य.

चोर कितीही लबाड असला तरी माग काढणारा चांगला हुशार असला म्हणजे तो त्या चोरालाच फसवितो.

---

# गोष्ट २७.

## बेडूक आणि साप.

एका आडांत गंगदत्त नांवाचा बेडूक राहात होता. एके समयीं त्याला इतर बेडकांनीं फारच त्रास दिला. त्यामुळें तो रहाटाच्या माळेवर बसून बाहेर आला. त्याला वाटलें कसेंही करून या भाऊबंदांची खोड मोडली पाहिजे.

नंतर एका वेळीं एक कृष्णसर्प बिळांत जातांना त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां मनांत म्हणाला, याला त्या आडांत नेऊन सगळ्या भाऊबंदांचा उच्छेद करून टाकावा. हा आपला शत्रु आहे तरी असा कांहीं उपाय केल्याशिवाय त्यांचा सूड घेतां येणार नाहीं. कांठ्यानेंच कांटा काढून टाकिला पाहिजे. असें मनांत आणून बिळाजवळ जाऊन म्हणाला, मित्रा, मला भेट दे. त्याचा शब्द ऐकून सर्प मनांत म्हणाला, हा सापाचा शब्द दिसत नाहीं. हा आपल्या जातीचा नसून कोणी तरी परजातीचा आहे, यांत संशय नाहीं. माझा तर परजातींतील कोणत्याही प्राण्यांशीं स्नेह नाहीं. याकरितां येथूनच हा कोण आहे याची चवकशी करावी. कारण कुलशील समजल्याशिवाय कोणाची संगत करूं नये. कदाचित् कोणी मला मारण्यास आला नसेल कशावरून? असें मनांत आणून तो तेथूनच म्हणाला, तू कोण आहेसरे?

**बेडूक**—मी गंगदत्त नांवाचा बेडूक आहें. तुजशीं स्नेह करण्यास आलों आहें.

हें ऐकून साप म्हणाला, तुझी ही गोष्ट खोटी आहे. अग्नीचा आणि तृणाचा कधीं स्नेह झाला आहे काय? कोणी आपल्या हाडवैऱ्याजवळ कधींही येणार नाहीं. तू उगाच कांहीं तरी गप्प मारतोस.

**गंगदत्त**—तुमचें आमचें हाडवैर ही गोष्ट खरी, पण स्वजातीच्या लोकांनींच मला पीडा दिली आहे, याकरितां तुम्हाकडे आलों. सर्वस्वाचा नाश होण्याचा प्रसंग आला म्हणजे शत्रूलाही शरण जाऊन थोड्याबहुताचें रक्षण करावें.

**साप**—तुला कोणी पीडा दिली.

**बेडूक**—भाऊबंदांनीं.

**साप**—तू रहातोस कोठें? आडांत किंवा विहिरींत?

**बेडूक**—आडांत. तो आड चांगला चिरेबंदी आहे.

**साप**—तर मग मला आडांत जातां यावयाचें नाहीं. गेलों तरी तेथें मला राहावयास बीळ मिळावयाचें नाहीं. याकरितां तूं निघून जा. मी येत नाहीं. परिणामीं हितकारक होईल तें केलें पाहिजे.

**बेडूक**—अहो, तुम्ही चला तर खरे. मी तुम्हास राहाण्यास चांगली जागा देईन. आडामध्यें एका बाजूस एक भोंक आहे, त्यांत राहून बेडकांस खुशाल खात जा.

हें ऐकून सर्प मनांत म्हणाला, मी आतां म्हातारा झालों आहें, उंदीर वगैरे खाण्यास मला सामर्थ्य नाहीं, या कुलांगारानें सांगितलेला उपाय बरा आहे. आडांत राहून बेडूक खाऊन उपजीवन करावें हें चांगलें. नंतर तो बेडकास म्हणाला, गंगदत्ता, तुझा आग्रहच असेल तर चल येतों.

**गंगदत्त**—मी तुला तेथें नेऊन राहण्यास जागा वगैरे चांगली दाखवितों. पण माझ्या इष्टमित्रांस त्वां धक्का लावूं नये, हें कबूल केलें पाहिजे. मी ज्यांना दाखवीन त्यांसच त्वां मारावें.

**साप**—आतां तुझा आमचा स्नेह झाला. त्या अर्थी तुला भिण्याचें कांहीं कारण नाहीं. तूं सांगशील तेवढ्यांसच मी खाईन.

याप्रमाणें करार करून ते दोघेही आडाजवळ आले आणि रहाटाच्या माळेवरून आंत शिरले. नंतर गंगदत्तानें दाखविलेल्या बिळांत बसून त्यानें दाखविलेल्या बेडकांस खाण्याचा क्रम त्यानें सुरू ठेविला. कांहीं दिवसांनीं बेडूक संपल्यावर तो गंगदत्तास म्हणाला, आतां तुझे भाऊबंद संपले, मला आतां कांहीं तरी खावयास दे. त्वांच मला येथें आणिलें.

**गंगदत्त**—त्वां मित्राचें काम केलें, आतां या राहाटाच्या माळेवरून आलास तसा परत जा.

**साप**—गंगदत्ता, तुझें बोलणें बरोबर नाहीं. आतां माझ्या बिळांत दुसरा साप राहूं लागला असल्यास म्यां काय करावें? याकरितां तुझे इष्टमित्र राहिले आहेत, त्यांपैकींच दररोज एकेक बेडूक मला देत जा, नाहीं तर सगळ्यांना एकदम मारून टाकीन.

हें ऐकून गंगदत्त मनांत म्हणाला, या दुष्ट सापाला येथें आणून म्यां काय हा मूर्खपणा केला? बलिष्ठ शत्रूबरोबर स्नेह करणें हें विष भक्षण केल्याप्रमाणेंच आहे, असें म्हटलें आहे तें खरें आहे. आतां

याला एकेक बेडूक खावयास द्यावा हें बरें. सर्वस्व जाण्याचा प्रसंग आल्यास थोडें देऊन बाकीच्याचें रक्षण करावें हें चांगलें.

याप्रमाणें विचार करून तो त्यास दररोज एकेक बेडूक देऊं लागला. सापही त्यापासून एकेक बेडूक घेऊन त्यास कळूं न देतां आणखीही खात असे. एकदा थोड्याकरितां करार मोडिला म्हणजे मग तेवढ्यानेंच रहात नाहीं. कांहीं दिवसांनीं सगळे बेडूक संपल्यावर त्यानें गंगदत्ताचा मुलगा पृथुदत्त खाल्ला, तेव्हां गंगदत्त मोठ्यानें ओरडून शोक करूं लागला. त्याची बायको त्यास ह्मणाली, आतां कशाला रडतां? सर्व लोक मेल्यावर तुमचें तरी रक्षण कोण करील? याकरितां अजून तरी येथून निघून जाण्याचा किंवा याला मारण्याचा विचार करा. कांहीं दिवसांनीं त्या आडांत गंगदत्ताशिवाय कोणीही बेडूक राहिला नाहीं. तेव्हां साप म्हणाला, गंगदत्ता, मला फार भूक लागली, बेडूक संपले, मला येथें घेऊन आलास याकरितां माझ्या खाण्यापिण्याची तू तजवीज केली पाहिजे.

**गंगदत्त**—मित्रा, मी जिवंत आहें तोंपर्यंत तू खाण्याची काळजी करूं नको. मला जाऊं देशील तर मी दुसऱ्या आडांतील बेडकांस भूलथाप देऊन येथें आणितों.

**साप**—मला तुला तर मारणें नाहींच, कारण तू माझ्या भावासारखा आहेस. बोललास याप्रमाणें करशील तर मी तुला बापाप्रमाणें मानीन. लवकर जाऊन काम करून ये.

याप्रमाणें सापाचें भाषण ऐकून गंगदत्त रहाटाच्या माळेवरून बाहेर पडला. सापही पुष्कळ दिवस त्याची वाट पहात होता, परंतु तो येईना. तेव्हां त्या विहिरींतील एक घोरपड बाहेर जात येत असे तिला तो म्हणाला, बाई, थोडें काम करशील काय? तुझी माझी ओळख आहे. बाहेर जाऊन गंगदत्ताला शोधून काढून त्याला माझा निरोप सांग कीं, दुसरे बेडूक येत नसले तर तू एकटाच परत ये. तुजवांचून मला येथें करमत नाहीं. मी शपथ वाहून सांगतों कीं, तुझ्या जिवाला येथें काडीमात्र भय नाहीं. नंतर घोरपडीनें बाहेर जाऊन गंगदत्तास तो निरोप कळविला. तो ऐकून गंगदत्त ह्मणाला, बाई, सापाला माझा परत निरोप सांग कीं, तू भुकावलेला असून निर्दय आहेस. तू कोणतेंही पातक करण्यास भिणार नाहींस. गंगदत्त पुनरपि त्या आडांत यावयाचा नाहीं.

### तात्पर्य.

मूर्ख असतो तो स्वजातीच्या लोकांशीं कलह करून परक्याच्या साहाय्यानें त्यांचा नाश करितो. परंतु त्यांचा नाश झाल्यावर त्यास कोणीही मदत करणारा नसल्यामुळें परक्यास त्याचाही नाश सहज करितां येतो. स्वजातीशीं भांडण झालें तरी तें तोडण्यास परक्याकडे व विशेषेंकरून शत्रूकडे कधींही जाऊं नये. आपल्या लोकांशीं वांकडें पडल्यामुळें जें नुकसान होतें, त्यापेक्षां परकी लोकांशीं पडल्यानें फार मोठा नाश होतो.

---

## गोष्ट २८.

## कोल्हा, सिंह आणि गाढव.

एका रानांत करालकेसर नांवाचा सिंह रहात असे. त्याच्याजवळ धूसरक नांवाचा एक कोल्हा दास्य करून असे. एके समयीं हत्तीबरोबर युद्ध करून सिंह जखमी झाला; त्यामुळें त्यास पाऊलभर देखील चालवेना. धूसरकही खावयास न मिळाल्यामुळें अगदीं मरावयास टेंकला. एके दिवशीं तो सिंहास ह्मणाला, महाराज, उपासमार होऊन जाग्यावरून हालवतही नाहीं. आतां माझ्यानें तुमची चाकरी कशी होईल?

**सिंह**—अरे, एकादी शिकार शोधून काढ. माझी अशी दशा झाली आहे तरी ती मारून तुला खावयास देतों.

तें ऐकून कोल्हा शिकार शोधावयास गेला. त्यानें एका गांवाजवळ लंबकर्ण नांवाचा गाढव उकिरडा फुंकीत होता तो पाहिला. तेव्हां त्याजवळ जाऊन त्यास ह्मणाला, मामा, नमस्कार करितों. फार दिवसांनीं भेट झाली. इतके वाळलांत कशानें?

**लंबकर्ण**—बाळा, कायरे सांगूं? माझा धनी परीट मोठा निर्दय आहे. तो मजवर फारच ओझें लादितो. खावयास मुठभर गवत देखील घालीत नाहीं. या दुष्टाचें ओझें वहावें आणि उकिरडा फुंकावा, अशी माझी स्थिति आहे. मग वाळणार नाहीं तर काय होईल?

**धूसरक**—मामा, असें असेल तर तुला मी एक सुंदर जागा दाखवितों. तेथें पाचेसारखें हिरवेंगार गवत खाशील तितकें असून पिण्यास ह्मणशील तर स्वच्छ पाण्याची नदी तुडुंब भरून चालली आहे. मजबरोबर येशील तर आपण बोलत चालत सुखानें काळ घालवूं.

**लंबकर्ण**—बाळा, तू ह्मणतोस तें खरें, पण आह्मी गांवठी पशु. रानांत आलों तर मला वनपशु मारतील. मग तुझ्या चांगल्या जागेचें मला काय करावयाचें ?

**धूसरक**—मामा, छे छे, असें बोलूं देखील नको. मी जवळ असल्यावर तुला कोणाचेंही भय नाहीं. तेथें कोणी परकी नाहीं. पण तुजसारख्याच परटाच्या घरीं कष्ट करण्यास त्रासून तीन गाढवी कांहीं दिवसांपूर्वीं तेथें आल्या. त्या नव्या तरण्या असून तेथें आल्यापासून कोंवळें गवत यथेच्छ खाऊन पुष्ट झाल्या आहेत. त्या मला ह्मणाल्या, तू आमचा खरा मित्र असशील तर गांवांत जाऊन आमच्याजोगता एक पति घेऊन ये. म्हणून मी तुला तेथें नेण्याकरितां आलों आहें.

हें कोल्ह्याचें भाषण ऐकून गाढव कामातुर होऊन त्याला म्हणाला, असें असेल तर चल पुढें हो. कामाची पीडा मोठी कठीण आहे, तिच्यायोगानें फसून गाढव कोल्ह्याबरोबर सिंहाजवळ गेला. सिंह त्याला मारणार होता, परंतु आजारी असल्यामुळें त्याच्यानें लवकर उठवलें नाहीं; त्यामुळें गाढव एक चपराक खाऊन त्याच्या हातांतून निसटून पळून गेला. हें पाहून कोल्हा रागावून म्हणाला," महाराज, तुमचें हें कसलें मारणें? गाढव देखील तुमच्या हातून पळून जातो, तर मग हत्तीशीं युद्ध कसें कराल? समजलें तुमचें सामर्थ्य.

सिंह किंचित् साश्चर्य होऊन ह्मणाला, अरे मी काय करूं ? मी तयारींत नव्हतों. हत्ती देखील माझ्या तडाक्यांतून निसटून जाणार नाहीं, मग गाढवाची काय कथा ?

**कोल्हा**—आणखी एकवार त्याला तुमच्याजवळ आणितों. पण आतां तरी तयारींत असा.

**सिंह**—अरे मला प्रत्यक्ष पाहून गेला तो आतां कसा येईल ? आतां दुसरें एकादें जनावर शोधून काढ.

**कोल्हा**—तुम्हाला त्याची काळजी कशास पाहिजे ? तुम्ही तयारींत असा म्हणजे झालें.

असें बोलून कोल्हा गाढवाच्या वाटेनें चालला तों गाढव वाटेवरच एके ठिकाणीं चरत असतां त्याला भेटला. तो कोल्ह्यास पाहून ह्मणाला, भाच्या, फार चांगल्या ठिकाणीं त्वां मला नेलें ! प्राणावरच

प्रसंग गुदरला होता, त्याच्या वज्रप्रहारासारख्या चापटीच्या तडाक्यांतून सुटलों म्हणून बरें झालें. तें असलें भयंकर जनावर तरी कोण होतें ?

हें ऐकून कोल्हा हंसून म्हणाला, अरे ती गाढवीच. तू आलेला पाहून प्रेमानें कडकडून भेटण्यास त्वरेनें पुढें आली. तू तर भित्र्यासारखा पळून आलास. आतां तर तिला तुझा वियोग अगदीं सहन होत नाहीं. तू पळूं लागलास तेव्हां तुला प्रेमानें धरावें ह्मणून तिनें पुढें हात केला, दुसरें कांहीं कारण नाहीं. आतां चल, तू आला नाहींस तर ती जीव देईल. ती ह्मणाली, लंबकर्ण जर माझा नवरा होणार नाहीं, तर अग्नींत अथवा पाण्यांत उडी टाकून किंवा विष खाऊन जीव देईन. आतां माझ्यानें त्याशिवाय क्षणभर देखील रहावत नाहीं. याकरितां मामा, कृपा करून पुनः तेथें चला. नाहीं तर तुम्हाला स्त्रीहत्येचें पातक लागेल.

हें कोल्ह्याचें भाषण खरें मानून तो पुनः त्याबरोबर तेथें जाण्यास निघाला. दैव प्रतिकूळ झालें म्हणजे सर्वप्रकारें बुद्धि नष्ट होते. सिंहही तयारीनें उभा राहिला होता, तेथें गेल्याबरोबर गाढवाच्या आंगावर झडप घालून त्यानें त्यास तत्काळ फाडून टाकिलें.

### तात्पर्य.

मनुष्य कामातुर झाला म्हणजे त्याचा कोणत्या रीतीनें नाश होईल याचा नेम नाहीं. खड्डा प्रत्यक्ष दिसत असला तरी कामांध मनुष्य त्यांत बुद्ध्या उडी टाकून नाश पावतो. विषयसंबंधानें त्यास पाहिजे त्याचें बोलणें खरें वाटतें. तो कितीही मोठा असला तरी यःकश्चित् मनुष्य त्याचा सहज नाश करितो.

---

## गोष्ट २१.

### राजा आणि कुंभार.

एका गांवांत एक कुंभार रहात होता, त्याच्या आंगणांत पुष्कळ फुटकीं खापरें पडलेलीं होतीं. तो एके दिवशीं रात्रीस दारू पिऊन झोकांडे खात घरीं आला असतां आंगणांत त्या खापरांवर पडला. तेव्हां एक खापराचा कांठ त्याच्या कपाळांत शिरला, त्यामुळें मोठी

जखम होऊन सर्व शरीर रक्तबंबाळ झालें. जखम मोठीच भयंकर होती; पण पुष्कळ उपाय केल्यामुळें ती बरी झाली. पुढें कांहीं वर्षांनीं त्या प्रांतांत दुष्काळ पडल्यामुळें धंदा चालत नाहींसा झाला, तेव्हां तो कुंभार परदेशांत कोठें चाकरी पहाण्यास गेला. त्या ठिकाणीं कोणी शिपायी त्याच्या ओळखीचे होते; त्यांच्या वशिल्यानें त्यास सैन्यांत शिपायाची जागा मिळाली. एके दिवशीं राजा सैन्यास पहावयास आला असतां हा नवा शिपायी त्याच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्याच्या कपाळावर मोठी जखम पाहून त्यास वाटलें हा कोठेंतरी लढाईंत लागलेला वार आहे. हा मोठा शूर शिपायी आहे, यांत संशय नाहीं. असें मनांत आल्यामुळें राजानें त्यास सैन्यांत मोठ्या हुद्द्याची जागा दिली. त्यामुळें पुष्कळांस वाईट वाटलें. कित्येकांस याची गोम माहीत होती; परंतु राजाच्या भयानें कोणी कांहीं बोलले नाहीं. कांहीं दिवसांनीं राजाच्या मुलुखावर शत्रूंनीं स्वारी केल्यामुळें लढाईची कडेकोट तयारी सुरू झाली. घोडेस्वार, पायदळ, यांच्या वेगळाल्या टोळ्या करून त्यांजवर शूर व पराक्रमी असे अधिकारी राजानें नेमिले. त्या वेळेस हा कुंभार मोठा पराक्रमी आहे असें समजून त्यास सर्वांवर मुख्य सेनापति नेमावें असें मनांत आणून राजानें त्यास एकांतीं बोलाविलें, आणि पुष्कळ स्तुति करून त्यास विचारिलें, शिपायी बुवा, हा वार कोणत्या लढाईंत लागला ?

**कुंभार**—महाराज, हा वार नव्हे, मी जातीचा कुंभार आहें. माझ्या घरीं फुटलेल्या मडक्यांचीं पुष्कळ खापरें आहेत, एके दिवशीं दारू पिऊन झोकांडे खात घरीं आलों तों खापरांवर पडलों. तेव्हां मडक्याचा कांठ कपाळांत शिरला, त्यामुळें ही मोठी खोंच पडली.

हें ऐकून राजा मनांत लज्जित होऊन म्हणाला, या कुंभारड्यानें शिपायीपणाचा आव घालून आम्हांस फसविलें. असें म्हणून त्यानें हुजऱ्याकडून त्यास गचांड्या देववून घालवून दिलें.

## तात्पर्य.

कित्येक लोक शौर्य, विद्वत्ता, वगैरे आंगीं नसलेल्या गुणांचा आव घालून लोकांस फसवितात. परंतु प्रसंग आला म्हणजे त्यांची

R. Y. Jadhav.

लोकांत जी फजिती होते तिजमुळें त्यांस लोकांत तोंड दाखविण्यास जागा रहात नाहीं. यासाठीं कोणत्याही गोष्टीचा खोटा डौल न मिरवितां आपल्या खऱ्या योग्यतेप्रमाणें वागावें हेंच सर्वांस हितावह आहे.

---

## गोष्ट ३०.

## सिंह आणि कोल्ह्याचें पिलुं.

एका अरण्यांत सिंहाचें जोडपें रहात होतें. एका वेळीं सिंहीण गरोदर होऊन दिवस भरल्यावर प्रसूत झाली, तेव्हां तिला दोन पुत्र झाले. सिंह दररोज हरिण मारून तिला खावयास देत असे. एके दिवशीं तो संध्याकाळपर्यंत फिरला तरी त्याला कांहीं शिकार सांपडली नाहीं. संध्याकाळीं परत येतेवेळेस एक कोल्ह्याचें पिलुं सांपडलें; तें लहान असल्यामुळें त्यानें तोंडांत धरून सिंहिणीला जिवंतच नेऊन दिलें.

**सिंहीण**—पतिराज, आज खावयास काय आणिलें आहे ?

**सिंह**—या कोल्ह्याच्या पिल्लाशिवाय आज दुसरें कांहीं मिळालें नाहीं. हें लहान असल्यामुळें न मारितां तसेंच जिवंत आणिलें आहे. आज यावरच पथ्याचा निर्वाह कर. सकाळीं दुसरें कांहीं तरी आणून देईन.

**सिंहीण**—प्राणनाथ, हा लहान बच्चा आहे म्हणून तुम्ही मारिला नाहीं. मग मी तरी आपल्या पोटाकरितां याला कशास मारूं ? हा तिसरा मुलगा समजून याचें मी पालन करितें.

असें म्हणून ती आपल्या बच्चांबरोबर त्यासही स्तनपान देऊं लागली; त्यामुळें तोही चांगला पोसला. ते तिघेही बच्चे स्वजात परजात वगैरे कांहींएक न समजतां एकमेकांशीं प्रेमानें खेळत वागडत असत. एके दिवशीं तिघेही वनांत फिरत असतां त्यांनीं एक हत्ती पाहिला. तेव्हां ते दोन्ही सिंहाचे बच्चे रागानें डोळे लाल करून त्याच्या अंगावर चालले. हें पाहून त्यांस कोल्हा म्हणाला, अरे हा हत्ती तुमचा शत्रु आहे, याजवळ जाऊं नका. असें म्हणून आपण पाठीमागें फिरून पळत घरीं गेला. वडील भाऊ भ्याला असें पाहून त्या दोघांचेंही धैर्य खचलें. तेव्हां तेही परत गेले आणि भावाचें कृत्य आईबापांजवळ सांगून थट्टेनें हंसूं लागले. त्यामुळें कोल्ह्यास फारच राग

Poona city (?1) Rastas Peth

आला. तो डोळे वटारून रागानें लाल होऊन त्यांस पुष्कळ शिव्या देऊं लागला. तेव्हां सिंहिणीनें त्यास एकांतीं नेऊन सांगितलें, बाळा, असें बोलूं नये. हे तुझे धाकटे भाऊ आहेत. हें तिचें बोलणें ऐकून अधिकच रागावून म्हणाला, काय, यांच्यापेक्षां मी शौर्यानें, रूपानें व शहाणपणानें कमी आहें? हे मला काय ह्मणून हंसतात? यांना ठार मारून टाकिल्याशिवाय मी रहाणार नाहीं.

आपल्या मुलांनीं त्याचा जीव घेऊं नये अशी सिंहिणीची इच्छा होती, म्हणून ती त्यास ह्मणाली, मुला, तू शूर असून शहाणा आहेस; तसाच रूपवान्‌ही आहेस. पण ज्या कुळांत तू उत्पन्न झाला आहेस, त्यांत कोणी हत्ती मारीत नाहींत. तू कोल्हा आहेस. कृपा करून आपल्या जातींत जा, नाहीं तर ते तुला फाडून टाकितील. हें सिंहिणीचें भाषण ऐकून कोल्हाही पळून गेला.

### तात्पर्य.

कित्येक हलक्या कुळांतले असतात, त्यांस मोठ्याचा आश्रय मिळाला म्हणजे आपण कोण आहों, याचें भान त्यांस रहात नाहीं. मोठेपणाचा डौल घालून यजमानाच्या कुटुंबांतील लोकांशीं द्वेष करूं लागतात, त्यामुळें मोठ्या लोकांशीं वांकडें पडून आश्रय सोडून त्यांस पळून जावें लागतें. यजमानाची कितीही कृपा असली तरी मोठ्या लोकांशीं द्वेष करून हलकटाचा निभाव लागणार नाहीं.

---

## गोष्ट ३१.

## वाघाचें कातडें पांघरलेला गाढव.

एका गांवांत शुद्धपट नांवाचा एक परीट रहात असे. त्याजवळ एक गाढव होता. त्यास फारच थोडी वैरण मिळे, त्यामुळें तो अगदीं वाळून थकून गेला. हें पाहून एके दिवशीं परटानें एक वाघाचें कातडें मिळवून आणिलें आणि तें गाढवावर घालून त्यास लोकांच्या शेतांत तो रात्रीस चरावयास सोडी. त्यास वाघ मानून शेतकरीही भिऊन त्यास हांकण्यास पुढें जात नसत. रात्रीस यथेच्छ चरून पहाटेस गाढव परटाच्या घरीं येई, याप्रमाणें पुष्कळ दिवस चाललें होतें. यामुळें गाढव लठ्ठ होऊन मस्ती करूं लागला, ध-

त्याला बांधून देखील देईनासा झाला. एके दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें शेतांत चरत असतां गाढवीचें ओरडणें ऐकून तोही मस्तीनें ओरडूं लागला. तेव्हां हा वाघाचें कातडें पांघरलेला गाढव आहे असें समजून सर्व शेतकरी त्यास धोंडे व सोटे मारूं लागले; त्यामुळें तो मरून गेला.

## तात्पर्य.

कितीही खोटा मोठेपणा धरिला तरी, मूळस्वभाव जावयाचा नाहीं. हलक्यानें मोठेपणाचा फुका डौल घालून लोकांस फसवूं नये. कांहीं दिवस लोक फसले तरी शेवटीं त्याचें ढोंग बाहेर पडून त्यास मूळचीही स्थिति प्राप्त न होतां प्राणावर देखील संकट येतें.

---

# गोष्ट ३२.

## चार जांवई.

विकंटक नांवाच्या शहरीं ईश्वर नांवाचा एक श्रीमंत सावकार रहात असे. त्यास चार जांवई होते. ते सर्व एका वेळींच सासुरवाडीस सासऱ्यास भेटण्याकरितां आले. सासऱ्यानेंही त्यांचा चांगला आदरसत्कार केला. सावकार जात्या खर्चिक असे; तशांत जांवई घरीं आले मग काय विचारतां! जितकें करावें तितकें थोडेंच. पंचपक्वान्नांच्या मोठमोठ्या पुष्कळ मेजवान्या केल्या. शेलेपागोटीं, धोतरजोडे, शालजोड्या वगैरे वस्त्रें दिलीं. गोफ, कंठ्या, सलकडीं वगैरे अलंकारभूषणें दिलीं. याप्रमाणें जांवईबोवांची दररोज खाण्यापिण्याची चमन चालल्यामुळें त्यांस घरीं जावेंसें वाटेना. एकसारखे सहा महिने झाले तरी ते जाण्याची गोष्ट बोलतना. तेव्हां सावकार बायकोस ह्मणाला, जांवईबोवांची चंगळ चालल्यामुळें घरीं जाण्याचें ते नांवसुद्धां घेत नाहींत. अपमान झाल्याशिवाय त्यांस येथून जावेंसें वाटणार नाहीं. तर आज जेवणाच्या वेळेस कोणासही पाय धुण्यास पाणीं देऊं नये, म्हणजे अपमान झाला असें मानून ते निघून जातील. त्याप्रमाणें करितांच एक जांवई लागलाच संध्याकाळीं निघून गेला. दुसऱ्या दिवशीं रोजच्यासारखा जांवयांचा थाटमाट न करितां त्यांस लहान लहान पाट व ताटें मांडिलीं. असें होतांच दुसरा निघून गेला. इतकें झालें तरी दुसरे दोन होते ते

हालतना. तेव्हां दुसरे दिवशीं जेवावयास कांहींएक गोड न करितां नुसत्या भाजीभाकरीचींच ताटें त्यांच्यापुढें ठेविलीं; असें होतांच तिसरा निघून गेला. चवथा खप्पी होता, तो इतकें झालें तरी हालेना. तेव्हां सावकारानें त्यास साफ सांगितलें कीं, जांवईबोवा, आतांच बिऱ्हाड उचलल्यास बरी गोष्ट आहे, नाहीं तर अर्धचंद्र बक्षीस मिळण्याची वेळ येईल. हें ऐकून तोही निघून गेला.

### तात्पर्य.

कित्येक लोक दुसऱ्याच्या घरीं पाहुणचारास गेले, आणि तेथें त्यांचें चांगलें आदरातिथ्य झालें, म्हणजे ते लवकर निघून जात नाहींत. यजमानाच्या मनांत आणखी एक दोन दिवस रहावें असें आहे तोंच पाहुण्यानें निघून जावें हें चांगलें. जो पाहुणा यजमानाच्या घरच्या माणसांची चुणूक पाहून चालत नाहीं, त्यास अपमान करून घेऊन निघून जा म्हणून घेण्याची वेळ येते.

---

## गोष्ट २२.

### म्हातारा नवरा.

एका शहरीं एक श्रीमंत वाणी रहात असे. त्याची म्हातारपणीं बायको मेली. तेव्हां आपणास पाणी देण्यास ममतेचें कोणी नाहीं, असें मनांत आणून त्यानें दुसरें लग्न करण्याचें योजिलें. एका दरिद्री धनलोभ्यानें त्याच्या वयाचा विचार न करतां त्यास आपली मुलगी दिली. ती वयांत आली तेव्हां नवरा म्हातारा असल्यामुळें फार कष्टी होत असे. ती त्याजकडे प्रेमानें नुसती पहात देखील नसे. एके दिवशीं तीं उभयतां रात्रीस निजलीं असतां घरांत चोर शिरला. तो तिला अगोदर समजल्यामुळें भिऊन ती म्हाताऱ्यास घट्ट कवटाळून धरूं लागली, तेव्हां हें तिचें प्रेमयुक्त आलिंगनच आहे असें वाटून त्यास मोठा आनंद झाला, यामुळें त्याच्या आंगावर रोमांच उभे राहिले. आज हिला इतकें प्रेम कां उत्पन्न झालें, याचा तो विचार करीत आहे इतक्यांत त्यासही चोर दिसला. तेव्हां चोराच्या भयानें ही मला कवटाळून धरिते असें मनांत येऊन तो तिला दूर करून चोराच्या आंगावर न जातां दुरूनच त्यास म्हणाला, बा चोरा, ही माझी स्त्री दररोज मजकडे पाठ करून निजते, पण आज तुझ्या कृपेनें ती माझें

आलिंगन करीत आहे, याकरितां रोज रात्रीस येऊन माझ्या घरांतून थोडथोडें द्रव्य नेत जा. त्यावरून चोरही नेहमीं रात्रीस त्याच्या घरीं चोरी करण्यास जाई. वाणी तरुण स्त्रीच्या आलिंगनाच्या गोडीनें चोराचा बंदोबस्त करीत नसे. याप्रमाणें चाललें असतां थोड्याच दिवसांत वाणी अगदीं भिकारी झाला. तेव्हां अर्थात चोरही येई-नासा झाला व त्यामुळें बायकोही त्याला कवटाळून धरीनाशी झाली.

### तात्पर्य.

पुष्कळ लोक वृद्धपणीं लग्न करतात, परंतु ज्याप्रमाणें आपणास तरुणपणीं वृद्ध स्त्री आवडत नाहीं त्याचप्रमाणें तरुणीस आपणही वृद्ध असलों तर आवडणार नाहीं; ही सहज समजण्यासारखी गोष्ट त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. यामुळें द्वितीय संबंध करून ते लोकांत आपली विटंबना करून घेतात. याकरितां दुसऱ्याच्या आयुष्याचा नाश करून पातक करण्यापेक्षां वृद्धपणीं लग्न न करणें हें चांगलें होय.

---

## गोष्ट ३४.

### जारिणी आणि कोल्ही.

एके गांवीं एक श्रीमान् वृद्ध शेतकरी रहात होता. त्याच्या दुसऱ्या लग्नाची बायको सुरूप आणि तरुण होती. तिला आपला नवरा वृद्ध म्हणून फार वाईट वाटत असे. त्यामुळें तिचें चित्त संसाराकडे लागेना. तें नेहमीं परपुरुषाकडे गुंतलेलें असे. एके दिवशीं एका तरुण चोराची व तिची एकांतीं गांठ पडली तेव्हां तो तीस म्हणाला, हे सुंदरी, तुझें लावण्य पाहून मी मदनाच्या बाणानें पीडित झालों आहें.

**शेतकरीण**—प्राणप्रिया, तुझ्या मनांत असेंच आलें असेल तर माझा नवरा अगदीं म्हातारा आहे; त्याच्यानें चालवत देखील नाहीं. त्यानें आपलें सर्व द्रव्य एका गांठोड्यांत बांधून ठेविलें आहे, तें मी चोरून घेऊन येतें. म्हणजे आपण दूर देशांतरीं कोठें तरी जाऊन चैन भोगून स्वस्थपणें राहूं.

**चोर**—ठीक आहे, तूं उद्यां मोठ्या पहांटेस गांठोडें घेऊन येथें ये, म्हणजे एकाद्या मोठ्या शहरांत जाऊन राहूं.

हें ऐकून ती आनंदित होऊन घरीं गेली, आणि रात्रिस नवरा

निजला असतां द्रव्याचें गांठोडें घेऊन संकेताच्या ठिकाणीं पळून गेली. चोरही तिला घेऊन दक्षिण दिशेकडे पळत चालला. याप्रमाणें दोघेंही कोणास उमगेल म्हणून भराभर चालून उजाडण्याच्या पूर्वींच चार कोस लांब गेलीं; तेव्हां तेथें एक मोठी नदी लागली. तेव्हां चोर मनांत म्हणाला, ही तरणीताठी बायको घरीं नेऊन मला काय करावयाचें? कोणी पाठलाग करीत आलें तर पायांत बिड्याच पडावयाच्या. आज ही नवऱ्याचें द्रव्य चोरून मजबरोबर आली. उद्यां मीही नकोसा झालों ह्मणजे हेंच द्रव्य चोरून ही तिसऱ्याचा हात धरून जाणार नाहीं कशावरून? सर्वकाळ हिला कोणी जपावें? आपणाला द्रव्य मिळालें ह्मणजे झालें. मुलेंबाळें सोडून हिच्या नादीं लागून काय करावयाचें? असा विचार करून तो तिला ह्मणाला, प्रिये, नदीस पाणी फार आहे. उतरण्याची जागाही मोठी बिकट आहे. याकरितां हें गांठोडें व चिरगूट पांघरूण सर्व डोकीवर घेऊन पलीकडे ठेवून येतों, ह्मणजे तुला नीट उचलून नेण्यास सांपडेल. ती म्हणाली, बरें आहे. नंतर तिनें सर्व चीजवस्त त्याच्या स्वाधीन केली. तेव्हां तो म्हणाला, प्रिये, अजून पुरतें उजाडलें नाहीं, व येथें कोणी मनुष्य नाहीं. तू नेसलेलें नेसलेंलुगडें देखील दे. तें पलीकडे कोरडें नेऊन ठेवितों; म्हणजे जाते वेळेस भिजण्याचें भय नाहीं. जातां क्षणीं कोरडें नेस म्हणजे पुढें चालूं लागूं. याप्रमाणें केल्यावर तो चोर सर्व वस्त्रपात्र घेऊन नदी उतरून पलीकडच्या वाटेनें भराभर चालूं लागला. इकडे ती त्याची परत येण्याची वाट पहात होती; परंतु पलीकडे गेल्यावर त्यास पळतांना पाहून ती मोठ्या काळजींत पडली. इतक्यांत एक कोल्ही तोंडांत मांसाचा तुकडा धरून तेथें आली तों नदीच्या कांठीं एक मोठा मासा तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां तोंडांतला मांसाचा तुकडा खालीं ठेवून ती तो मासा धरावयास गेली. इतक्यांत एक घार येऊन तिनें तो मांसाचा तुकडा उचलून नेला; व मासाही कोल्हीस पाहून भिऊन पाण्यांत गेला. तेव्हां ती कोल्ही घारीकडे पहात उभी राहिली. मासा नाहीं व मांसाचा तुकडाही नाहीं, व्यर्थ शीण मात्र झाला. हें पाहून ती जारिणी तिला म्हणाली, मांस घारीनें नेलें, मासा पाण्यांत गेला; आतां वर बघून काय करितेस?

हें ऐकून कोल्ही रागानें म्हणाली, माझ्यापेक्षां तू दुप्पट शहाणी

आहेस, यार नाहीं आणि नवराही नाहीं. आतां नागवी होऊन काय पहातेस?

### तात्पर्य.

वृद्धपणीं बायको नसल्यामुळें जे लग्न करितात, त्यांस बायकोपासून होणारें सुख मिळत नाहीं एवढेंच नव्हे; तर जवळ जें थोडें बहुत द्रव्य असतें तेंही नाहींसें होऊन अधिक दुःखांत पडून अपकीर्तीस पात्र व्हावें लागतें. तसेंच, नशीबानें आपणास जो भर्ता प्राप्त झाला, त्याच्या योगानें संतुष्ट न होतां, ज्या स्त्रिया क्षुद्र विषयसुखाकरितां दुर्मार्गाकडे वळतात, त्यांस तें क्षुद्र सुख प्राप्त न होतां मोठें पातक लागून जगांत फटफजिती, व छि थू, होऊन आजन्म दुःखसागरांत रहावें लागतें. याकरितां दुराचरणाकडे न वळतां प्राप्त झालेल्या स्थितींत संतुष्ट रहाणें हाच पुण्याचा व सुखाचा मार्ग आहे.

---

## गोष्ट ३५.

## शहाणा कोल्हा.

एका वनांत चतुरक नांवाचा एक कोल्हा रहात असे. एके दिवशीं त्यास रानांत आपोआप मेलेल्या एका हत्तीचें प्रेत आढळलें. त्याचें मांस खाण्याकरितां तो त्याच्या भोंवतालीं फिरत होता; परंतु कातडें जाड असल्यामुळें त्याच्यानें तें तुटेना. इतक्यांत फिरत फिरत तेथें एक सिंह आला. त्यास पहातांच कोल्ह्यानें जमिनीवर लोटांगण घातलें आणि म्हणाला, महाराज, मी आपला सेवक आहें. हा आपला हत्ती राखीत आहें. आतां आपण भोजनास आरंभ करावा.

हें ऐकून सिंह म्हणाला, दुसऱ्यानें मारिलेलें जनावर मी कधींही खात नाहीं. हा सगळाच मी तुला बक्षीस देतों. असें सिंहाचें भाषण ऐकून कोल्हा म्हणाला, आपल्या मोठेपणास हें योग्यच आहे. सिंह गेल्यावर तेथें एक वाघ आला, त्यास पाहून कोल्हा मनांत म्हणाला, एका दुष्टाला हात जोडून पायां पडून वाटे लाविलें तोंच हा दुसरा आला. हाही मोठा बलाढ्य आहे. याला फसविलेंच पाहिजे, एऱ्हवीं दुसरा उपाय नाहीं. असा विचार करून तो त्याकडे पाहून

ह्मणतो, मामा, येथें उभे राहिलां तर मराल मात्र; दुसरें कांहीं होणार नाहीं. सिंह आतांच या हत्तीला मारून दमल्यामुळें पाणी पिण्यास गेला आहे. जातेवेळेस त्यानें मला सांगितलें कीं, येथें वाघ आला तर हळूच येऊन मला सांग, ह्मणजे त्याला मारून टाकून रानांतले दुसरे सगळे वाघ नाहींतसे करून टाकितों. कारण मागें एकदा मी एका हत्तीला मारून एके ठिकाणीं ठेवून दुसरीकडे गेलो असतां एका वाघानें तो चावून उष्टा केला होता.

हें कोल्ह्याचें भाषण ऐकून वाघ म्हणाला, कोल्ह्याभाऊ, मला आज जीवदान दे. मी येथें आलों होतों ह्मणून सिंहाला सांगूं नको. असें म्हणून तो पळून गेला. तो गेल्यावर एक लांडगा तेथें आला. त्यास पाहून कोल्हा मनांत म्हणतो, याचे दांत बळकट आहेत, एकवार याकडून कोठेंतरी भोंक पाडून घ्यावें. असें मनांत आणून त्यास ह्मणाला, लांडगेदादा, फार दिवसांनीं भेटलास. तुला भूक लागली असेल. हा हत्ती सिंहानें मारून ठेविला आहे. त्यानें मला येथें राखण करण्यास ठेविलें आहे. तो आला नाहीं तोंच तुला हवें तितकें पोटभर खाऊन चालता हो.

**लांडगा**—कोल्ह्याभाऊ, असें असेल तर मला भूक लागली नाहीं. जातों मी आपला. जगलों तर खावयास पुष्कळ मिळेल.

**कोल्हा**—भिऊं नको. स्वस्थपणें खा. मी त्याला पहात बसतों. सिंह दूर दिसला ह्मणजे मी तुला सांगेन मग तूं लागलाच पळून जा.

लांडगा कोल्ह्याचें ह्मणणें मान्य करून हत्तीला चावूं लागला. इतक्यांत कातडें तुटलें असें पाहून कोल्हा म्हणाला, लांडगेदादा, पळेंपळ, सिंह आला. हें ऐकून लांडगा पळून गेला.

लांडगा गेल्यावर त्यानें पाडिलेल्या भोंकावाटे कोल्हा यथेच्छ मांस खाऊं लागला. कांहीं वेळानें तेथें दुसरा एक कोल्हा आला. त्याबरोबर युद्ध करून त्याचा पराजय करून चतुरकानें त्यास पळवून लाविलें. नंतर तो स्वस्थपणें हत्तीचें मांस खात पुष्कळ दिवस सुखानें राहिला.

## तात्पर्य.

शहाणे असतात ते वेगळाल्या शत्रूंशीं वेगळाल्या रीतीनें वागून आपलें काम करून घेतात. साम, दान, दंड, आणि भेद, यांपैकीं जेथें जो उपाय लागू पडेल तेथें तो योजून ते आपला मतलब साधून घेतात.

## गोष्ट ३६.

## कुत्रा आणि परदेश.

एका गांवीं चित्रांग नांवाचा कुत्रा रहात होता. एके वर्षी तेथें मोठा दुष्काळ पडल्यामुळें कुत्र्यास कोणी तुकडा घालीना. पुष्कळ कुत्रे मरून गेले. चित्रांगही वाळून अगदीं मरायास टेंकला. तेव्हां तो दूर देशीं गेला. तेथें सुबत्ता असल्यामुळें एका घरची मालकीण त्यास तुकडा टाकीत असे. त्यामुळें तो त्या घरींच राहूं लागला. तो बाहेर कोठें गेला कीं तेथील कुत्रे चोंहोंकडून त्यास चावूं लागत. यामुळें त्रासून तो मनांत म्हणाला, दुष्काळ असला तरी स्वदेश बरा. कारण तेथें कोणी मारीत तरी नाहीं. असा विचार करून तो स्वदेशीं परत आला. तेव्हां त्यास स्वदेशचे कुत्रे विचारूं लागले, चित्रांगा, तो देश कसा काय आहे, तिकडील लोक कसे आहेत, वगैरे आम्हांला तिकडील कांहीं बातमी सांग.

चित्रांग ह्मणाला, तो देश चांगला आहे. तेथें सुकाळ आहे. खाण्यापिण्यास मिळतें. पण एक मोठी अडचण आहे, ती ही कीं, आपल्या ओळखीचें कोणीच नाहीं. जो भेटेल तो परका. कोणास आपली दया येत नाहीं, जो भेटतो तो मारूं लागतो.

### तात्पर्य.

कोणत्याही कामाकरीतां परदेशांत जाण्याचा प्रसंग आला असतां तेथें कोणीतरी ओळखीचें असल्याशिवाय निभावणी लागणार नाहीं. याकरितां तेथें जाण्यापूर्वींच तेथील कोणाची तरी ओळख करण्याची तजवीज करून ठेवावी. नाहींतर काम न होतां हाल होऊन परत यावें लागेल.

---

## गोष्ट ३७.

## मुंगुस आणि पोर.

एका गांवीं देवशर्मा नांवाचा ब्राम्हण रहात होता. एके समयीं त्याची बायको प्रसूत होऊन मुलगा झाला. एके दिवशीं त्या ब्राम्हणाला मुंगसाचें एक पोर सांपडलें, तें त्यानें बायकोजवळ आणून दिलें, आणि सांगितलें कीं, याला घरांत पाळ ह्मणजे किडकांचे

भय बाळगण्याचें कारण नाहीं. ब्राह्मणीणही मुंगसाला दूध वगैरे घालून ममतेनें पाळीत असे; परंतु हा जात्या दुष्ट आहे असें समजून कोणी जवळ नसल्यास त्यास लेंकराजवळ जाऊं देत नसे. एके दिवशीं ती मुलास पाळण्यांत निजवून घागर घेऊन पाण्यास गेली. जातेवेळेस नवऱ्यास ह्मणाली, मी पाणीं आणण्यास विहिरीवर जातें; घरांत मुलगा निजला आहे; मुंगुस त्याजवळ जाईल तर पहात असा. ती पाणवठ्यावर गेली आणि शेजारणीशीं बोलत उभी राहिली, यामुळें ब्राह्मण दार ओढून बाहेर कामास गेला. इतक्यांत एक साप त्या घरांत शिरला. तो मुलाच्या हांतरुणाकडे जात आहे असें पाहून त्याच्या आंगावर जाऊन मुंगसानें त्याचे तुकडे तुकडे केले. नंतर मालकीण घरीं आली तेव्हां मुंगुस आनंदानें लाडीगोडी लावीत तिच्या पुढें गेला. त्याचें रक्तबंबाळ तोंड पाहून तिच्या मनांत धस्स झालें. तिला वाटलें, यानें आपला मुलगा खास मारिला. असें मनांत येऊन तिनें रागानें मुंगसाच्या डोकीवर भरलेली घागर आपटली, त्याबरोबर तो मरून गेला. मुंगसाला मारून ती मोठ्यानें विलाप करीत घरांत गेली, आणि पहाते तों मुलगा स्वस्थ निजला आहे. जवळ सापाचे तुकडे पडले आहेत. हें पाहून म्यां चांडाळणीनें हा काय घात केला! मुलाला जीवदान देणाऱ्याचा मीं उगाच जीव घेतला! असें म्हणून छाती बडवून घेऊं लागली, इतक्यांत ब्राम्हण घरीं आला, तेव्हां ती त्यास ह्मणाली, मीं तुह्मास येथें बसा ह्मणून सांगितलें होतें, तें न ऐकिल्यामुळें असा घात झाला.

## तात्पर्य.

पुरती चवकशी केल्याशिवाय एखाद्यास अपराधी मानून शिक्षा करणें फार वाईट आहे. याप्रकारच्या न्याय करणाऱ्यांच्या उतावीळपणामुळें खरे गुन्हेगार अजीबात सुटून निरपराध्यास व कित्येक वेळां हितकर्त्यासदेखील विनाकारण पुष्कळ वेळ मोठाल्या शिक्षा झाल्या आहेत. याकरितां एखाद्यास त्याच्या कृत्याची चवकशी केल्याशिवाय बाह्य चिन्हांवरून गुन्हेगार ठरवूं नये. तसेंच कित्येक अविचारी उताविळीनें आपण कृत्य करितात, नंतर त्याचा परिणाम वाईट झाला ह्मणजे कांहीं तरी निमित्त काढून दुसऱ्यावर दोष घालितात हा त्यांचा त्यापेक्षांही मोठा मूर्खपणा आहे.

# गोष्ट ३८.

## बुद्धि आणि विद्या.

एके ठिकाणीं चार तरुण ब्राम्हण रहात असत. ते लहानपणा पासून एके ठिकाणीं वाढलेले असल्यामुळें स्नेहानें वागत असत त्यांपैकीं तिघेजण बुद्धीनें मंद्र परंतु घोक्ये होते, त्यामुळें त्यांनीं पुष्कळ विद्या केली होती. एक चांगला बुद्धिमान् होता, परंतु तें आळशी असल्यामुळें त्यास कांहीं येत नव्हतें. एके समयीं त्यांनी असा विचार केला कीं, परदेशीं जाऊन कीर्ति मिळवून धनप्राप्ति करून घ्यावी. घरीं आळशासारखें बसून काय होणार? याप्रमाणें विचार करून ते देशपर्यटनास निघाले. कांहीं वाट चालून गेल्यावर एकजण म्हणाला, हा सुबुद्धि अगदीं मूर्ख आहे. याला कांहींएक येत नाहीं. याला बरोबर घेऊन काय करावयाचें? यास परत पाठवावें. आपण अनेक राजदरबारीं जाऊं, तेथें हा विद्वान् नसल्यामुळें आम्हाप्रमाणें याची प्रतिष्ठा होणार नाहीं. विद्येशिवाय नुसत्या बुद्धीला कोण विचारतो? याला कांहीं न मिळालें म्हणजे आपल्यांतून थोडें तरी यास द्यावें लागेल. हें ऐकून दुसरा त्या सुबुद्धीस ह्मणाला, तू घरीं जा. जर तुला कांहीं येत नाहीं, तर आमच्याबरोबर कशाला येतोस? नंतर तिसरा म्हणाला, अहो, असें करूं नये. लहानपणापासून हा आपला खेळगडी, येईनाकां आपल्या बरोबर. तो बुद्धिमान्ही आहे. जें मिळेल त्यांतलें कांहीं तरी त्याला देऊं ह्मणजे झालें.

नंतर ते त्यास घेऊन पुढें चालते झाले. चालत असतां वाटेंत मेलेल्या सिंहाचीं हाडें त्यांच्या दृष्टीस पडलीं. तेव्हां एकजण ह्मणाला, अहो, आपणास संजीवनी विद्या येत आहे, तिचा अनुभव घेऊं. ज्या जनावराचीं हीं हाडें आहेत, त्यास आपण जिवंत करूं. असें ह्मणून एकानें सर्व हाडें गोळा करून जागचीं जागीं जुळिलीं. दुसऱ्यानें त्यांवर कातडें लाविलें. तिसरा मंत्र जपून त्यास जिवंत करूं लागला. तेव्हां सुबुद्धि त्यास ह्मणाला, अरे, तू तरी थांब आतां. हा सिंह जिवंत झाला तर आपणा सर्वांस मारून टाकील. हें ऐकून मंत्र जपणारा ह्मणाला, मूर्खा, बैस उगाच; मी आपली विद्या फुकट दवडूं काय? त्याचा आग्रहच पाहून सुबुद्धि ह्मणाला, ऐकणें नसेल

तर जरा थांब, मी झाडावर चढतों. सुबुद्धि झाडावर चढतांच त्यानें मंत्र जपला. तेव्हां सिंह झोंपेंतून जागा झाल्याप्रमाणें उठला, आणि मोठ्यानें गर्जना करून त्यानें त्या तिघांसही फाडून टाकिलें.

## तात्पर्य.

आंगीं मोठी बुद्धि असली तरी अभ्यास केल्याशिवाय विद्या यावयाची नाहीं. तसेंच, ज्ञान ही सर्वोत्तम चीज आहे; परंतु तिचा उपयोग करितां आला पाहिजे. चांगलें शस्त्र अडाण्याच्या हातीं दिलें असतां तो त्यापासून आपलें रक्षण न करितां उलटा आपला घात करून घेईल. त्याप्रमाणेंच बुद्धि नसली तर विद्येचा उपयोग करितां येत नाहीं. अप्रबुद्ध असतात त्यांस घोकून विद्या आली तरी तिच्या योगानें ते गर्विष्ठ होऊन शहाण्याचा बुद्धिवाद ऐकत नाहींतसे होतात. आपल्या आंगीं विद्या आहे म्हणून दुसऱ्याचें कांहींएक न ऐकतां मनुष्य पाहिजे तसें करूं लागल्यास त्याचें हित व्हावयाचें नाहीं.

---

## गोष्ट ३१.

## विद्या आणि व्यवहारज्ञान.

एका गांवीं ब्राह्मणाचे चार मुलगे होते. त्यांस समजूं लागल्यावर वाटलें कीं, आपण कांहीं तरी विद्या कमवी. असें मनांत आणून शास्त्राभ्यास करण्याकरितां ते काशीस गेले. तेथें एका महत्पंडिताजवळ बारा वर्षें राहून त्यांनीं विद्याभ्यास केला, नंतर त्यांनीं विचार केला कीं, आपलें अध्ययन संपलें, आतां गुरुदक्षिणा देऊन देशीं जावें. त्याप्रमाणें करून ते आपापल्या पोथ्या बरोबर घेऊन देशीं येण्यास निघाले. कांहीं वेळ चालल्यावर तेथें दोन वाटा फुटल्या. तेव्हां कोणत्या वाटेनें जावें याची पंचाईत पडून ते तेथेंच बसले. इतक्यांत जवळच्या गांवचा कोणीएक वाणी मेला होता; त्याचें प्रेत घेऊन पुष्कळ लोकांचा घोळका एका वाटेनें जाऊं लागला. तेव्हां त्या चौघांपैकीं एकजण म्हणाला, 'महाजनोयेनगतः स पन्थाः' या वचनाप्रमाणें त्यांच्यामागून जावें हेंच योग्य. याप्रमाणें विचार करून ते त्या लोकांच्या मेळ्याबरोबर स्मशानांत गेले. तेव्हां तेथें एक गाढव त्यांच्या दृष्टीस पडला. त्यास पाहून एकजण म्हणाला, अहो,

'राजद्वारेस्मशानेचयस्तिष्ठतिसबांधवः' असें वाक्य आहे, याकरितां हा स्मशानांत उभा असलेला प्राणी आपला बांधव आहे, असें समजलें पाहिजे. असें म्हणून एक असामी त्याजवळ जाऊन त्यास गोंजारूं लागला, तेव्हां गाढवानें दुगाण्या झाडण्यास आरंभ केला. इतक्यांत तेथें एक उंट त्वरेनें येत होता; त्यास पाहून दुसरा म्हणाला, अहो, 'धर्मस्य त्वरितागतिः' असें शास्त्र आहे. हा समोरून येत आहे याची गति त्वरित आहे तर हा धर्म असला पाहिजे. तें ऐकून तिसरा म्हणाला, 'इष्टं धर्मेण योजयेत्' असें वाक्य आहे, आणि हा गाढव आपला इष्ट आहे, तर धर्माची व याची गांठ घातली पाहिजे. असें ह्मणून त्यांनीं त्या गाढवास उंटाच्या गळ्यांत बांधिलें. हें वर्तमान त्या गाढवाचा धनी परीट यास कोणीं सांगितलें, तेव्हां तो सोटा घेऊन त्यांस मारण्याकरितां आला. तेव्हां 'यःपलायतिजीवति' असें म्हणून ते पळूं लागले. बरेच दूर गेले तों मोठी एक नदी लागली. तींतून एक पळसाचें मोठें पान वहात येत होतें. त्याकडे पाहून एकजण म्हणाला, 'पत्रंवाहनपक्षयोः' असा कोश आहे. याकरितां या वाहनावर बसून मी पलीकडे जातों. असें म्हणून तें पान दोन्ही पायांत धरून नदींत शिरला, आणि वाहूं लागला. जवळ दुसरा पंडित होताच, तो, आपला सोबती वाहत चालला असें पाहून त्याची शेंडी धरून त्यास ओढूं लागला, परंतु पाण्याच्या जोरामुळें त्याच्यानें त्यास आलीकडे ओढून घेववेना. तेव्हां 'सर्वनाशेसमुत्पन्नेअर्धंत्यजतिपंडितः' असें म्हणून त्यानें त्याची मान कापून डोकें पदरांत घातलें. नंतर ते पुढें चालले, तों एक गांव लागला. त्या दिवशीं कांहीं पर्वणी होती. पांथस्थ ब्राम्हण आलेले पाहून त्या तिघांस तीन गृहस्थांनीं आपापल्या घरीं जेवावयास बोलाविलें. एका गृहस्थाच्या घरीं शेवयांची खीर केली होती. ब्राम्हण जेवावयास बसून खीर खाऊं लागला; तेव्हां त्या लांबलांब शेवया त्याच्या हातास लागल्यावरून 'दीर्घसूत्रीविनश्यति' हें वाक्य त्यास आठवलें; तें म्हणून पान टाकून तो चालता झाला. दुसऱ्याच्या घरीं मांडे होते. मांडे पहातांच दुसरा पंडित म्हणाला, 'अतिविस्तरविस्तीर्णं नभवेत्तचिरायुषम्' असें ह्मणून तोही उठून गेला. तिसरे महापंडित जेवावयास गेले होते, तेथें घिरडीं होतीं. पानावर बसून अनेक छिद्रांनीं युक्त अशीं घिरडीं पाहून, 'छिद्रेष्वनर्थाबहुलाभवंति' असें ह्मणून तोही पळत सुटला.

याप्रमाणें त्या पंडितमूर्खांची वाटेंत सर्व ठिकाणीं फटफजिती झाली.

### तात्पर्य.

विद्या असून व्यवहारज्ञान नसेल तर मनुष्याची फजिती होऊन हाल होतात. शास्त्रांतील वाक्यांचा खरा अर्थ काय आहे, तें कोठें लागू करावें, हें ठाऊक नसेल तर अशास्त्रज्ञांपेक्षांही अशा घोक्या विद्वानांपासून फार नुकसान होतें. शास्त्रवचनाचा एकादा थोडासा भाग घेऊन त्या वचनाचा ज्या गोष्टीशीं मुळींच संबंध नाहीं, तिच्याशीं तें वाक्य लावून देऊन कित्येक विद्वानांनीं मतलबानें किंवा मूर्खपणानें जगांत अनेक भलभलत्या समजुती उत्पन्न केल्या आहेत. सर्व धर्मांतील लोक आपल्या शास्त्रांतील वचनांची ओढाताण करून अर्थाचे हाल हाल करितात. ज्यास शास्त्राची योग्य योजना करितां येत नाहीं, त्यानें मुळींच पांडित्य करूं नये हें चांगलें. असें केल्यानें लोकांचें अज्ञान तरी वाढणार नाहीं.

---

## गोष्ट ४०.

### कोल्हा आणि गाढव.

एका परटाजवळ उद्धत नांवाचा एक गाढव होता. तो दिवसास धन्याचीं ओझीं वाहून रात्रीस पाहिजे तिकडे यथेच्छ फिरून कोणी बांधील म्हणून पहांटेसच परटाच्या घरीं येई. एके रात्रीस तो एका शेतकऱ्याच्या शेतांत चरत असतां एका कोल्ह्याची व त्याची मैत्री जमली. तेव्हांपासून तो कोल्हा त्या गाढवाला दररोज वेगवेगळ्या शेतांकडे नेई. एके रात्रीस कोल्ह्यानें त्यास एका मळ्याजवळ नेलें. तेथें कुंपण मोडून गाढव आंत शिरला. त्या मळ्यांत पुष्कळ कांकड्या होत्या, त्या, त्या दोघांनीं यथेच्छ खाल्या. याप्रमाणें बरेच दिवस त्यांचा क्रम चालला होता. एके रात्रीस कांकड्या खात असतां गाढव कोल्ह्यास म्हणाला, कोल्ह्याभाऊ, पहा, आजची रात्र काय मजेची आहे ती! गड्या, मला आज गावेंसें वाटतें. कोणता राग गाऊं, तें सांग.

**कोल्हा**—मामा, अशी भलतीच गोष्ट करून काय उपयोग? आपण चोरी करीत आहों. चोर व जार यांनीं निमूटपणीं आपलें

काम केलें पाहिजे. त्यांतून तुमचें गायनही मोठें गोड आणि मंजूळ! पांचजन्याच्या आवाजाप्रमाणें दूरवर ऐकूं जाणार. तें ऐकतांच मळ्याचे रखवालदार उठून येऊन तुला ठारच करतील, नाहीं तर बांधून तरी टाकतील. स्वस्थपणें गोड गोड कांकड्या खा, उगाच भलती गोष्ट करूं नका.

हें ऐकून गाढव ह्मणाला, अरे, तू रानांत रहाणारा ,तुला गाण्याची गोडी काय ठाऊक? ठाऊक असती तर असें बोलला नसतास. शरदृतूमध्यें असें चांदणें पडलें असून त्या वेळेस मित्रमंडळीजवळ बसून गीतामृत सेवन करणें हें मोठें भाग्यच होय.

**कोल्हा**—मामा, ही गोष्ट खरी; पण तुम्हांस गातां येत नाहीं. तुह्मी उगाच मोठ्यानें ओरडतां मात्र. उगाच असला कठोर शब्द करून आपलें नुकसान करून घ्यावें यांत काय हांशील.

**गाढव**—मूर्खा, मला गायन ठाऊक नाहीं काय? त्याचे प्रकार ऐक.

सात स्वर, तीन ग्राम, एकवीस मूर्छना, एकुणपन्नास ताल, तीन यति, सहा स्थानें, नऊ रस, सव्विस राग, चाळीस भाव, याप्रमाणें भरतानें गाण्याचीं अंगें सांगितलीं आहेत. गाण्यासारखी दुसरी कोणतीच कला देवांलाही प्रिय नाहीं. गाण्याच्याच योगानें रावणानें शिवास प्रसन्न करून घेतलें होतें.

असें आहे तर कोल्ह्याभाऊ, मला गाणें येत नाहीं, असें कसें म्हणतोस? आणि मला गाऊं नको म्हणून कां सांगतोस?

**कोल्हा**—असें आहे तर मी कुंपणाजवळ उभा राहून शेतकरी येईल तर पहातों. तू यथेच्छ गायन कर.

गाढव ओरडूं लागतांच शेतकरी जागा होऊन रागानें दांत ओठ खात धांवतच आला; आणि त्यास सोट्यानें मरेमरेतों बडवूं लागला. मारानें व्याकुळ होऊन गाढव खालीं पडला, तेव्हां तेथें आरपार भोंक पडलेला एक दगड होता, तो गाढवाच्या गळ्यांत बांधून शेतकरी जाऊन निजला. गाढवही कांहीं वेळानें सावध होऊन उठला आणि गळ्यांत तसाच दगड घेऊन कुंपण चुरून जाऊं लागला. तेव्हां त्यास पाहून कोल्हा ह्मणाला,—मामा, तुम्ही फारच चांगलें गायन केलें. मी सांगत असतांही तुह्मीं ऐकिलें नाहीं. गाण्याबद्दल तुम्हास हा हिरा बक्षीस मिळाला काय?

### तात्पर्य.

कित्येक मूर्ख आपण कोण, आपलें शहाणपण किती, आपली योग्यता काय, याचा विचार न करितां इकडे तिकडे कोठेंतरी शास्त्रांतील मोठमोठे शब्द पाठ करून पांडित्य करूं लागतात. त्यामुळें त्यांची चोहोंकडे फजिती व दुर्लौकिक होऊन त्यांचा नाश होतो. व्यर्थ डौल मिरविण्यापेक्षां निमूटपणें रहाण्यांतच त्यांचा नफा आहे.

---

## गोष्ट ४१.

### यक्ष आणि कोष्टी.

एका गांवीं मन्थर नांवाचा कोष्टी रहात असे. एके समयीं त्याचा माग जुना झाल्यामुळें सर्व लांकडें मोडून गेलीं. याकरितां तो दुसरीं लांकडें आणण्याकरितां कुऱ्हाड घेऊन रानांत गेला. समुद्रकांठीं डोंगरांत त्यास एक शिशव्याचा वृक्ष आढळला. त्यास पाहून तो म्हणाला, हें झाड फार मोठें आहे. हें तोडलें असतां पुष्कळ मागांचीं लांकडें निघतील. असा विचार करून त्यानें त्या वृक्षाच्या बुंधावर कुऱ्हाड मारिली. तेव्हां त्या झाडावर एक यक्ष रहात होता, तो त्यास ह्मणाला, अरे, हें माझें झाड आहे, यास तोडूं नको. मला हें फार आवडतें. कारण येथें राहिल्यामुळें समुद्रावरील झुळझुळ वारा लागून मला आल्हाद होतो.

**कोष्टी**—मला लांकडें हवीं ह्मणून मी हा वृक्ष तोडितों. पुष्कळ दिवस माग बंद पडल्यामुळें माझीं मुलेंबाळें उपाशीं मरत आहेत. तू आपला दुसऱ्या झाडावर जा.

**यक्ष**—अरे, मी तुला प्रसन्न झालों आहें, काय हवें तें माग. मात्र हें झाड तोडूं नको.

**कोष्टी**—असें आहे तर मी घरीं जाऊन बायकोला व मित्राला काय मागूं ह्मणून विचारून येतों. नंतर मी मागेन तें दे.

असें म्हणून तो कोष्टी आनंदानें परत चालला. गांवाजवळ गेला तोंच वेशीजवळ त्याचा स्नेही न्हावी होता तो भेटला. त्यास म्हणाला मित्रा, मला यक्ष प्रसन्न झाला आहे त्याजवळ काय मागूं ? तें तुला विचारण्याकरितां आलों आहें.

**न्हावी**—असें आहे तर राज्य माग, म्हणजे तू राजा होशील; आणि मी तुझा प्रधान होईन. दोघेही इहलोकीं सुख भोगून परलोकाचें साधन करूं.

**कोष्टी**—हें खरें, तथापि बायकोला विचारून येतों.

**न्हावी**—अरे बायका मूर्ख, त्यांची भलत्याच कामांत मसलत घेऊन काय उपयोग? जेवणखाण, वस्त्रालंकार यांतच त्यांस विचारावें. भलत्याच कामांत बायकांची मसलत घेतली तर लवकरच नाश होईल.

**कोष्टी**—अरे, तू ह्मणतोस तें सर्व खरें असलें तरी मला बायकोला विचारलें पाहिजे. ती मोठी पतिव्रता व शहाणी आहे. मी तिला विचारल्याशिवाय कांहींएक करीत नाहीं.

असें ह्मणून तो बायकोकडे गेला आणि तिला म्हणाला, प्रिये, आज मला एक यक्ष प्रसन्न झाला आहे. तो मी मागेन तें देणार आहे. तर काय मागूं, तें तुला विचारण्याकरितां आलों आहें. मी काय मागावें तें तूच सांग. माझा स्नेही न्हावी म्हणतो कीं, राज्य मागावें.

**कोष्टीण**—प्राणनाथ, न्हावगंडाला काय समजतें? त्याचें ऐकूं नका. राज्याचा खटाटोप फार मोठा आहे. नेहमीं दंगेधोपे व लढाया चालल्यामुळें राजाला मोटीच काळजी असते. राम व पांडव यांस वनवास, यादवांचा नाश, नलराजाचें पदच्युत होणें, सहस्रार्जुन व रावण यांचा वध, या सर्वांस कारण राज्य होय. भाऊ, मुलगा, भाऊबंद वगैरे राज्याच्या लोभानें राजाला मारण्यास सिद्ध होतात.

**कोष्टी**—तुझें ह्मणणें खरें आहे, पण काय मागूं तें सांग.

**कोष्टीण**—तुह्मी रोज एक लुगडें विणतां, तेणेंकरून घरखर्च मात्र भागतो. याकरितां आणखी एक डोकें आणि दोन हात मागा, म्हणजे दररोज दोन लुगडीं विणाल. एकाच्या विक्रीनें पूर्वीप्रमाणें खर्च भागून दुसऱ्याची किंमत येईल ती शिलक राहील. म्हणजे आपणास वस्त्रापात्राची व दागिन्यादुगिन्यांची हवी तशी हौस करितां येईल, व तेणेंकरून आपली चारचौघांत प्रतिष्ठा होईल.

बायकोचें भाषण ऐकून कोष्टी संतुष्ट होऊन म्हणाला, शाबास प्रिये शाबास, त्वां फार चांगले सांगितलें. बायको असावी तर अशीच असावी. त्वां सांगितलें तसेंच करितों.

नंतर यक्षाजवळ जाऊन ह्मणाला, महाराज, प्रसन्न झालां असलां तर मला आणखी दोन हात व दुसरें डोकें द्या. असें ह्मटल्याबरोबर तसें झालें. तेव्हां तो आनंदित होऊन घरीं जाऊं लागला. तो गांवाजवळ गेला तेव्हां हा राक्षस आहे असें समजून लोक त्यास दगड मारूं लागले, त्यामुळें तो घायाळ होऊन मरण पावला.

### तात्पर्य.

स्वतःची बुद्धि नाहीं आणि मित्रांनीं सांगितलेलेंही ऐकावयाचें नाहीं; असें असलें म्हणजे कोणत्याही गोष्टीनें मनुष्याचें हित व्हावयाचें नाहीं. तशांत बायकांच्या बुद्धीस लागल्यानें तर पुरताच नाश होतो. दाता भेटला तर याचकाच्या अंगीं मागण्याची अक्कल पाहिजे. मयूरकवीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे 'वरहिवरायासपाहिजे समज.'

---

## गोष्ट ४२.

### दोन मासे आणि बेडुक.

एका सरोवरांत दोन मासे रहात होते. एकाचें नांव शतबुद्धि आणि दुसऱ्याचें नांव सहस्रबुद्धि. एके वेळीं त्यांची एका बेडकाशीं मैत्री जमली. त्या बेडकाचें नाव एकबुद्धि असें होतें. तेव्हांपासून ते तिघेही स्नेहानें वागून सुखानें काळ घालवीत असत. एके दिवशीं ते गोष्टी सांगत असतां दुसरीकडे मासे मारून कांहीं कोळी संध्याकाळीं तेथें आले, आणि म्हणाले, या सरोवरांत पुष्कळ मासे सांपडतील. उद्यां सकाळीं येऊन येथें जाळीं टाकूं. असें म्हणून ते चालते झाले. तेव्हां ते खिन्न होऊन एकमेकांकडे पाहून मसलत करूं लागले.

**बेडुक**—शतबुद्धि, तुम्हीं कोळ्यांचें बोलणें ऐकिलें ना? आतां काय करणार. पळून जाणार किंवा येथेंच राहणार? काय करणार तें लवकर सांगा.

हें ऐकून सहस्रबुद्धि हंसून म्हणाला, पोरांनो, भिऊं नका. अरे, अशा दुष्टांच्या बोलण्यानें घात होता तर जग राहिलेंच नसतें. ते कोळी बहुतकरून येणार नाहींत, कदाचित् आले तरी मी तुमचें रक्षण करीन. मला पोहण्याचे अनेक प्रकार माहीत आहेत. यावर

शतबुद्धि म्हणाला, तुमचें म्हणणें बरोबर आहे, नांवच सहस्रबुद्धि मग काय विचारावें? अंगीं बुद्धि असल्यावर पाहिजे तें कार्य करितां येईल. सूर्यकिरण, वायु, यांचाही जेथें प्रवेश होत नाहीं, तेथेंसुद्धां बुद्धिमानांची बुद्धि चालते. केवळ त्यांच्या बोलण्यानेंच अपली वडिलोपार्जित जागा सोडूं नये. जन्मभूमि वाईट असली तरी ती स्वर्गापेक्षां अधिक आहे. तस्मात् जाऊं नये हेंच खरें. अरे एकबुद्धि, संकट आल्यास आह्मी आपल्या बुद्धिबलानें तुझें रक्षण करूं.

**बेडुक**— बाबांनो, तुह्मी एक शतबुद्धि व दुसरा सहस्रबुद्धि. मला तर एकच बुद्धि आहे. पण ती सांगते कीं, लवकर पळून जावें, याकरितां मी तसें करणार.

असें बोलून तो सहकुटुंब सहपरिवार निघून गेला. नंतर सकाळीं कोळी आले त्यांनीं सर्व पाणी गादवून मोठमोठीं जाळीं टाकिलीं. त्यांत पुष्कळ मासे, बेडूक, खेंकडे वगैरे जलचर सांपडले. शतबुद्धि आणि सहस्रबुद्धि पुष्कळ वेळ इकडे तिकडे पाण्यांत दडून चुकवीत होते; परंतु शेवटीं तेही जाळ्यांत सांपडले. दुपार झाल्यावर सर्वांचीं जाळीं भरल्यामुळें कोळी घरीं चालले. शतबुद्धि आणि सहस्रबुद्धि हे इतर माशांपेक्षां फार मोठे होते, याकरितां एका कोळ्यानें शतबुद्धिस खांद्यावर घेतलें, आणि दुसऱ्यानें सहस्रबुद्धीस हातांत लोंबत धरून चालविलें. वाटेवरील एका विहिरीजवळ जाऊन एकबुद्धि राहिला होता. तो, दोघां मित्रांची अशी दशा पाहून बायकोस म्हणाला, प्रिये, शतबुद्धि मरून कोळ्याच्या खांद्यावर पडला आहे, सहस्रबुद्धि तर हातांत लोंबत आहे! मी एकबुद्धि होतों म्हणून सुरक्षित आहें.

### तात्पर्य.

जे बलवान् शत्रूंशीं प्रसंग पडला असतां आपल्या सामर्थ्याचा विचार न करितां बुद्धीच्या गर्वामुळें धिटाईनें वागतात, ते समूळ नाश पावतात; परंतु जे आपला दुर्बलपणा मनांत आणून सावधपणें वागतात, त्यांचा बचाव होतो.

---

## गोष्ट ४३.

### मनोरथ.

एका शहरांत स्वभावकृपण नांवाचा एक ब्राम्हण रहात होता.

तो कोरान्न मागून पुष्कळ तांदूळ जमवी, व पोटास लागतील ते खाऊन बाकीचे मडक्यांत घालून शिंक्यावर ठेवीत असे. शिंक्यावर उंदीर जाऊं नये म्हणून तो त्याखालींच खाट टाकून निजत असे. एके दिवशीं रात्रीस खाटेवर उताणा पडला असतां तांदळांच्या मडक्याकडे नजर जाऊन तो मनांत म्हणाला, हें मडकें भरलें आहे. दुष्काळ पडून हे तांदूळ महाग विकले तर, यांचे बरेच रुपये येतील. ते आले म्हणजे दोन शेळ्या घेईन, त्यांची वाढ बरीच झाली म्हणजे ती विकून त्या पैशानें एक गाय घेईन, गाई पुष्कळ झाल्या ह्मणजे त्या विकून एक ह्मैस घेईन, म्हशी पुष्कळ झाल्या म्हणजे त्या विकून एक घोडी घेईन, ती पुष्कळ वेळां प्रसवली ह्मणजे बरेच घोडे होतील; ते विकले म्हणजे मी श्रीमंत होईन. मग मला चांगल्या मोठमोठ्यांच्या मुली सांगून येतील. लग्न झाल्यावर मला मुलगा होईल. त्या मुलाचें मी सोमशर्मा असें नांव ठेवीन. तो रांगूं लागला म्हणजे तबेल्यांत घोड्यांजवळ जाईल. तें मी माडीवर खिडकींत बसलों असतां माझ्या दृष्टीस पडेल. मग बायकोला रागानें हाक मारून मुलाला घे, म्हणून सांगेन. घरांतील कामांत गुंतल्यामुळें ती ऐकणार नाहीं, तेव्हां मी घरांत जाऊन तिला लाथ मारीन. असें म्हणून त्यानें जोरानें पाय झाडला तो शिंक्यावरील मडक्यास लागून तें फुटून त्याचे तुकडे तुकडे झाले. त्यांतील तांदूळ चोंहोंकडे उडून त्याच्या सर्वांगावर पडून डोळ्यांतही गेले, व कांहीं तांदूळ खालीं माती होती तींत मिसळले.

### तात्पर्य.

जो आपली योग्यता मनांत आणून उद्योग करीत नाहीं आणि अनेक प्रकारचे मनोरथ मात्र करीत बसतो, त्याचें जें थोडें बहुत सुख असतें तेंही नाहींसें होतें.

---

## गोष्ट ४४.

### ब्राह्मण आणि वाघ.

दक्षिणदेशीं एका अरण्यांत एक म्हातारा वाघ रहात होता. एके दिवशीं पूर्वी मारलेल्या एका वाटसराचें कडें हातांत घेऊन तो एका सरोवराचे कांठीं उभा होता. त्यावेळेस त्या वाटेनें एक ब्राम्हण जात असतां त्यानें पाहिला. तेव्हां हाक मारून त्यास म्हणतो भटजी-

बावा, एवढें सोन्याचें कडें घ्या. हें ऐकून ब्राम्हण मनांत म्हणाला, दैवयोगानें आज हा लाभ आपोआप प्राप्त झाला आहे, परंतु हा दुष्ट आहे, याचा नेम नाहीं. एकदम याच्याजवळ जाऊं नये. असा विचार करून त्यास म्हणाला, अरे तू तर साक्षात् यमच. तुजवर विश्वास कसा ठेवावा ?

**वाघ**—अरे, तरुणपणीं मी मोठा दुष्ट होतों. मी पुष्कळ माणसें मारिलीं. या पातकानें माझीं बायकापोरें मरून गेलीं. आतां पातक करून काय करावयाचें ? आतां द्रव्य तरी कशाला ? सर्वसंग परित्याग करून प्राणत्याग करावा हेंच चांगलें, असें मनांत आणून हें कडें तुम्हांस देण्याकरितां हाक मारिली. तुह्मी म्हणतां मजवर विश्वास कसा ठेवावा. एकदा कानफाट्या नांव पडलें ह्मणजे पडलेंच. अरे वाघ असलों म्हणून काय झालें ? अरे, जसा आपला जीव आपणाला प्यारा तसाच लोकांचा जीव लोकांला, हें मला समजत नाहीं काय ? शहाणे असतात ते लोकांनीं आपलें वाईट केलें असतां आपणास वाईट वाटतें त्याप्रमाणेंच आपण दुसऱ्याचें वाईट केलें असतां त्यास वाईट वाटेल, असें मनांत आणून लोकांशीं दयेनें वागतात. तुह्मी गरीब दिसलां ह्मणून तुम्हांस हें कडें द्यावें असें मला वाटलें. याकरितां सरोवरांत स्नान करून हें घ्यावयास या. हें वाघाचें गोड भाषण ऐकून ब्राम्हण सरोवरांत स्नान करून हात पसरून त्याजवळ गेला. तेव्हां लागलींच वाघानें त्यास फाडून खाल्लें.

### तात्पर्य.

जे स्वभावतः दुष्ट आहेत, ते तोंडानें कितीही गोड बोलले तरी त्यांवर विश्वास ठेवूं नये. ते आपला कावा साधण्याकरितां पाहिजे तसें सोंग घेतील आणि शेवटीं घात केल्याशिवाय रहाणार नाहींत.

---

## गोष्ट ४५.

## हरिण, कावळा आणि कोल्हा.

मगधदेशांत चंपावती नांवाचें अरण्य होतें. तेथें एक हरिण आणि कावळा मोठ्या स्नेहानें रहात असत. एके दिवशीं तो हरिण एका कोल्ह्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां कोल्हा मनांत ह्मणतो, याचें

लुसलुशित मांस खावयास सांपडेल तर बरें होईल. याच्याशीं स्नेह करून यास फसवावें असें मनांत आणून हरणाजवळ जाऊन त्यास म्हणाला, मित्रा, कसें काय ? बरें आहेना?

**हरिण**— कोणरे तू ?

**कोल्हा**— मी कोल्हा आहें. माझें नांव क्षुद्रबुद्धि. या रानांत आपणास कोणी संगतीसोबती नाहीं, म्हणून मी तुझ्याशीं स्नेह करण्यास आलों आहें.

**हरिण**— बरें आहे.

नंतर सूर्य मावळल्यावर ते दोघेही चांफ्याच्या झाडावर कावळ्याचें घरटें होतें तेथें गेले. त्यांस पहून कावळा हरिणास ह्मणाला, मित्रा, हा दुसरा कोण ?

**हरिण**— हा कोल्हा माझ्याशीं स्नेह करण्यास आला आहे.

**कावळा**—मित्रा, माहिती असल्याशिवाय परक्याशीं एकाएकीं स्नेह करणें ठीक नाहीं.

हें ऐकून कोल्हा रागानें म्हणाला, अरे, तुझी ओळख होण्यापूर्वीं तूही परकीच होतास. असें असून आतां तुमचा इतका स्नेह कसा झाला? उगाच शहाणपणाचा डौल घालून काहींतरी बोलावें यांत काय हांशील ? इतका आपपरपणा कशास पाहिजे ? अरे, सर्व लोक आपले मित्रच आहेत असें शहाणे समजतात. हरिणाप्रमाणें तूही माझा मित्रच आहेस.

**हरिण**—उगाच भांडण कशाला ? सर्वांनीं स्नेहानें वागावें ह्मणजे झालें. वस्तुतः कोणी कोणाचा मित्र नाहीं व कोणी कोणाचा शत्रूही नाहीं. प्रसंगानें स्नेह जमतो किंवा द्वेष पडतो. नंतर रात्रीस अनेक प्रकारच्या गोष्टी सांगून प्रातःकाळीं ते तिघेही वाटेल तिकडे फिरावयास निघाले. तेव्हां कोल्हा हरिणाच्या कानांत हळूच सांगतो, मित्रा, मला चांगलें एक शेत आढळलें आहे तें तुला दाखवितों. असें ह्मणून त्यास त्या शेतांत घेऊन गेला. नंतर हरिण रोज त्या शेतांत चरावयास जाऊं लागला, त्यामुळें शेताची पुष्कळ नासाडी झाली. हें पाहून शेतकऱ्यानें एके दिवशीं फांस लावून हरिणास धरिलें, तेव्हां हरिण मनांत ह्मणाला, आतां मला मित्राशिवाय या संकटांतून कोण सोडवील ? इतक्यांत कोल्हाही तेथें आला. हरिण सांपळ्यांत पडलेला

पाहून तो मनांत म्हणाला, युक्तीनें आपलें काम तर झालें. याला कापून मांस काढून मांसानें चोपडलेलीं ओलीं हाडें टाकतील तीं मला पोटभर खाण्यास मिळतील. इतक्यांत हरिण त्यास पाहून म्हणतो, मित्रा, मला यांतून लवकर सोडीव. पाश तोड. विपत्ति प्राप्त झाली असतां मित्राची परीक्षा होते.

कोल्हा फांसाजवळ जाऊन त्याकडे पुन:पुन: पाहून ह्मणतो, मित्रा, या फांसाला कातड्याची तांत आहे. आज आदितवारीं मी तिला तोंड कसें लावूं? उद्यां तू ह्मणशील तसें करीन.

संध्याकाळीं हरिण घरीं आला नाहीं म्हणून त्याला शोधीत शोधीत कावळा तेथें आला, आणि त्यास ह्मणाला, मित्रा हें काय?

**हरिण**—मित्राचें ऐकिलें नाहीं त्याचें हें फळ. मरण जवळ आलें ह्मणजे मित्राचें बोलणें गोड लागत नाहीं.

**कावळा**—तो लुचा कोठें आहे?

**हरिण**—येथेंच माझें मांस खाण्याकरितां टपून बसला आहे.

**कावळा**— मी पूर्वींच सांगितलें होतें. आपण चांगले वागतों ह्मणून बेसावध राहून उपयोग नाहीं. दुष्ट आहेत ते सज्जनास देखील पीडा देतात. तोंडावर गोड गोड बोलून पाठीमागें घात करणाऱ्याशीं स्नेह करूं नये.

नंतर सकाळीं हातांत सोंटा घेऊन शेतकरी शेताकडे येत होता, त्यास दुरून पाहतांच कावळा म्हणाला, मित्रा, दम कोंडून पोट फुगवून हातपाय ताठून मेल्यासारखा पड. मी तुझे डोळे चोंचीनें फोडल्यासारखे करितों. नंतर मी ओरडल्याबरोबर पळून जा. हरिणानें त्याप्रमाणें केलें. इतक्यांत शेतकरी तेथें येऊन पोंहचला, तेव्हां हरिणास मेलेला पाहून तो ह्मणतो; हं ठीक झालें, आपल्याआपणच मेलास. असें ह्मणून जाळें सोडूं लागला, तों कावळ्यानें शब्द करितांच हरिण पळून गेला. त्यास पळतांना पाहून शेतकऱ्यानें रागानें सोटा फेंकला तो कोल्ह्याच्या कमरेंत बसून तो तत्काळ मरण पावला.

## तात्पर्य.

जगांत कित्येक असे दुष्ट आहेत कीं, ते नुसत्या बोलण्यानेंच साखर पसरून हळूच मान कापितात. याकरितां पक्की माहिती असल्या-

शिवाय कोणाशीं स्नेह करूं नये. खरा मित्र असतो तोच संकटसमयीं उपयोगीं पडतो. दुष्ट असतात ते विश्वासघातानें लोकांस फसवितात, परंतु या पातकाचें फळ इहलोकींच त्यांस प्राप्त होतें.

---

## गोष्ट ४६.

## न्हावीण आणि कोष्टीण.

एका गांवीं एक कोष्टी रहात असे. तो फार भांगट होता. दररोज रात्रीस बाहेर जाऊन अंमल करून घरीं आल्यावर धुंद होऊन पडे. नवरा असा असल्यामुळें त्याच्या बायकोस वाईट संगती लागून तीही दुराचरण करूं लागली. कांहीं दिवसांनीं आपल्या बायकोचें पाऊल वांकडें पडल्याबद्दल त्यासही कर्णोपकर्णी गुणगुण ऐकूं आली. नंतर एके दिवशीं संध्याकाळीं एक बैरागी त्याच्या घरीं वस्तीस आला. तो ह्मणाला, गांवांत माझी कोठें ओळख नाहीं, मला आजची रात्र वस्तीस जागा द्या. हें ऐकून कोष्टी बायकोस ह्मणाला, अग, या साधुबावांला पाणींउदक काय लागेल तें दे, आणि त्यांस जेऊंही घाल. आपणाला तरी असा धर्म करण्याचा प्रसंग कधीं येणार? त्यांना हांतरावयास घोंगडी वगैरे कांहीं तरी दे. मी बाहेर जाऊन येतों. असें ह्मणून तो भांगेच्या अड्ड्यावर गेला.

तो गेल्यावर बायकोनें लवकर लवकर स्वयंपाक करून त्या बैराग्यास जेऊं घातलें आणि चटीपटी करून आपल्या जाराकडे चालती झाली. जातेवेळेस बैराग्यास ह्मणाली, साधुबावा, शेजारीं माझी एक मैत्रीण आजच गांवाहून आली आहे, तिला भेटून येतें, तोंपर्यंत तुह्मी घराची राखण करा बरें; असें ह्मणून ती चालती झाली. पाहुण्याच्या जेवणामुळें त्या दिवशीं तिला जरा उशीर झाला. कोष्टीही घरीं पाहुणा आल्यामुळें गांजाची चिलीम झोंकून व घोटा पिऊन झोंकांडे खात घरीं लवकर येतच होता. इतक्यांत वाटेंत दूरून दोघांची नजरानजर झाली; तेव्हां कोष्टीण भिऊन पळत घरीं आली, आणि दागिने वगैरे काढून ठेवून रोजच्यासारखी हांतरुणावर पडली, तों कोष्टीही येऊन पोहोंचला. पूर्वी त्यास संशय आलाच होता, पण त्या रात्री बाहेर जातांना पाहून त्याची खात्री झाली. त्यामुळें रागावून तो तिला ह्मणाला, रांडे, तू कोठें जात होतीस?

**कोष्टीण**—मी कोठें जात नव्हतें. भांग खाऊन येऊन झिंगल्यासारखें कांहीं तरी बडबडतां आहां.

हें दांडगेपणाचें भाषण ऐकून त्याला फारच राग येऊन तो ह्मणाला, रांडे, फार दिवस तुझें कृत्य ऐकत होतों; परंतु आज प्रत्यक्ष पाहिल्यामुळें माझी खात्री झाली. असें म्हणून त्यानें काठी घेऊन तिला खूब बडविलें, आणि मोठा सोल घेऊन खांबाशीं जेरगटून बांधून टाकिलें. नंतर भांगेचा अंमल पुरता आल्यामुळें व झोंपेची वेळ झाल्यामुळें तो निचेष्ट पडला.

कोष्टीण संकेताच्या ठिकाणीं जावयाची ती गेली नाहीं, यामुळें पुष्कळ वेळ वाट पाहून तिची कुंटिण एक न्हावीण होती ती तिच्या शोधास आली, व कोष्टी झोंपी गेला आहे, असें पाहून तिला ह्मणाली, अग, तो तुझी वाट पहात आहेना? लवकर जा.

**कोष्टीण**—पहा, आज माझी काय दशा झाली आहे ती. आतां कशी जाऊं? त्याला जाऊन सांग कीं, आज मला येतां येत नाहीं.

**न्हावीण**—आधीं असल्या गोष्टींत शिरूं नये, शिरल्यावर मग असें करूं नये. अग, अडचणी सोसूनच अशा गोष्टींचें सुख घ्यावें लागतें.

**कोष्टीण**—अग, तें खरें. पण मला बांधून ठेवून हा मेला जवळच निजला आहे, याला कसें करूं?

**न्हावीण**—हा पुरता झिंगला आहे. दिवस उगवल्याशिवाय उठणार नाहीं. मी तुला सोडितें. मग तू मला आपल्या जागीं बांधून त्याकडे जाऊन लवकर परत ये.

**कोष्टीण**—बरें आहे.

नंतर न्हाविणीनें तिला सोडल्यावर आपल्या जागीं तिला बांधून कोष्टीण बाहेर गेली.

इतक्यांत कांहीं वाजल्यामुळें कोष्टी जरा जागा झाला, तेव्हां तिला ह्मणाला, गाढवी, आजपासून घरांतून बाहेर जाणार नाहीं आणि परक्याबरोबर बोलणार नाहीं, असें कबूल करशील तर तुला सोडितों. त्याला शब्द उमगेल ह्मणून न्हावीण कांहींएक बोलली नाहीं. पुनः पुनः तो विचारी तरी ती बोलेना. तेव्हां रागानें चवताळून सुरी घेऊन तिचें नाक कापून ह्मणाला, दांडगे शिनळी, तशीच अस. पुनः तुला विचारणार नाहीं. असें म्हणून पुनः निजला.

बैरागी हांतरुणावर जागा होता, तो हें सर्व कृत्य दुरून पहात होता. कांहीं वेळानें कोष्टीण परत आली, आणि न्हाविणीला म्हणाली, कसें काय, ठीक आहेना? हा चांडाळ जागाबिगा तर झाला नाहीं ना?

**न्हावीण**—नाकाशिवाय सगळें ठीक आहे. आतां लवकर सोड. हा उठला नाहीं तोंच निघून जाऊं दे.

नंतर ती गेल्यावर कांहीं वेळानें कोष्टी पुनः उठला आणि ह्मणाला, अजून बोलत नाहींस ना? शिक्षा पुरेशी झाली नाहीं. दमसा आणखी कान कापितों,

हें ऐकून ती रागावून म्हणाली, अरे दुष्टा, महापतिव्रतेचें तुझ्यानें वांकडें काय होणार? जर मी खरी पतिव्रता आहें, आणि परपुरुष मनांत देखील आणला नसेल, तर देव माझें नाक होतें तसें पुनः करील. जर माझें वांकडें पाऊल पडलें असेल तर देव मला पाहून घेईल. असें ह्मणून पुनः रागावल्यासारखें करून मोठ्यानें ओरडून म्हणाली, पाप्या चांडाळा, पहा, पतिव्रतेच्या पुण्यानें नाक पूर्वी होतें तसें झालें.

नंतर त्यानें दिवा लावून पाहिलें तों जमिनीवर रक्त पडलेलें असून नाक तर पहिल्यासारखेंच होतें तसें आहे. तेव्हां त्यास मोठें आश्चर्य वाटलें. नंतर तिला सोडून नानाप्रकारच्या विनवण्या करून त्यानें तिची समजूत केली. हाही प्रकार बैरागी पहात होता.

न्हावीण हातांत नाक धरून घरीं गेल्यावर विचार करूं लागली; आतां ही गोष्ट लपविण्यास उपाय काय करावा? इतक्यांत उजाडलें. न्हावी चावडींत निजला होता तो घरीं आला आणि बाहेरूनच बायकोला म्हणाला, आण धोकटी लवकर. हजामती करावयास लवकर जाऊं दे. हें ऐकून न्हाविणीनें धोकटींतून एक वस्तरा काढून घरांतूनच त्याकडे फेंकला. तेव्हां धोकटी न दिल्यामुळें उशीर झाला म्हणून रागावून त्यानें तो वस्तरा तिच्याकडे फेंकला. तेव्हां लागलींच ती न्हावीण कापलेलें नाक हातांत घेऊन रडत ओरडत रस्त्यावर गेली आणि ह्मणाली, पहा हो पहा, या दुष्टानें माझें नाक कापिलें. धांवा कोणी तरी, हा मला मारणार आहे. तिचें ओरडणें ऐकतांच चौकीवरचे शिपाई आले आणि त्यांनीं न्हाव्यास खूब मार देऊन कैद केलें.

दुसरे दिवशीं न्यायसभेंत न्यायाधीशासमोर जाऊन चौकीदार ह्मणाले, सरकार, या न्हाव्यानें, कांहींएक अपराध नसतां या स्त्रीला मोठी दुखापत केली. याकरितां याला योग्य शिक्षा व्हावी. नंतर न्यायाधीशानें न्हाव्यास विचारिलें, अरे, कां या स्त्रीला त्वां दुखापत केली? हिनें व्यभिचार केला, किंवा भांडण केलें, किंवा चोरी केली? हिचा अपराध काय असेल तो सांग. असें न्यायाधीशानें पुनः पुनः विचारिलें तरी तो बोलेना. तेव्हां न्यायाधीश ह्मणाला, चौकीदार ह्मणतात हेंच खरें आहे. यानें हा गुन्हा केला आहे. यानें अपराध केला नसता तर हा उगाच न बसता. यानें अपराध केल्यामुळें लज्जेनें मान खालीं घातली आहे. अपराध नसतां यानें स्त्रीला व्यंग केलें, याबद्दल यास सुळावर चढवावें हीच शिक्षा योग्य आहे. याप्रमाणें ठराव होतांच त्यास सुळावर चढविण्यास चालविलें. हें पाहून त्या बैराग्यास फार वाईट वाटलें. न्यायसभेंत जाऊन त्यानें न्यायाधीशास सर्व कची हकीकत सांगितली. तेव्हां त्यासही मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें त्या न्हाव्यास सोडून देऊन न्हाविणीचे दोन्ही कान कापून टाकावे असा हुकूम केला.

## तात्पर्य.

व्यसनी पुरुष असतात ते पाहिजे तसें दुराचरण करितात, त्यामुळें त्यांच्या घरांतील माणसांस चांगलें शिक्षण न मिळून तींही बिघडतात. कित्येक पुरुष असे आहेत कीं, आपण हवी तितकी बाहेरख्याली करून लोकांची लाज न धरितां त्यांतच भूषण मानितात. अशांस देखील आपल्या बायकोनें दुसऱ्याकडे नुसतें पाहिलें तरी राग येतो. जसें आपल्या बायकोनें दुसऱ्याकडे पाहिलेलें आपणास आवडत नाहीं, तसेंच आपण परस्त्रीकडे पाहिलें असतां तिच्या आंगाची आग होत असेल ही गोष्ट उघड असून त्यांस समजत नाहीं; हें मनुष्याच्या मूर्खपणाच्या अनेक उदाहरणांपैकींच एक मोठें ढळढळीत उदाहरण होय. ज्यास आपली स्त्री सदाचरणी असावी असें वाटत असेल, त्यानें आपण सदाचरणानें वागून तिला सन्मार्ग दाखविला पाहिजे. असें करणें हेंच शहाणपणास योग्य होय.

स्त्रियांनीं कितीही गुप्तपणें व्यभिचार केला तरी तो बाहेर आल्या-

शिवाय रहात नाहीं. यामुळेंच पाप झांकत नाहीं अशी म्हण पडली आहे. नवरा कसाही असला तरी त्यास पूज्य मानून पातिव्रत्यानें रहावें हेंच स्त्रियांस पुण्यकारक व सुखकारक आहे. वांकडें पाऊल पडलें तर इहलोकीं फजिती होऊन मेल्यावर नरकांत जावें लागेल. हें मनांत आणून स्त्रियांनीं कडकडीत पातिव्रत्य धरून रहावें.

खरा न्याय करण्याचें काम मोठें बिकट आहे. कित्येक वेळां दोन्ही पक्षांकडील पुरावा सारखाच सबळ असतो. अशा वेळेस खरें इंगित काढण्यास न्यायाधीशानें फारच सूक्ष्म विचार केला पाहिजे. एकापेक्षां दुसरा अधिक लबाड असला तर तो आपला पक्ष खोटा असूनही त्यास खरेपणाचें रूप आणितो. जो वास्तविक खरा असतो तो विनाकारण गोत्यांत आल्यामुळें दैवास दोष लावून चिंताक्रांत झालेला असतो. खोटा असतो तो मुद्दाम खऱ्यासारखी बतावणी करितो, त्यामुळें न्यायाधीश फसतात; अशी गोष्ट पुष्कळ वेळां घडते. याकरितां न्याय करणें हें मोठें जोखिमीचें काम आहे, असें समजून न्यायाधीशानें खरें बाहेर काढण्यास झटून श्रम केले पाहिजेत. केवळ पुराव्यावरच वरवर लक्ष देऊन उपयोग नाहीं. आपल्या कसूरीमुळें निरपराध मनुष्यास शिक्षा झाली तर आपणास त्याबद्दल ईश्वराजवळ जबाब द्यावा लागेल असें मनांत बाळगून न्याय करावा.

---

# गोष्ट ४७.

## गृध्र आणि बोका.

भागीरथीच्या तीरीं गृध्रकूट नांवाच्या पर्वतावर एक मोठा वृक्ष होता. त्यावर पुष्कळ पक्षी रहात होते. त्यांत जरद्गव नांवाचा एक आंधळा गृध्रपक्षी होता. त्यास इतर पक्षी आपल्या भक्ष्यांतून थोडथोडें खावयास देत, त्यामुळें त्याचा निर्वाह होई. पक्षी चारा आणण्यास बाहेर गेले म्हणजे तो त्यांच्या पिलांची राखण करीत असे. एके दिवशीं दीर्घकर्ण नांवाचा बोका तेथें आला. त्यास पहातांच पक्ष्यांचीं पिलें भयानें ओरडूं लागलीं. हें ऐकून जरद्गव म्हणाला, 'कोण आहे?' हें ऐकून बोका म्हणाला, महाराज वंदन करितों.

**गृध्र**—कोण रे तूं?

**बोका**—मी मार्जार आहें. मला दीर्घकर्ण म्हणतात.

**गृध्र**—जा, चालता हो; नाहीं तर मारून टाकीन.

**बोका**—आधीं मी काय म्हणतों तें ऐकून घ्या. मग मारा. चांगलें, वाईट, याची चौकशी केल्याशिवाय उगाच एकाद्यास दंड करूं नये.

**गृध्र**—येथें कशाला आलास, तें अगोदर सांग.

**बोका**—आतांशीं मी पूर्वी केलेल्या पातकांच्या प्रायश्चित्ताकरितां गंगास्नान करून उपोषणें करीत असतों. तुम्ही वृद्ध असून मोठे धार्मिक आहां असें ऐकिलें म्हणून कांहीं शास्त्रार्थ विचारण्यास आलों आहें; परंतु तुह्मी तर मारून टाकीन ह्मणतां; तेव्हां तुमचा धार्मिकपणा काय सांगावा? आदरसत्कार राहिला, नुसतें गोड बोलणें देखील तुह्मांपाशीं नाहीं ना?

**गृध्र**—अरे तुह्मी मांस खाणारे. येथें पक्ष्यांचीं पिलें आहेत म्हणून बोललों.

**बोका**—शिवशिव! अहो, आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव. पोटास आग लावण्याकरितां एवढें पातक कोण करील? मीं तर आतांशीं अन्नच वर्ज्य केलें आहे. नुसती रहावयास जागाच द्याल तर कांहीं दिवस तुमच्या सहवासाचें सुख मिळेल.

हें ऐकून गृध्रानें त्यास तेथें रहाण्यास सांगितलें. नंतर तो एकेक पिलूं खालीं आणून खाऊं लागला. बरींच पिलें नाहींतशीं झाल्यावर त्यांस पक्षी इकडे तिकडे शोधूं लागले. इतक्यांत दीर्घकर्ण पळून गेला. पुढें जरद्गवाच्या रहाण्याच्या ठिकाणीं पिलांचीं हाडें सांपडलीं तेव्हां यानेंच आपलीं पिलें खाल्लीं असें समजून पक्ष्यांनीं त्यास ठार मारिलें.

### तात्पर्य.

शत्रूनें कितीही आर्जवें केलीं तरी त्यास घरांत जागा देऊं नये. तो विश्वासघात करून नाश केल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

## गोष्ट ४८.

### हत्ती आणि कोल्हा.

ब्रह्मारण्य नांवाच्या वनांत कर्पूरतिलक नांवाचा एक हत्ती रहात

असे. एके समयीं त्यास पाहून सर्व कोल्ह्यांनीं विचार केला कीं, यास कोणत्या तरी युक्तीनें मारिलें अथवा हाच मेला तर चार महिने आपल्या खाण्याची चंगळ होईल. तेव्हां त्यांच्या मंडळींतील एक म्हातारा कोल्हा म्हणाला, मी आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यानें यास मारितों.

असें म्हणून तो लुच्चा कर्पूरतिलकाजवळ गेला, आणि त्यास साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, महाराज, सेवकावर कृपादृष्टि असावी.

**हत्ती**—कोणरे तू? आलास कोठून?

**कोल्हा**—मी कोल्हा आहें. सर्व वनपशूंनीं मला आपणाकडे पाठविलें आहे. जेथें कोणी राजा नाहीं तेथें रहाणें ठीक नाहीं. याकरितां आपण आम्हा सर्वांचे राजे व्हावें. आपण सर्वगुणसंपन्न असल्यामुळें आपणासच हा अधिकार योग्य आहे. याकरितां लवकर चलावें; नाहीं तर मुहूर्ताची वेळ जाईल.

हें ऐकून कर्पूरतिलकास आनंद होऊन तो कोल्ह्याच्या पाठीमागें धांवत चालला. कोल्हा पळत होता ती वाट दलदलीची होती तींत हत्ती फसला. तेव्हां कोल्ह्यास हाक मारून म्हणतो, आतां काय करावें? मी तर चिखलांत फसून खास मरतों. एकदा मागें तरी पहा. कोल्हा हंसून म्हणाला, महाराज, मजवर विश्वास ठेवून तुह्मी आलां याकरितां आतां माझें शेंपूट धरून वर उठा!

## तात्पर्य.

लोभ हा मनुष्याचा मोठा जबरदस्त शत्रु आहे. त्याच्या योगानें पुष्कळ लोक गोत्यांत पडले आहेत. लाभ दिसला ह्मणजे परिणामाचा विचार न करितां तो प्राप्त करून घेण्यास लोक प्रवृत्त होतात. मोठमोठे राजे देखील राज्य वाढविण्याच्या लोभानें यःकश्चित् मनुष्यापासून पराभव पावले आहेत. याकरितां कोठेंही लाभ दिसला तरी विचार केल्याशिवाय तो प्राप्त करून घेण्यास जाऊं नये.

---

# गोष्ट ४२.

## कुत्रा आणि गाढव.

काशीक्षेत्रीं कर्पूरपट नांवाचा एक परीट रहात असे. एके रा-

त्रीस तो आपल्या तरुणस्त्रीसहवर्तमान स्वस्थ निजला असतां घरांत चोर शिरला. तेव्हां त्याचा गाढव आंगण्यांत होता तो कुत्र्यास म्हणतो, अरे, मोठ्यानें भोंकूं लाग म्हणजे धनी जागा होईल. हें तुझें काम आहे.

**कुत्रा**—मित्रा, माझ्या कामाची चौकशी तुला नको. रात्रं-दिवस मी घराची राखण करीत असून आतांशीं हा मला पोटभर भाकर देखील देत नाहीं. नेईनाको चोर सगळें. माझें काय जातें?

**गाढव**—मूर्खा, ही वेळ असें करण्याची कायरे? इतके दिवस त्याचें अन्न खाऊन वेळेस असें करितोस काय? तू मोठा दुष्ट कृतघ्न आहेस. मीच आतां धन्याला जागा करितों.

असें ह्मणून तो मोठ्यानें ओरडूं लागला. त्याच्या कर्कश शब्दानें परीट जागा झाला, त्यामुळें रागावून त्यानें सोंटा घेऊन गाढवास मरेमरेतों मारिलें.

### तात्पर्य.

दुसऱ्याच्या कामांत हात घालूं नये. त्यामुळें फायदा तर एकीकडेसच रहातो, पण उलटें नुकसान मात्र होतें.

---

## गोष्ट ५०.

### सिंह आणि मांजर.

अर्बुदशिखर नांवाच्या पर्वतावर दुर्दांत नांवाचा एक सिंह रहात असे. तो गुहेंत निजला ह्मणजे एक उंदीर त्याचें आयाळ कुरतुडीत असे. जागा झाला म्हणजे उंदीर पट्दिशीं बिळांत जाई, यामुळें सिंहास तो सांपडत नसे. तेव्हां सिंह ह्मणाला, या क्षुद्र शत्रूला त्याच्या सारखाच वीर आणिला पाहिजे, एरवीं हा मरणार नाहीं. असा विचार करून त्यानें एक मांजर आणून त्यास चांगलें चांगलें खावयास देऊन बाळगिलें. तेव्हां मांजराच्या भयानें उंदीरही बिळांतून येईनासा झाला. त्यामुळें सिंहाचें आयाळ होतें तसें झालें. एके दिवशीं उंदरास फार भूक लागल्यामुळें तो बाहेर पडला. बाहेर पडतांच मांजरानें त्यास खाऊन टाकिलें. उंदराचें भय नाहींसें झा-

त्यामुळें सिंह मांजरास खावयास घालीनासा झाला. त्यामुळें कांहीं दिवसांनीं मांजरही मरून गेलें.

### तात्पर्य.

मोठे लोक असतात ते काम झाल्यावर गरीबांस विचारीत नाहींत, हें मनांत बाळगूनच आश्रितांनीं त्यांच्याशीं वागणूक ठेवावी.

---

## गोष्ट ५१.

## साप आणि बेडूक.

एका बागेंत जीर्णविष नांवाचा साप होता. तो म्हातारा झाल्यामुळें त्यास भक्ष्य शोधितां येईना. यामुळें एका तळ्याच्या कांठीं पडून राहिला. तेथें एक बेडूक होता, तो त्यास विचारूं लागला, मामा, आज रिकामे बसलां, कांहीं जेवणखाण करावयाचें नाहीं काय?

**साप**—अरे, मी हतभाग्य आहें. मला कशाला विचारतोस?

**बेडूक**—सांगा तर खरें काय आहे तें?

**साप**—पूर्वी मी ब्रह्मपुरांत रहाणाऱ्या कौंडिन्य नांवाच्या एका विद्वान् ब्राह्मणाच्या वीस वर्षांच्या मुलास डसलों, त्यामुळें तो मरण पावला. तेव्हां शोकांत होऊन त्यानें मला शाप दिला कीं, आजपासून तू बेडकांचें वाहन होशील. तेव्हांपासून बेडकांस पाठीवर नेण्याकरितां मी तळ्याजवळ जात असतों.

हें ऐकून बेडकानें लागलीच तळ्यांत जाऊन सर्वांस हें वर्तमान सांगितलें. तेव्हां प्रथम बेडकांचा राजा त्याकडे आला, त्यास डोकीवर घेऊन तो तऱ्हेतऱ्हेनें नाचूं लागला. याचप्रमाणें दुसरे दिवशीं तो सापाच्या पाठीवर बसला. परंतु साप नाचेना. तेव्हां त्यास ह्मणाला, कायरे, कालच्याप्रमाणें आज तू नाचत नाहींस?

**साप**—उपाशीं असल्यामुळें थकून गेलों आहें. खावयास मिळाल्याशिवाय नाचण्यास मला शक्ति येणार नाहीं.

हें ऐकून तो बेडकांचा राजा म्हणाला, बरें आहे, आजपासून तुला लागतील तितके बेडूक खात जा. याप्रमाणें हुकूम झाल्यावर तो बेडूक वर बसण्यास आले म्हणजे त्यांपैकीं कित्येकांस खात असे.

कांहीं दिवसांनीं सर्व बेडूक नाहींतसे झाल्यावर सापानें त्या बेडकांच्या राजासही खाऊन टाकिलें.

### तात्पर्य.

कार्यसाधु असतात ते प्रसंग पडला असतां अभिमान एकीकडेस ठेवून शत्रूस सुद्धां शरण जातात; परंतु वेळ आली म्हणजे आपलें काम करून घेतात. जुलमी राजे असतात त्यांच्या शरीरास सुख झालें ह्मणजे प्रजेला कितीही पीडा झाली तरी त्यांस वाईट वाटत नाहीं. परंतु अशा जुलुमानें प्रजेची हानि झाली ह्मणजे शत्रु त्यांचा नाश कारितात.

---

## गोष्ट ५२.

### ह्मातारी आणि राक्षस.

ब्रह्मपूर नांवाचें एक शहर होतें. त्याजवळच एक डोंगर होता. त्यावर घंटाकर्ण नांवाचा राक्षस रहातो अशी पुष्कळ दिवस दंतकथा होती. एका वेळीं एक चोर चोरी करून रानांतून पळत जात असतां त्यास एका वाघानें मारिलें. त्यामुळें त्याच्या हातांत घंटा होती ती तेथें पडली, ती एका वानरास सांपडली; तेव्हांपासून वानर नेहमीं ती वाजवीत असे. पुढें शहरांतील कांहीं लोक रानांत गेले तेव्हां मनुष्य मारिला हें त्यांस कळलें. त्यावरून त्यांनीं असें ठरविलें कीं, घंटाकर्ण राक्षस पिसाळला आहे, तो घंटा वाजवून माणसांस खातो. हें वर्तमान चोहोंकडे पसरलें तेव्हां सर्व लोक भिऊन गेले. त्या शहरांत कराला नांवाची एक म्हातारी होती, तिनें विचार केला कीं, अशी भलत्याच वेळेस आजपर्यंत घंटा वाजत नव्हती. तर याची चांगली चवकशी करावी. असा विचार करून ती तिकडे दररोज न्याहाळून पहात असे. तेव्हां वानर घंटा वाजवितो हें तिला कळलें. नंतर तिनें राजास अर्ज केला कीं, मी देवऋषीण आहें. पुष्कळ खर्च कराल तर या राक्षसाची पीडा मी नाहींशी करून टाकीन. राजानें तिचें म्हणणें कबूल करून तिला पुष्कळ द्रव्य दिलें. तेव्हां ह्मातारीनें हळद, कुंकु, फुलें वगैरे घेऊन ग्रामदेवतेची पूजा करून धूप जाळून भुयमुगाच्या शेंगा व वानरांस आवडणारीं

फळें वगैरे घेऊन रानांत जाऊन तीं फळें फेंकून दिलीं. तेव्हां वानर घंटा टाकून तीं खाण्यास गुंतले असतां म्हातारी घंटा घेऊन शहरांत आली, आणि राक्षसास गाडून टाकून त्याची घंटा घेऊन आलें असें सांगूं लागली. तें ऐकून सर्वलोकांनीं उपकार मानून तिची वहावा केली.

## तात्पर्य.

पुष्कळ लोक, कांहीं अवचित पीडा झाली म्हणजे तिच्या खऱ्या कारणाचा शोध न करितां कांहीं तरी खोट्याचें आहे असें समजून देवऋष्यांकडे जातात. या देवऋष्यांनीं पुष्कळ भोळसर लोकांस नादीं लावून भलभलत्याच भुतांच्या गोष्टी सांगून फसविलें आहे. मनुष्यें जिवंत असतां किती दुर्बळ असतात? अशा मनुष्यांस मेल्यावर भुतें होऊन निरपराध मनुष्यास पीडा करितां येते, असें युक्तीच्या दृष्टीनें संभवत नाहीं. व करितां येते असें घेऊन चाललें तरी, इतरांसारखेंच किंबहुना इतरांपेक्षां अडाणी अशा देवऋष्यांस ती दूर करितां येईल, असें मानणें हेंही महामूर्खपणाचें काम आहे. याकरितां या ठकांच्या नादीं न लागतां पीडा दूर करण्यास योग्य उपाय केले तरच हित होईल. लुचे देवऋषी पीडा दूर न करितां उलटा पैसामात्र उपटतात.

---

# गोष्ट ५३.

## हंस आणि कावळा.

उज्जनी शहराच्या वाटेवर पळसाचा एक मोठा वृक्ष होता. त्यावर एक हंस आणि एक कावळा असे दोन पक्षी रहात होते. उन्हाळ्यांतील एके दिवशीं दुपारीं एक पारधी दमल्यामुळें हातांतील तिरकमठा जमिनीवर ठेवून त्या झाडाखालीं निजला. कांहीं वेळानें सूर्य फिरल्यामुळें त्याच्या तोंडावरची सावली जाऊन उन्हाचा कवडसा पडला. हें पाहून हंसास वाईट वाटून त्यानें आपले पंख पसरून त्याच्या मुखावर सावली केली. त्यामुळें गाढ झोंप लागून सुखावल्यामुळें पारध्याचें तोंड उघडलें होतें. कावळा स्वभावतः दुष्ट असल्यामुळें त्याला पारध्याचें सुख सहन न होऊन तो त्याच्या तोंडांत

शिटून पळाला. त्यामुळें पारधी जागा होऊन वर पहातो तों त्यास हंस दिसला. तेव्हां लागलेंच तीर मारून त्यानें हंसाचा प्राण घेतला.

### तात्पर्य.

दुष्ट असतात ते स्वतः कोणावर उपकार करीत नाहींत इतकेंच नाहीं, तर दुसऱ्यावर कोणी उपकार केला तरी त्यांस फार वाईट वाटतें. सज्जनानें दुष्टाच्या वाऱ्यास देखील उभें राहूं नये. तो आपणावर केव्हां कोणतें संकट आणील याचा नेम नाहीं. सज्जनानें सत्कृत्य केलें तरी दुष्टाच्या योगानें त्यापासून अनर्थ उत्पन्न होतो. आपण निरपराध असल्यामुळें सज्जन असावध असतो. परंतु दुर्जनानें केलेल्या कृत्याचें प्रायश्चित्त त्यास भोगावें लागतें. याकरितां दुष्टाची संगती करूं नये हेंच चांगलें.

---

## गोष्ट ५४.

### ऋषी आणि उंदीर.

पूर्वी तपोवनांत महातपा नांवाचा एक ऋषी होता. एके वेळीं तो संध्या करीत बसला असतां एक उंदराचें पिलूं भिंतीजवळून जातांना त्याचे दृष्टीस पडलें. इतक्यांत मांजरानें त्यावर झडप घातली. तेव्हां ऋषीस दया येऊन त्यानें मांजरास हांकून लावून त्या उंदराच्या पिल्लास सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेविलें. तेथें दररोज तो त्यास दाणे खावयास घालीत असे. कांहीं दिवसांनीं तो उंदीर मोठा झाला. केव्हां तरी सवड पाहून त्यास धरावें म्हणून मांजर टपलेलेंच असे. एके दिवशीं त्यानें पुनः उंदरावर उडी टाकिली, परंतु दैवयोगानें तो निसटून ऋषी बसला होता त्याच्या मांडीखालीं गेला. तेव्हां ऋषी ह्मणाला, तू मांजरास भितोस तर तूंच मांजर हो म्हणजे झालें. असा वर देतांच तो मांजर झाला. तेव्हां कुत्रा त्याच्या पाठीस लागला; हें पाहून ऋषी ह्मणाला, तू कुत्रा हो. असें ह्मटल्याबरोबर तो कुत्रा झाला. पण तो वाघास भिऊं लागला तेव्हां ऋषीनें वर देऊन त्यास वाघ केलें. तेव्हां लोक ह्मणूं लागले कीं, या ऋषीनें ह्या उंदराचा वाघ केलेला आहे. हें ऐकून त्या वाघास वाटलें, हा ऋषी आहे तोंपर्यंत लोक माझी मूळची स्थिति काढल्या-

शिवाय रहाणार नाहींत. असा विचार करून तो ऋषीस मारण्यास गेला; हें पाहून ऋषीनें त्यास पुन्हा उंदीर हो, असा शाप देतांच तो उंदीर झाला.

### तात्पर्य.

नीच असतात ते थोरांच्या आश्रयानें श्रीमान् झाले म्हणजे फार माजतात. गर्वानें ते आपल्या आश्रयदात्याचीसुद्धां अवज्ञा करूं लागतात. मदांध झाल्यामुळें ज्यानें आपणास उच्चपदास चढविलें, तो तेथूनही खालीं उतरील हें त्यांच्या ध्यानांत रहात नाहीं. शेवटीं निरुपाय झाल्यामुळें यजमानास तसें करणें भाग पडतें. याकरितां योग्यता न पहातां थोरानें हलक्यास भलत्याच पदवीवर चढवूं नये. हलक्यानेंही धन्याच्या कृपेनें ऐश्वर्य प्राप्त झालें तर गर्विष्ठ न होतां पूर्वस्थिति मनांत आणून रहावें. असें केलें तरच त्याचें ऐश्वर्य टिकेल.

---

## गोष्ट ५५.

## न्हावी आणि बैरागी.

पाटलिपुत्र नामक नगरांत एक मणिभद्र नांवाचा जैनवाणी रहात असे. तो मोठा धार्मिक असे. दुर्दैवानें एके वेळीं त्याचें दिवाळें वाजलें. त्यामुळें फजिती होऊन त्यास फार दुःख झालें. एके दिवशीं अंथरुणावर पडला असतां तो आपणाशींच म्हणाला, एक द्रव्य जवळ नसलें ह्मणजे सुस्वभाव, निष्कपटपणा, क्षमा, दक्षता, मधुरभाषण, कुलीनपणा, मन्न, गर्व, शहाणपणा हीं सर्व व्यर्थ आहेत; याकरितां अन्न वर्ज्य करून प्राणत्याग करावा हें बरें. याप्रमाणें काळजी करीत असतां त्यास झोंप लागली, तेव्हां त्यास दृष्टांत झाला. स्वप्नांत एका बैराग्यानें येऊन सांगितलें कीं, अरे मणिभद्रा. असा विरक्त होऊं नको. तुझ्या पूर्वजांच्या पुण्यानें मी तुला प्रसन्न झालों आहें. उद्यां तुझ्याकडे एक बैरागी येईल त्यास सोट्यानें मार म्हणजे तो खालीं पडून सुवर्णमय होईल. असें स्वप्न पाहून तो जागा झाला. उजाडल्यावर या स्वप्नाचा अर्थ काय असावा, असा मनींत विचार करूं लागला. तो ह्मणाला हें स्वप्न खरें होतें किंवा नाहीं कोण जाणे. किंवा सारा दिवसभर मनांत द्रव्य घोटाळत असतें ह्मणून स्वप्न पडलें नसेल कशावरून ? दुखणेकरी, शोकग्रस्त, चिता-

क्रांत, कामार्त, उन्मत्त, यांस असलीं शुष्क स्वप्नें पडतात. याप्रमाणें विचार करीत असतां त्या दिवशीं त्यास हजामत करावयाची होती, ह्मणून एक न्हावी आला. इतक्यांत स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें बैरागीही येऊन ठेपला. तेव्हां वाण्यानें त्यास एक मोठा सोटा मारतांच तो भूमीवर पडून सुवर्णमय झाला. लागलींच वाण्यानें त्यास घरांत नेऊन कोणास कळणार नाहीं अशा जागीं नेऊन ठेविलें. नंतर त्या न्हाव्यास बरेच पैसे व वस्त्रें देऊन तो म्हणाला, अरे हें घे, पण कोणाला ही गोष्ट कळवूं नको.

न्हावी घरीं गेल्यावर विचार करूं लागला कीं, बैराग्यास सोट्यानें मारिलें तर तो सोन्याचा होतो. याकरितां उद्यां पुष्कळ बैराग्यांस घरीं बोलावून सोट्यानें ठार करितों, म्हणजे माझ्या घरांत सोनेंच सोनें, होईल. असा विचार करून एक मोठा सोटा तयार करून ठेवून तो बैराग्यांच्या मठांत गेला. आणि बैराग्यांच्या गुरूस साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, महाराज, आज आपण सर्व शिष्यांसहवर्तमान माझ्या घरीं पुढीला येऊन चरणधुळीनें माझें घर पवित्र करावें.

**गुरु**—अरे, आम्हांला कशाला बोलावतोस? आम्ही कांहीं मोठ्या विद्वान् ब्राह्मणांसारखे पूज्य नाहीं. आम्ही भिक्षा मागून निर्वाह करितों. त्या वेळेसच कोणीं बोलाविलें तर जातों. तूं जा आतां, पुनः असा बोलावण्यास येऊं नको.

**न्हावी**—आपण भिक्षेशिवाय कोठेंही अन्न ग्रहण करीत नाहीं, हें मला ठाऊक आहे; परंतु भिक्षेलाच माझ्या घरीं या. मला आपणास द्रव्य द्यावयाचें आहे तें पुस्तकें लिहिण्याकरितां लेखकांस म्हणून देईन.

असें म्हणून न्हावी घरीं गेला, आणि खैराचा मोठा सोटा हातांत घेऊन दारामागें उभा राहिला. दुपार झाली तरी बैरागी आले नाहींत, म्हणून पुनः बोलावण्यास जाऊन त्यांच्या गुरूस साष्टांग नमस्कार घालून पुष्कळ आर्जवें करून त्या सर्वांस घरीं घेऊन आला. सर्वजण त्याच्या आंगणांत येतांच त्यानें जोरानें सोटा चालविला. त्यामुळें कित्येक वर्मीं लागून ठार झाले. कित्येक जखमी होऊन रडत ओरडत रस्त्यांतून धांवूं लागले. तेव्हां शहरांत एकच गोंगाट झाला. तो ऐकून चौकीवरचे शिपाई चौकशी करीत तेथें आले.

तेव्हां कित्येक वैरागी न्हाव्याच्या आंगणांत मेलेले, कित्येक जखमी होऊन पडलेले, पाहून त्यांनीं न्हाव्याच्या मुसक्या बांधून त्यास न्यायसभेंत नेलें. तेथें त्वां असें घोर दुष्ट कृत्य कां केलें ? असें त्यास न्यायाधीशांनीं विचारिलें; तेव्हां तो ह्मणाला, मजकडे काय आहे ? मणिभद्रशेटजीच्या घरीं जसें पाहिलें तसेंच मी केलें. असें म्हणून त्यानें मणिभद्राच्या घरीं झालेला सर्व वृत्तांत न्यायाधीशास सांगितला. त्यावरून मणिभद्रास समक्ष बोलावून तुम्हीं एकादा वैरागी मारिला काय ? असें न्यायाधीशांनीं त्यास विचारिलें. तेव्हां मणिभद्रानें झालेला वृत्तांत सांगितला. तो ऐकून न्यायाधीश म्हणाले, या दुष्ट न्हाव्याला सुळावर चढवा.

### तात्पर्य.

जी गोष्ट आपण चांगली पाहिली नाहीं, चांगली समजून घेतली नाहीं, चांगली ऐकिली नाहीं, व चांगली पारखिलीही नाहीं, तीं आपण करूं नये. हित होण्याचे जगांत अनेक मार्ग आहेत, ते सर्वांस सारखे लागू पडतील असें नाहीं. जी गोष्ट एकास अनुकूळ असते तीच दुसऱ्यास प्रतिकूळ होते. याकरितां पुरता विचार केल्याशिवाय दुसऱ्यानें अमुक केलें म्हणून तें आपण करूं नये. त्यापासून फायदा न होतां उलटा नाश मात्र होतो.

---

## गोष्ट ५६.

## वानर आणि मगर.

समुद्रतीरीं जांभळीचा मोठा एक वृक्ष होता. त्यावर बारमहा जांभळें लागत. त्या वृक्षावर रक्तमुख नांवाचा एक वानर रहात असे. एके दिवशीं करालमुख नांवाचा एक मोठा मगर पाण्यांतून निघून त्या झाडाखालीं वाळवंटावर बसला. तेव्हां रक्तमुख त्यास म्हणाला, अहो, आज तुह्मी माझ्या घरीं पाहुणे आलां, याकरितां मी अमृतासारखीं मधुर जांभळें देतों हीं खा. असें म्हणून त्यानें त्यास पुष्कळ जांभळें दिलीं. तीं खाऊन त्यास फार संतोष झाला. नंतर पुष्कळ वेळ आनंदानें वानराशीं गोष्टी सांगून मगर पाण्यांत गेला. जांभळांची गोडी लागल्यामुळें तो रोज येऊं लागला. आपण कांहीं जांभळें खाऊन कांहीं आपल्या बायकोस नेऊन देत असे. एके दिवशीं

मगरी त्यास ह्मणाली, प्राणनाथ, असलीं अमृतासारखीं गोड फळें आपण कोठून आणितां ?

**मगर**—प्रिये, रक्तमुख नांवाचा वानर माझा मोठा मित्र आहे, तो नेहमीं हीं फळें मला देतो.

**मगरी**—असलीं अमृतासारखीं फळें तो नेहमीं खातो, त्यामुळें त्याचें काळीज अमृतरूपच झालें असेल. तुह्मांला बायकोची गरज असेल तर तें मला आणून द्या, म्हणजे मी तें खाऊन अजरामर होईन, आणि तुम्हांस यथेच्छ उपभोग देऊन निरंतर सुखी करीन.

**मगर**—असला भलताच हट्ट करूं नको. एकतर तो माझ्या भावासारखा आहे, शिवाय त्याला मारितांही यावयाचें नाहीं.

**मगरी**—आजपर्यंत तुम्ही कधींही माझें म्हणणें मोडलें नाहीं. आतांशीं दिवसभर तुह्मी तिकडेच असतां. यावरून खास असें वाटतें कीं, तुमचें त्या वानरिणीशीं सख्य जमलें आहे. ह्मणूनच आतांशीं तुह्मी मजबरोबर नीट बोलत नाहीं. कांहीं मागितलें तरी तें देत नाहीं. रात्रभर रागानें जळत असतां, दृढालिंगन करीत नाहीं, चुंबनही घेत नाहीं. यावरून अर्थात् तुमच्या मनांत कोणी दुसरी स्त्री असल्याशिवाय असें होणार नाहीं. तुम्ही मोठे कपटी आहां.

हें ऐकून तो तिच्या पायां पडून तिला जवळ घेऊन समजावणी करूं लागला. तेव्हां ती ह्मणाली, तुम्हीं कांहीं केलें तरी ती सटवी तुमच्या मनांत आहे, यांत संशय नाहीं. पुरे आतां, पायां पडून काय होतें ? तुमचें व तिचें सख्य नसतें तर मजकरितां तुह्मीं त्याला मारिलें असतें. नाहीं तर वानराशीं एवढा स्नेह कशाला असणार ? फार कशाला बोलूं ? मला त्याचें काळीज मिळालें नाहीं तर अन्न वर्ज्य करून जीव देईन.

असा तिचा निश्चय पाहून तो मगर मोठ्या काळजींत पडला. तो ह्मणाला, बायकांनीं एकदा हट्ट घेतला म्हणजे जीव गेला तरी तो जावयाचा नाहीं. आतां या संकटास काय करावें ? याला मारावें तरी कसें ? असा विचार करीत तो वानराजवळ गेला. मगर उशीरानें आलेला असून काळजींत पडलेला आहे असें पाहून वानर त्यास म्हणाला, मित्रा, रोजच्यापेक्षां आज कां उशीरानें आलास ?

**मगर**—मित्रा, तुझी वहिनी मजवर फार रागें भरली. ती ह्मणाली, मला तुह्मी तोंड देखिल दाखवूं नका. नेहमीं तुम्ही आपल्या

सीचल्याच्या घरीं जाऊन यथेच्छ चमचमाट करतां, पण त्याला आपलें घर पहावयास एक दिवस देखील आणीत नाहीं. हा काय कृतघ्नपणा! आज भाऊजींला घेऊन या, नाहीं तर आतां तुमची माझी गांठ परलोकीं पडेल. असें ती म्हणाली, म्हणून येण्यास मला उशीर लागला. इतका वेळ तिजबरोबर भांडण्यांत गेला. याकरितां आज आमच्या घरीं चला. तुझी भावजय वाट पहात बसली आहे.

**वानर**—मित्रा, तू म्हणतोस तें खरें, एकमेकांनीं एकमेकांकडे जावें यावें यांतच मजा आहे. पण आम्ही वनचर. तुमच्या पाण्यांतील घरांत यावें कसें? याकरितां वहिनीलाच येथें आण.

**मगर**—मित्रा, पलीकडल्या किनाऱ्यावरच आमची रहाण्याची जागा आहे. खुशाल माझ्या पाठीवर बसून चल.

हें ऐकून वानर आनंदानें म्हणाला, बरें आहे, असें असेल तर माझ्याकडून उशीर नाहीं. चल, हा मी तुझ्या पाठीवर बसतों. त्याप्रमाणें केल्यावर मगर त्यास पाण्यांत घेऊन चालला. तो अधिकाधिक खोल पाण्याकडे जाऊं लागला तेव्हां वानर त्यास म्हणाला, दादा, हळूहळू चल. लाटांनीं मी सगळा भिजून गेलों आहें. हें ऐकून मगर मनांत म्हणाला, हा खोल पाण्यांत आला हा माझ्या तावडींत सांपडला. आतां याच्यानें कोठें जाववणार आहे? आतां याला आपला अभिप्राय सांगतों, म्हणजे हा देवाचें नांव घेईल. असा विचार करून म्हणाला, अरे, बायकोच्या हट्टाकरितां तुला मीं येथें फसवून आणिलें. आतां घे एकदा देवाचें नांव!

हें ऐकून वानर म्हणाला, अरे, तुझीं मला मारण्याचा बेत केला, असें म्यां तुझें किंवा तिचें काय वाईट केलें.

**मगर**—अरे, अमृतासारखीं फळें खाऊन तुझें गोड झालेलें कालीज खाण्याचे तिला डोहळे लागले आहेत, म्हणून मी असें केलें.

**वानर**—असें आहे तर मला तेथेंच कां सांगितलें नाहीं? मी आपलें काळीज नेहमीं जांभळीच्या झाडावर ठेवीत असतों. तें वहिनीला आणून दिलें असतें. मला काळजाशिवाय रिकामें कशाला आणिलेंस?

हें ऐकून आनंदानें मगर ह्मणाला, असें आहे तर मला तेवढें काळीज दे, ह्मणजे ती द्वाड बायको हट्ट सोडून जीव देणार नाहीं. पुनः मी तुला त्या जांभळीच्या वृक्षाजवळ नेतों. असें ह्मणून पुनः

त्या वृक्षाजवळ आला. तेव्हां वानरही लवकर लवकर मोठमोठ्या उड्या मारून पटदिशीं वृक्षाच्या शेंड्यावर जाऊन बसला, आणि मनांत म्हणाला, आज मी काळाच्या जबड्यांतून कसा तरी सुटलों. लबाडावर कधींही विश्वास ठेवूं नये. विश्वास ठेवल्यानें मोठमोठे अनर्थ होतात. आज माझें पुनर्जन्म झालें. नंतर तो मगर त्यास ह्मणाला, मित्रा, तेवढें काळीज दे. तुझी वहिनी तें खाऊन संतुष्ट होईल.

वानर हंसून त्यास शिव्या देऊन ह्मणाला, विश्वासघातक्या मूर्खा, कोणाला तरी काळीज वेगळें काढून ठेवितां येईल काय ? निघून जा येथून. येथें पुनः येऊं नको.

हें ऐकून आश्चर्यानें मगर मनांत ह्मणाला, म्यां मूर्खानें याला आपला मतलब सांगितला म्हणून असें झालें. आतां पुनः फसून आला तर बरें होईल. असा विचार करून ह्मणाला, मित्रा, मी थट्टा केली. तिला तुझ्या काळजाचें काय करावयाचें ? पाहुणचाराकरितां बोलाविलें, चल आतां, ती वाट पहात असेल.

**वानर**— दुष्टा, चालता हो, त्वां कांहीं केलें तरी मी पुनः येणार नाहीं.

**मगर**—मित्रा, असें करूं नको. घरीं येऊन मजवरचा कृतघ्नपणाचा दोष काढून टाक. नाहीं तर तुझ्या नांवानें येथें जीव देईन.

**वानर**—त्वां कपट केलें होतें, परंतु माझ्या खरेपणामुळें तें व्यर्थ झालें. तुजकडून आतां फसला जाईन इतका मी मूर्ख नाहीं. पुनः मला फसविण्याचा तूं उद्योग करितोस, यांत आश्चर्य नाहीं; हा दुष्टांचा स्वभावच आहे. साधूच्या संगाने दुष्ट चांगले व्हावयाचे नाहींत. स्त्रीलंपटा मूर्खा, तुजसारखे जे मूर्ख स्त्रीजित आहेत, ते असें करून आपला नाश करून घेतात.

असें त्याचें भाषण चाललें असतां दुसऱ्या एका जलचरानें येऊन सांगितलें कीं, मगरा, तुझी बायको हट्टानें उपास करीत बसली होती ती तुला येण्यास उशीर लागल्यामुळें मेली. हें ऐकून मगरास फार वाईट वाटून तो म्हणाला, मी मोठा दुर्दैवी आहें. मला कांहीं नाहींसें झालें. बायको असली तर घरदार सर्व कांहीं आहे. ती नाहीं तर त्याचा काय उपयोग ? मित्रा, आतां मला क्षमा कर. बायकोच्या विरहाचें दुःख सहन होत नसल्यामुळें मी जीव देण्यास

जानों. हें ऐकून वानर हंसून म्हणाला, मीं आधींच सांगितलें कीं, तू स्त्रीजित आहेस, त्याचा अनुभव आला. अरे, असली दुष्ट बायको मेली म्हणून आनंद मानावयाचा, तें सोडून दुःख कां करितोस? असल्या बायकोचें तोंड देखील पाहूं नये.

**मगर**—दोन अनर्थ झाले. घर नाहींसें झालें, आणि तुझ्यासारखा मित्रही नाहींसा झाला.

ते असें बोलत आहेत तों दुसऱ्या एका जलचरानें येऊन सांगितलें कीं, अरे तुझें घर दुसऱ्या एका मोठ्या जबरदस्त मगरानें घेतलें. हें ऐकून तो त्यास घरांतून काढून टाकण्याचा उपाय योजूं लागला. तो मनांत म्हणाला; मित्र शत्रु झाला, बायको मेली, घर दुसऱ्यानें घेतलें, आणखी काय काय व्हावयाचें आहे तें कोणाला ठाऊक? संकटें येऊं लागलीं म्हणजे एकामागून एक येतात, असें म्हणतात तें खरें आहे. आतां त्याशीं युद्ध करावें किंवा गोडीगुलाबीनेंच त्यास बाहेर घालवावें, अथवा फसवून किंवा कांहीं देऊन बाहेर काढावें? या वानरास कसें करूं तें विचारितों. शहाण्याचा सल्ला घेऊन काम केलें असतां नाश होत नाहीं. असा विचार करून वानरास पुनः म्हणाला, मित्रा, पहा मी कसा दुर्दैवी आहें तो? माझें घर देखील दुसऱ्यानें घेतलें. आतां मी साम, दान, दण्ड, भेद, यांपैकीं कोणता उपाय करूं तें सांग?

**वानर**—कृतघ्ना चालता हो, म्हणून एक वेळ सांगितलें, आतां पुनः कां बोलतोस? मी मूर्खाला उपदेश करीत नाहीं.

**मगर**—मित्रा, मी अपराधी आहें खरा, परंतु पूर्वीचा स्नेह मनांत आणून तरी सांग.

**वानर**—बायकोच्या सांगण्यावरून मला समुद्रांत टाकण्याकरितां त्वां नेलें; याकरितां मी सांगणार नाहीं. तू मूर्ख आहेस, तुला कांहीं समजत नाहीं. बायकोचें ऐकिल्यामुळें तुला हा प्रसंग आला आहे.

**मगर**—मी दुष्ट खरा, पण मजवर कृपा करून मला माझें घर पुनः मिळेल असा कांहीं उपाय सांग.

**वानर**—मी सांगितल्याप्रमाणें तू करणार नाहींस.

**मगर**—सांगाल तसें करीन.

वानर—जा आणि त्याबरोबर युद्ध कर. युद्धाशिवाय शत्रूचा नाश व्हावयाचा नाहीं.

हें ऐकून रणांत मरण आलें तरी बरेंच; असें ह्मणून मगर घरीं गेला, आणि घरांत शिरलेल्या मगराबरोबर युद्ध करून त्यास मारून सुखानें घरांत राहूं लागला.

## तात्पर्य.

जगाची स्थिति फारच चमत्कारिक आहे. त्यांत दुष्ट, लोभी, विषयासक्त असे पुष्कळ लोक असल्यामुळें आपण कितीही चांगल्या रीतीनें वागत असलों तरी संकट येणार नाहीं असें कोणीं समजूं नये. प्रसंगीं उपयोग व्हावा म्हणून ज्यांवर आपण उपकार करून त्यांशीं प्रेमानें वागतों, तेच कधीं कधीं आपले शत्रु होतात. स्त्रीजित असतो तो काय करील याचा तर नेमच नाहीं. जन्मापासून स्वतः कष्ट सोसून ज्यांनीं आपलें संगोपन करून वाढविलें, त्या मातापितरांस देखील स्त्रीलंपट मनुष्य टाकितो, मग दुसऱ्याची काय कथा? एकवार मनुष्य व्यसनी झाला म्हणजे त्यास योग्यायोग्य, खरें खोटें, चांगलें वाईट, हें कांहीं कळेनासें होतें. त्यामुळें तो लोकांस फसविण्याचा यत्न करूं लागला तरी त्याचा यत्न सहसा सफल होत नाहीं, तथापि अशांपासून फसवून न घेण्यापुरतें आंगीं शहाणपण असलें तरच निभावणी होते. ज्यांच्या आंगीं तें नसतें ते फसतात. मगर स्त्रीलंपट असल्यामुळें त्यानें वानराच्या म्हणण्याचा विचार केला नाहीं. परंतु वानरास जीव जाण्याच्या वेळेस युक्ति सुचली म्हणून बरें झालें. नाहीं तर दुसरा तरणोपाय नव्हता. तसेंच ज्यानें एकदा विश्वासघात केला, त्यावर पुनः कधींही विश्वास ठेवूं नये. तो निर्लज्ज असल्यामुळें हातींपायीं पडून रडूनकढून आर्जवें करूं लागतो, आणि फसवून आपला मतलब साधण्याकरितां कांहीं दिवस चांगला वागतो, तरी शेवटीं फसविल्याशिवाय रहात नाहीं. वानराच्या शेवटल्या आचरणावरून असें समजतें कीं, खरे सज्जन असतात त्यांचा कोणी विश्वासघातानें नाश करूं लागला तर ते त्याच्या नाशास प्रवृत्त न होतां आपला बचाव करून त्यास आपणापासून दूर मात्र करितात.

# गोष्ट ५७.

## कावळे आणि घुवड.

दक्षिणदेशीं महिलारोप्य नांवाचें एक नगर होतें. त्याच्याजवळ मोठा एक वटवृक्ष होता. त्यावर अनेक पक्षी रहात असत. त्यांत मेघवर्ण नांवाचा एक कावळ्यांचा राजा होता. तो अनेक प्रकारचीं घरटीं बांधून आपल्या परिवारासह तेथें सुखानें रहात असे. तेथून जवळच एक डोंगर होता, त्याच्या गुहेंत अरिमर्दन नांवाचा एक घुवडांचा राजा रहात असे. रात्रीस तो त्या वटवृक्षाजवळ येऊन कोणी कावळा सांपडला असतां त्यास मारीत असे. असें चाललें असतां बहुतेक कावळ्यांचा फडशा पडत चालला. तेव्हां मेघवर्ण आपल्या सर्व प्रधानांस बोलावून ह्मणाला, आपला शत्रु मोठा प्रबळ असून उद्योगी आहे. आह्मांपासून भय नाहीं अशा वेळेस येऊन आमचा नाश करितो. तर याचा पराभव करण्यास कोणता उपाय करावा? रात्रीस आपल्यास दिसत नाहीं; आणि त्याचें रहाण्याचें ठिकाणही ठाऊक नसल्यामुळें दिवसास तेथें जाऊन त्याचा पराजय करितां येत नाहीं. याकरितां तह, लढाई, पळ काढणें, किल्ल्याची बंदस्ती करून आंत रहाणें, दुसऱ्या कोणाची मदत घेणें, किंवा शत्रूंत फितूर करणें, यांपैकीं काय करावें तें सांगा.

मेघवर्णाचे उज्जीवी, संजीवी, अनुजीवी, प्रजीवी आणि चिरंजीवी, असे पांच प्रधान होते. हें राजाचें भाषण ऐकून ते म्हणाले, आपला प्रश्न योग्य आहे. विचारल्याशिवाय देखील राजास प्रधानानें मसलत सांगितली पाहिजे. विचारल्यावर तर फार लवकर सांगितली पाहिजे. तोंडावर गोड बोलून योग्य मसलत देणार नाहीं, तो कसला प्रधान? गोड बोलणारे पुष्कळ असतात, परंतु कडू असून हितकारक असें बोलणारे फारच थोडे. याकरितां आह्मांस योग्य वाटेल तें सांगूं याबद्दल क्षमा असावी.

प्रधानाचें बोलणें ऐकून प्रथमतः उज्जीवी नांवाच्या प्रधानास राजा म्हणाला, प्रधानजी, तुमचें काय मत आहे तें सांगा.

**उज्जीवी**—महाराज, शत्रु बळकट आहे याकरितां याशीं लढाई करूं नये, असें माझें मत आहे. अपमान झाला तरी हितेच्छूनें बलवानाशीं स्पर्धा करूं नये. तो दुष्ट असला तरी त्याशीं सलाच क-

रावा. जीव बचावला तर केव्हां तरी त्याचा सूड उगवितां येईल. युद्धामध्यें कोणाचा जय होईल याचा नेम नाहीं, याचकरितां बरोबरीच्या शत्रूशीं सल्ला करावा. जयाचा संशय असेल तेथें संकटांत पडणें चांगलें नाहीं. युद्धामध्यें जय होण्याचा संशय आहे याकरितां साम, दान, भेद, हे तीन उपाय न चालतील तर चौथा ह्मणजे युद्धाचा उपाय करावा.

दगडावर मडकें पडलें किंवा मडक्यावर दगड पडला तरी मडकेंच फुटतें. त्याप्रमाणें अशक्त सशक्ताच्या आंगावर गेला किंवा सशक्त अशक्ताच्या आंगावर आला, तरी अशक्ताचाच नाश होतो. कांहीं तरी लाभ होण्याची खात्री असल्याशिवाय लढाई करून काय करावयाचें? ज्यांत कांहींएक लाभ नाहीं असा कलह करूं नये. दुसऱ्यानें केला तरी वाढवूं नये. बळकटाबरोबर गांठ पडली तर वेतासारखें लवून रहावें हें चांगलें. सर्पासारखे पाहिजे त्यावर फुत्कारे टाकिले तर डोक्यांत सोटाच बसतो. कांसवासारखे पोटांत पाय घालून उगाच बसावें. वेळ आली ह्मणजे सापासारखी फणा उंच करावी. भांडणाची वेळ आली तर होईल तितकें करून सल्ला करावा. जयाचा नेम नाहीं, याकरितां उतावळीनें लढाईस प्रवृत्त होऊं नये. ढग एवढा मोठा असतो; परंतु वारा उलटा असला तर त्याचें कांहीं चालत नाहीं.

याप्रमाणें संधि करण्याविषयीं उज्जीवीचें भाषण ऐकून राजा संजीवीस म्हणाला, तुमचा काय अभिप्राय आहे तो सांगावा.

**संजीवी**—महाराज, शत्रूबरोबर तह करण्याविषयीं माझें मत नाहीं. विस्तवानें पाण्याशीं कितीही ऐक्य केलें तरी तें त्यावर पडलें म्हणजे त्याचा नाशच करितें; याकरितां लढाई करून शत्रूचा पराभव करावा, असें मी म्हणतों. शिवाय आपला शत्रु मोठा दुष्ट आहे, नीतीची व त्याची ओळख देखील नाहीं. त्याशीं सल्ला करणें फारच वाईट. अशाशीं सख्य केलें तरी फार दिवस टिकावयाचें नाहीं. त्यानें आमचा पुष्कळ नाश केला आहे. सल्ला केला तरी तो कावळ्यांना मारल्याशिवाय रहाणार नाहीं. जेथें दंडच करणें योग्य आहे, तेथें सल्ला करून उपयोग व्हावयाचा नाहीं. ज्वरानें आंगाची आग झाली तर पाणी घालून ती शांत व्हावयाची नाहीं. तूप कढत असून त्यांत पाणी टाकिलें म्हणजे अधिक कडकडतें, त्याप्रमाणें दुष्टाशीं

गोड बोललें तर तो अधिक त्रास देतो. शत्रु बलवान् आहे म्हणून त्याशीं सन्धि करावा, असें आपलें म्हणणें असेल तर त्यावरही मला असें कळविणें आहे कीं, हत्ती मोठा थोरला असतो, पण एवढासा सिंह त्याच्या गंडस्थळावर पाय देत नाहीं काय? लहानानें उत्साह धरून शत्रु बळकट असला तर त्याला कपटानें फसवावें. जो राजा शत्रूंचा नाश करीत नाहीं, तो तृणासारिखा होय. असा पुरुष जन्मून तरी उपयोग काय? तो मातेला व्यर्थ शीण मात्र करितो.

याप्रमाणें संजीवीचा लढाईविषयीं अभिप्राय ऐकून राजा अनुजीवीस म्हणाला, आपलें काय मत आहे तें सांगा.

**अनुजीवी**—महाराज, शत्रु दुष्ट असून बळकट आहे, याकरितां त्याशीं सल्ला करूं नये व लढाईही करूं नये. या वेळेस आपली जागा सोडून जावें, आणि तेथें फौज वगैरे चांगली तयार करून सवड पाहून एकदम हल्ला करावा. आपल्या कामाकरितां स्थानत्यागही करावा लागतो. एडक्यांची टक्कर लागली म्हणजे जोरानें धडक बसावी म्हणून तो शत्रूपासून दूर जातो. हत्तीच्या गंडस्थळावर उडी मारण्याकरितां सिंह दबा धरून बसतो. शहाणे आहेत ते मान अपमान वगैरे कांहींएक मनांत न आणितां व मनांतलें कोणासही समजूं न देतां आपला मतलब साधितात. गर्वानें बळकट शत्रूच्या अंगावर गेलें तर आपला कुळक्षय होऊन त्याचें आयतेंच काम होतें. याकरितां सल्ला किंवा लढाई न करितां येथून दूर जावें.

याप्रमाणें अनुजीवीचा अभिप्राय ऐकून राजानें प्रजीवीचें काय म्हणणें आहे तें विचारलें.

**प्रजीवी**—मला वाटतें चांगला बंदोबस्त करून येथेंच रहावें हेंच चांगलें. सुसर पाण्यांत असला तर हत्तीला देखील ओढितो. पण तोच बाहेर आला म्हणजे कुत्र्याला देखील भितो. बलाढ्य शत्रूबरोबर गांठ पडली असतां किल्ल्याचा वगैरे चांगला बंदोबस्त करून आंत राहून त्याच्या पराजयाचा उपाय योजावा. शत्रूला भिऊन आपली जागा सोडून पळून गेलें असतां पुनरपि तेथें येणें कठीण. स्थानभ्रष्ट राजा हा विषरहित सापासारिखाच आहे. त्याला कोण भिणार आहे? स्वस्थानीं असला तर शंभरांना एक भारी आहे. याकरितां जागा न सोडितां बळकट किल्ला बांधून आंत राहून

शत्रूच्या पराजयाचा यत्न करावा. साधलें तर राज्य मिळेल नाहीं तर युद्धांत मरण येऊन स्वर्गप्राप्ति तरी होईल.

हें ऐकून त्यानें चिरंजीवीस अभिप्राय विचारिला.

**चिरंजीवी**—सर्व उपायांपेक्षां मला वाटतें कीं, अगोदर कोणाची तरी आपण मदत मिळवावी. पराक्रमी असून एकटा असला तर त्याच्यानें काय होणार आहे ? वारा नसला म्हणजे आपल्या आपण अग्नि विझून जातो. तर येथेंच राहून ज्याच्या मदतीनें शत्रूचा पराजय करितां येईल अशा कोणाचें तरी साहाय्य मिळवावें. तुम्ही आपली जागा सोडून गेलां तर तुम्हांस कोणी साहाय्य करणार नाहीं. ज्याच्या साहाय्यानें दावाग्नि अरण्यें जाळून टाकितो, तोच वारा दिव्यास मालवितो. दुर्बळाचा मान कोण ठेवितो ? मोठा पराक्रमी पाहून त्या एकट्याचेंच साहाय्य घ्यावें असें नाहीं. अशक्त असून पुष्कळ असले तर ते सुद्धां काम करितात. वारा मोठाले वृक्ष देखील उपटितो, परंतु वेळू लहान असून एकमेकांस लागून असल्यामुळें त्यांस वाऱ्याची पीडा होत नाहीं. मोठ्याचा आश्रय मिळाला तर फारच चांगलें. कमलपत्रावरील जलबिंदु मौक्तिकासारखा दिसतो, त्याप्रमाणें मोठ्यांच्या आश्रयानें लहानांससुद्धां मान मिळतो. याकरितां अगोदर कोणाचें तरी साहाय्य मिळवून मग लढाई करावी, असें माझें मत आहे,

याप्रमाणें चिरंजीवीचें भाषण ऐकून मेघवर्ण राजानें आपला पिढीजादा आणि राज्यनीतीमध्यें निपुण असा जो स्थिरजीवी नांवाचा वृद्ध प्रधान त्याचा मोठा सत्कार करून त्यास विचारिलें; काका, आपण सर्वांची परीक्षा करावी, म्हणून मी आपणासमक्ष यांस अभिप्राय विचारिले. आपण सर्वांचें बोलणें ऐकिलेंच आहे, आतां योग्य असेल तें करण्यास आम्हांस सांगावें.

**स्थिरजीवी**—राजा, या सर्वांनीं नीतिशास्त्राच्या आधारानें ज्या गोष्टी सांगितल्या, त्या सर्व खऱ्या आहेत. परंतु त्यांचा वेळ असेल तेव्हां त्या उपयोगीं पडतील. या वेळेस शत्रूकडे फितूर केल्याशिवाय आपलें काम व्हावयाचें नाहीं. शत्रूला कांहीं तरी लालूच दाखवून त्याकडे आपले विश्वासू लोक पाठवून त्याला फसवून त्याचा नाश केला पाहिजे. शहाण्यानें शत्रूचा नाश करण्याकरितां एकादे वेळेस त्यास मोठेपणाही द्यावा. फितूर केला असतां आपली

कार्यसिद्धि होईल. लोभामुळें शत्रूचा नाश करितां येईल. त्याचें छिद्र शोधून काढिलें पाहिजे, ह्मणजे त्या योगानें त्याचा नाश सहज करितां येईल.

**मेघवर्ण**—प्रधानजी, मीं त्याची जागा शोधून काढिली आहे. पण त्याच्या राज्यांत कोणतीं छिद्रें आहेत हें कसें कळेल?

**स्थिरजीवी**—हेर पाठवून त्यांचीं छिद्रें मी उमगून काढितों. गाईला वासानें समजतें. शहाण्याची दृष्टि शास्त्र होय. राजाचे डोळे हेर आहेत. आपलेकडील कामगार काम कसें करितात, शत्रूकडील कामगार कसे आहेत, हें पाहण्यास राजानें नेहमीं गुप्त हेर ठेविले पाहिजेत. जो राजा असें करील, त्याचा नाश होणार नाहीं.

**मेघवर्ण**—प्रधानजी, कोणते कामगार, ते कसे असावे, व हेर कसे असावे, हें सर्व मला सांगा.

**स्थिरजीवी**—प्रधान, धर्माध्यक्ष, सेनापती, न्यायाधीश, राजपुत्र, जामदार, किल्लेदार, चोपदार, वगैरे शत्रूच्या कामगारांतून कोणास तरी फितूर करून आपलें काम करून घ्यावें. आपणाकडील हलक्यासलक्या कामगारांकडे देखील लक्ष पुरवावें. कारण ते आंतल्याआंत भांडू लागले ह्मणजे शत्रूस फितुर होऊन राजाचा नाश करितात. वैद्य, जोशी, भिक्षुक, गारोडी, अशांचीं सोंगें घेऊन आपल्या हेरांस पाठवावें; ह्मणजे ते शत्रूकडील बातमी घेऊन येतात.

याप्रमाणें प्रधानाचें भाषण ऐकून मेघवर्ण राजा म्हणाला, प्रधानजी, कावळे आणि घुबड यांमध्यें असें हाडवैर पडण्याचें कारण तरी काय असावें?

**प्रधान**—एके समयीं हंस, राघु, बगळे, कोकिल, चातक, घुबड, मोर, पारवे, वगैरे सर्व पक्ष्यांची मोठी सभा भरली होती; तींत असा विषय निघाला कीं, गरुड आपला राजा असून तो आपणाकडे नुसतें पहात देखील नाहीं. नेहमीं श्रीकृष्णाजवळ रहातो. इकडे पारध्यानें आह्मांपैकीं, कोणास मारिलें तरी त्यास वाईट वाटत नाहीं. असें आहे तर असला राजा असून काय उपयोग? हाच आपला काळ समजावयाचा. नावाडी चांगला नसला तर नाव बुडून जाते, त्याप्रमाणें राजा चांगला नसला तर प्रजेचा नाश होईल. नाव फुटली ह्मणजे टाकून देतात, त्याप्रमाणें अविद्वान् गुरु, न पढ-

लेला उपाध्या, रक्षण न करणारा राजा, अप्रिय भाषण करणारी बायको, गांवांत रहाणारा गुराखी, आणि रानांत जाणारा न्हावी, या सहांस सोडून द्यावें. असें आहे तर गरुडास पदच्युत करून दुसऱ्या कोणास राज्यावर बसवावें. नंतर सर्वानुमतें असें ठरलें कीं, घुबडास राज्यावर बसवावें. तेव्हां राज्याभिषेकाचा टोलेजंग समारंभ करण्यास सर्व पक्षी तयारी करूं लागले. अनेक गवय्ये येऊन गाऊं लागले. नानाप्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं. मंडप वगैरे घालून जिकडे तिकडे लखलखाट झाला. स्तुतिपाठक स्तुति करूं लागले. राजाराणींकरितां मोठें सिंहासन तयार केलें. सर्व तयारी झाल्यावर उभयतां सिंहासनावर बसणार इतक्यांत तेथें एक कावळा आला. सर्व पक्षी जमलेले पाहून तो म्हणाला, आज सर्व मंडळी जमण्याचें कारण काय? आज कसला उत्साह आहे, हें समजत नाहीं.

कावळ्यास पाहून पक्षी परस्पर बोलूं लागले. पक्ष्यांमध्यें कावळा मोठा हुशार आहे. ह्मटलें आहे; मनुष्यांमध्यें न्हावी धूर्त, पक्ष्यांमध्यें कावळा धूर्त, पशूंमध्यें कोल्हा धूर्त, आणि तपस्व्यांमध्यें यति धूर्त. याकरितां याचेंही मत घ्यावें. इतक्यांत कावळ्यानें त्यांस विचारलें, आज कशाबद्दल इतकी गर्दी जमली आहे?

**पक्षी**—अरे, हल्लीं पक्ष्यांस कोणी चांगला राजा नाहीं, याकरितां आज सर्व पक्षी या घुबडास राज्याभिषेक करणार आहेत. तूंही आपलें मत दे.

**कावळा**—(हंसून) अहो मोर, हंस, कोकिल, चक्रवाक, शुक, सारस, इत्यादि मोठमोठे श्रेष्ठ पक्षी असतां, या दिवांध कुरूपास राज्यावर बसविणें योग्य नाहीं. या दिवांधाला राग आला नाहीं तरी याचें नाक वांकडें, डोळे फाटलेले, तोंड वाईट व भयंकर, मग राग आल्यावर कसा दिसेल? अशा दुष्ट कुरूप घुबडास राज्यावर बसवून काय उपयोग होणार आहे? शिवाय गरुड राजा असून आणखी हा राजा कशास पाहिजे? गरुडाच्या नुसत्या नांवानें देखील शत्रु पळून जातील. मूर्खास राज्यावर बसविलें ह्मणजे राजा आणि प्रजा एकदम नाश पावतात. याप्रमाणें तुमचाही या घुबडास राजा केल्यानें नाश होईल. मीं ह्मटलें याचा विचार करून काय करणें असेल तें करावें.

कावळ्याचें भाषण ऐकून याचें म्हणणें रास्त आहे असें सर्व पक्षी

म्हणूं लागले. पुनः सभा भरवून या गोष्टीचा विचार करूं, असें ह्मणून सर्व पक्षी आपापल्या ठिकाणीं चालते झाले. फक्त घुवड मात्र स्त्रीसहवर्तमान तेथें राहिला. कांहीं वेळानें तो स्त्रीस ह्मणाला, मंडळी कोठें गेली? अजून राज्याभिषेक कां करीत नाहींत? हें ऐकून ती ह्मणाली, कावळ्यानें आपणास राज्यावर बसविण्याविषयीं हरकत घेतली, सर्व पक्षी निघून गेले. तो मात्र एकटा कांहीं तरी वाईट उद्देश मनांत आणून बसला आहे; याकरितां चला लवकर आपण आपल्या घरट्यांत जाऊं. हें ऐकून, घुवडास फार वाईट वाटलें आणि तो कावळ्यास ह्मणाला, अरे दुष्टा, मला राज्यावर बसविण्यास त्वां विघ्न केलें, असें तुझें म्या काय वाईट केलें होतें? असो, आजपासून घुवडांचें आणि कावळ्यांचें हाडवैर झालें असें समजलें पाहिजे. शस्त्रानें झालेली जखम भरून येते, कुऱ्हाडीनें तोडलेलें झाड पुनः फुटतें, परंतु वाग्बाणाचें क्षत बरें होत नाहीं. असें ह्मणून तो स्त्रीसहवर्तमान निघून गेला.

त्याचें बोलणें ऐकून कावळाही मनांत भ्याला. त्याला वाटलें, आपण बोलून उगाच याशीं वैर पाडून घेतलें. देश, काल, न जाणून व पुढील परिणाम मनांत न आणून कारणाशिवाय कठोर भाषण केलें तर तें अप्रतिष्ठा करून विषाप्रमाणें बोलणाराचा नाश करितें.

आपणामध्यें शक्ति असली तरी शहाण्यानें वैर उत्पन्न करूं नये. आपणाजवळ चांगला वैद्य आहे असें समजून कोण शहाणा विष भक्षण करील? अशी काळजी करीत कावळाही आपल्या घरट्यांत गेला.

**मेघवर्ण**—प्रधानजी, असें आहे तर आतां आह्मीं काय करावें?

**स्थिरजीवी**—त्यास जिंकण्याच्या सहा उपायांमध्यें उत्तम उपाय आहे तो करण्याकरितां मी स्वतः जाऊन शत्रूस फसवून सर्वांस मारून टाकीन. आंगीं बुद्धि असली तर बलवानास देखील फसवितां येतें. धूर्ताकडून फसला जाणार नाहीं असा कोणी नाहीं. एक गोष्ट सांगतों ती लक्षांत ठेवून त्याप्रमाणें करा.

**मेघवर्ण**—सांगावी. तुह्मी म्हणाल तसें करूं.

**स्थिरजीवी**—असें आहे तर सल्ला करणें वगैरे सर्व टाकून मीं सांगितलेला पांचवा उपाय करा. मी शत्रूला फितुर झालों आहें, असें समजून माझी पुष्कळ निर्भर्त्सना करा. आणि कोठून तरी

रक्त आणून माझ्या आंगाला चोपडून मला अर्धमेल्याप्रमाणें करून वडाच्या झाडाखालीं टाकून द्या; म्हणजे तुम्ही मजवर रागावलां हें शत्रूंच्या हेरांस खरें वाटेल. तुम्ही येथून निघून ऋष्यमूक पर्वतावर जा आणि तेथें स्वस्थ रहा. मी विश्वासानें शत्रूस अनुकूल करून घेऊन त्याच्या किल्ल्याची सर्व माहिती करून घेईन. नंतर दिवसास त्यांस दिसेनासें झालें म्हणजे मी तुम्हांस तेथें नेऊन त्यांस मारवीन. असें केल्याशिवाय काम व्हावयाचें नाहीं, हें मला पक्कें माहित आहे. आतां येथें राहिलां तर पुष्कळ लोक उगाच मरतील.

शत्रूकडे मी एकटा गेलों तर माझें कसें होईल याबद्दल आपण काळजी करूं नका. पुष्पांचा हार मोठ्या आवडीनें लोक गळ्यांत घालितात, पण तोच कोमेजला ह्मणजे फेंकून देतात. त्याप्रमाणें सेवक कितीही आवडते असले तरी युद्धाच्या वेळेस त्यांस रणांत पाठविलेंच पाहिजे. सेवकांचें सर्वकाळ अशाकरितां रक्षण करावयाचें कीं, शत्रूंशीं गांठ पडेल तेव्हां एक दिवस त्यांचा उपयोग व्हावा. याकरितां असें न करण्याविषयीं मला तुह्मीं आग्रह करूं नये. असें ह्मणून तो कांहीं तरी कुरापत काढून मेघवर्णाशीं खोटेंच भांडण करूं लागला. स्थिरजीवी राजास पाहिजे तसें अपमानकारक बोलतो, असें पाहून जवळचे दुसरे सेवक त्यास ठार मारण्यास प्रवृत्त झाले, तेव्हां मेघवर्ण त्यांस ह्मणाला, अरे, दूर व्हा. हा लुचा दुष्ट शत्रूकडे मिलाफी झाला आहे. मींच याची खोड मोडतों. असें म्हणून उडून त्याच्या उरावर बसला; आणि त्यास चोंचीनें टोंचूं लागला. त्यास रक्तबंबाळ अर्धमेला करून आपले सर्व लोक घेऊन संकेताप्रमाणें दूर गेला. हें सर्व कृत्य एक घुबडीण गुप्तरूपानें हेर होऊन आली होती तिनें पाहिलें; आणि तें सर्व खरें आहे असें मानून आपल्या राजास इत्थंभूत सांगितलें. ती ह्मणाली, तुमचा शत्रु भिऊन पळून गेला. घुबडही हें ऐकून रात्रीस सर्व मंडळीस घेऊन कावळ्यांचा विध्वंस करण्यास निघाला. तो आपल्या लोकांस ह्मणाला, जलदी करा हो जलदी करा. शत्रु पळत असतां सांपडला तर बरें होईल. निदान तो कोठें जातो एवढें तरी कळेल.

कांहीं वेळानें सर्व घुबड स्थिरजीवी पडला होता त्या वडाच्या झा-

जवळ आले. एकही कावळा दृष्टीस पडत नाहीं असें पाहून त्यांचा राजा मोठ्या आनंदानें वृक्षाच्या शिखरावर बसून म्हणाला, अहो, कावळे कोणत्या वाटेनें पळाले तें शोधून काढा. दुसऱ्या किल्ल्यांत पोहोंचले नाहींत तोंच मारून टाकूं. कारण नुसत्या कुंपणाच्या आड शत्रु असला तरी त्यास मारण्याचें कठीण पडतें; मग किल्ल्यांत असल्यावर काय विचारावें?

इतक्यांत स्थिरजीवी हलके हलके कुंथूं लागला, तें ऐकतांच सर्व घुबड त्यास मारावयास गेले. तेव्हां तो ह्मणाला, अहो, मी स्थिरजीवी नांवाचा मेघवर्णाचा प्रधान आहें. त्यानेंच माझी अशी दशा केली. तुम्ही आपल्या राजास हें वर्तमान कळवा. मला त्याशीं पुष्कळ बोलावयाचें आहे. याप्रमाणें घुबडांनीं कळविल्यावर त्यांचा राजा आश्चर्ययुक्त होऊन त्याजवळ येऊन म्हणाला, अरे, तुझी अशी दशा कां झाली?

**स्थिरजीवी**—ऐका महाराज, काल तुम्हीं फार कावळे मारिले हें पाहून तो दुष्ट मेघवर्ण तुम्हांवर फारच रागावला, आणि युद्धास जाण्याची तयारी करूं लागला. तेव्हां मीं त्यास सांगितलें, राजा, लढाई करण्यास जाणें चांगलें नाहीं. ज्यास आपल्या कल्याची इच्छा आहे, अशा शहाण्यानें मोठ्यांशीं विरोध करणें मनांत देखील आणूं नये. वेताप्रमाणें लवून रहावें हेंच चांगलें. पतंग दिव्यावर एकदम जाऊन नाश पावतो, तसें करणें ठीक नाहीं. याकरितां खंडणी देऊन त्यांशीं तहच करणें ठीक आहे. बळकट शत्रूशीं गांठ पडली तर सर्वस्व देऊन प्राणांचें रक्षण करावें. प्राण वांचला तर धन पुनः मिळेल.

माझें हें भाषण ऐकून त्या दुर्जनास फारच राग आला. मी तुह्मांस मिलाफी झालों आहें असें मानून त्यानें माझी अशी अवस्था केली. आतां तुमच्या चरणांस शरण आलों आहें. फार बोलून काय उपयोग? मला थोडें सामर्थ्य आहे तोंच त्याच्या किल्ल्यांत नेऊन तुम्हांकडून सर्व कावळ्यांचा विध्वंस करून टाकवितों.

याप्रमाणें कावळ्याचें भाषण ऐकून घुबडांचा राजा अरिमर्दन आपल्या पिढीजाद्या वृद्ध मंत्र्यांस एके ठिकाणीं जमवून मसलत करूं लागला. रक्ताक्ष, क्रूराक्ष, दीप्ताक्ष, वक्रनास असे त्याचे चार प्रधान होते. त्यांपैकीं प्रथमतः रक्ताक्षास राजानें विचारिलें, प्रधानजी

हा शत्रूचा प्रधान माझ्या हातीं लागला आहे, तर याचें काय करावें ?

**रक्ताक्ष**—महाराज, हा शत्रूकडील मुख्य प्रधान आहे, प्रसंगवशात् दुष्टाची चाहाडी ऐकून त्यानें ह्याची अशी दशा केली, तरी त्याचें म्हणणें रास्त होतें. राजानें लढाईस सहसा प्रवृत्त होऊं नये हेंच चांगलें. लढाई करूं लागलें ह्मणजे झोंप नाहीं, सुख नाहीं, आणि जामदारखान्यांतील सर्व द्रव्यही नाहींसें होतें. याकरितां यास मध्यस्थ करून शत्रूंशीं तह करावा हेंच चांगलें. साम, दान, दंड, भेद या चोहोंमध्यें दंड फारच वाईट आहे. दुसरे उपाय नच चालतील तर तो करावा. सामानें जें काम होतें तें बिघडत नाहीं. सामानें कार्यसिद्धि होत असतां दंडाची योजना करणें हें साखरेनें पित्तशमन होण्यासारखें असतां कडू पडवळ घेण्यासारखेंच आहे. कोणी ह्मणतात शत्रूचा पाडाव करण्याकरितां दंडाचीच योजना केली पाहिजे, सामानें कांहीं व्हावयाचें नाहीं. परंतु हें बरोबर नाहीं. कारण पान वाजलें तरी हरिण पळून जातात, परंतु त्यांसच लालुच दाखवून पारधी धरितात. शत्रूचा नाश करण्यास सामासारखें दुसरें कांहीं नाहीं. हेमंतऋतूंत थंडीनेंच कमळें जळत नाहींत काय ? माझें म्हणणें ऐकणें असेल तर शत्रूंशीं सल्ला करावा.

याप्रमाणें रक्ताक्षाचें भाषण ऐकून अरिमर्दन क्रूराक्षास ह्मणाला, याविषयीं तुमचा अभिप्राय ऐकूं द्या.

**क्रूराक्ष**—महाराज, तो तर आपला हाडवैरी. त्याशीं सल्ला करणें ही गोष्ट मला कबूल नाहीं. शत्रु प्रबळ असला तरी तो फितुरानें पराभव पावतो. याकरितां राज्य मिळविण्याची इच्छा करणारा असा महत्त्वाकांक्षी शत्रूचा कोणी भाऊबंद वगैरे असेल, त्यास फितवून शत्रूचा नाश करावा. रामानें देखील बिभीषणास फितूर करून रावणाचा नाश केला. शत्रूकडच्या मनुष्यास पुष्कळ पैसा देऊन देखील फितूर करावा. लांकडास आंतून किडा लागला असला ह्मणजे तें मोडण्यास कठिण पडत नाहीं. त्याप्रमाणें आंतून फितूर केला असला ह्मणजे शत्रूचा पराभव करण्यास उशीर लागत नाहीं. माझी मसलत ऐकणें असेल तर आपणाकडे फितूर न होण्याविषयीं सावधगिरी ठेवून शत्रूकडे फितूर करावा; ह्मणजे आपली कार्यसिद्धि होईल.

याप्रमाणें त्याचें मत ऐकून राजानें दीप्ताक्षास अभिप्राय विचारिला, तेव्हां तो बोलला.

**दीप्ताक्ष**—साम आणि भेद हे दोन्ही उपाय मला कबूल नाहींत. यांच्या योगानें शत्रूचा उच्छेद सहज करितां येत नाहीं. दान म्हणजे खंडणी देणें हाच उपाय मला चांगला वाटतो. दानानें विश्वास उत्पन्न करून त्याचा नाश करावा. प्राणी लोभाविष्ट झाला म्हणजे त्यास विपत्ति दिसत नाहींशी होते. मांजराला दूध दिसतें पण जवळची काठी दिसत नाहींशी होते. शत्रु लोभांत गुंतला म्हणजे आपल्या बापास देखील मारील. शत्रूच्या स्वाधीन होऊन तो आपला नाश करून घेईल. शत्रु मोठ्या बंदोबस्ताच्या किल्ल्यांत असला तरी दानाच्या उपायानें त्यास मारितां येईल कोळी थोडेंच मांस गळाला लावून पाण्यांतील मासे मारितात !

याप्रमाणें दीप्ताक्षाचें भाषण ऐकून राजानें वक्रनासास अभिप्राय विचारल्यावरून तो म्हणाला.

**वक्रनास**—महाराज, या तिघांनीं आपापले अभिप्राय सांगितले; परंतु ते तिन्हीही नीतिशास्त्रास अनुसरून नाहींत. कारण; साम, दान, भेद, हे अशक्तांचे उपाय आहेत. जो समर्थ असेल त्यानें शत्रूला दंडच करणें योग्य आहे. दंडाशिवाय दुसरे उपाय योजूं लागलें म्हणजे शत्रूंस आपला अशक्तपणा वाटून ते अधिक वैर वाढवितात. दंडानें जशी राजलक्ष्मी स्थिर होते, तशी सामादि इतर उपायांनीं होत नाहीं. सर्वांस मनांतून लक्ष्मी हवीशी वाटते, परंतु ज्यांच्या आंगीं पराक्रम असतो, त्यांसच ती मिळते. वेश्या स्त्री धनाशिवाय नुसत्या प्रेमानें वश व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणेंच पराक्रमरूप धनाशिवाय राज्यलक्ष्मी प्राप्त व्हावयाची नाहीं. रत्नखचित मुकुटांनीं युक्त अशा शत्रूंच्या डोक्यांवर पाय दिल्याशिवाय शूरास राज्यप्राप्ति होत नाहीं. वीराच्या हातांत तलवार चमकल्याशिवाय संपत्ति मिळावयाची नाहीं. वेणी धरून ओढिल्याशिवाय दांडगी बायको बधावयाची नाहीं, त्याप्रमाणें सिंहासारखा पराक्रम केल्याशिवाय शत्रूची लक्ष्मी प्राप्त व्हावयाची नाहीं.

याप्रमाणें दंडाविषयीं वक्रनासानें आपला अभिप्राय दिला. त्या चार प्रधानांशिवाय पांचवा एक प्राकारकर्ण नांवाचा म्हातारा प्रधान तेथें होता, त्यास राजानें अभिप्राय विचारला तेव्हां त्यानें सांगितलें.

**प्राकारकर्ण**—महाराज, हा शरण आला आहे, याकरितां यास मारणें ठीक नाहीं. याचा सन्मान करून यास आपल्या किल्ल्यांत घेऊन जावें. यासच पुढें करून शत्रूंचा नाश करावा. रावणाचा नाश करण्याकरितां रामानें बिभीषणाचा सन्मान केला. शरणागतास मारणें हें मोठें पाप आहे. त्याचें रक्षण केल्यानें मोठें पुण्य लागतें.

याप्रमाणें प्राकारकर्णाचें भाषण ऐकून अरिमर्दन ह्मणाला, मलाही असेंच वाटतें. हा कपटी असेल असें मला वाटत नाहीं. आमच्या वतीनें बोलल्यामुळेंच याच्या धन्यानें याचा अपमान केला. याकरितां यास आपल्या घरीं नेणें योग्य आहे. याला टाकून दिलें किंवा मारिलें तर आपणाकडे कृतघ्नपणा येणार. कृतघ्नपणा हें मोठें पातक आहे. याकरितां मी यास घेऊन जातों.

हें राजाचें भाषण ऐकून वक्रनास म्हणाला, महाराज, शत्रूकडील मनुष्यास आपलें ठिकाण दाखविणें चांगलें नाहीं. अशा युक्तीनें परकी किल्ल्यांत शिरले म्हणजे शत्रूंनीं किल्ला घेतला म्हणून समजावें.

**अरिमर्दन**—तुमचें म्हणणें बरोबर नाहीं. किल्ला किल्ला ह्मणजे काय? भित्र्यांस किल्ल्याचें मोठें महत्त्व वाटतें. शूराला पराक्रम हाच बळकट किल्ला आहे. आंगीं बळ असल्यावर शत्रु काय करणार आहे? रत्नाच्या ज्योतीला वाऱ्यापासून काय पीडा होणार आहे? किल्ल्यांत असूनही नाश होतो. त्रिकूटपर्वताचा किल्ला, समुद्राचा खंदक, राक्षस योद्धे, कुबेर खजीनदार, शुक्राचार्याचें नीतिशास्त्र मुखोद्गत, असें असूनही रावणाचा नाश झाला.

असें ह्मणून कावळ्यास म्हणाला, अरे स्थिरजीवी, तुला जवळ बाळगणें ठीक नाहीं तरी तुझें रक्षण करितों. आमच्या किल्ल्यांत चल. तेथें तुझ्या कुलीनपणास योग्य वाटेल तें कर.

स्थिरजीवी मनांत हंसून ह्मणाला, उगाच बोलून काय उपयोग? माझा कुलीनपणा परिणामीं कळेल.

हें ऐकून वक्रनास ह्मणाला, आमचा निर्वंश झाला म्हणून समजावें. जसें होणार असेल तशीच बुद्धि होते, तसेच मित्र मिळतात. राजाच्याच दोषानें सर्व घुबडांचा संहार होण्याची वेळ आली. आतां कोणाला सांगावें? कोणीं पीडा केली तर राजाकडे फिर्याद करावयाची पण राजाच वाईट करूं लागला तर त्यास कोणीं मनाई करावी?

वक्रनासाचें भाषण न ऐकतां अरिमर्दन स्थिरजीवीस आपल्या किल्ल्यांत घेऊन गेला. किल्ल्यांत चोंहोंकडे फिरून स्थिरजीवी मनांत म्हणाला, हा किल्ला बिकट तर खरा, परंतु सर करण्यास विशेष कठिण आहे असें नाहीं. हे माझ्या तावडींत सांपडले. आतां यांचें आयुष्य संपलें. मला मारून टाकण्याविषयीं वक्रनासानें राजास सूचना केली; यांच्यांत तेवढाच राज्यनीति जाणणारा व खरा हित-कारक आहे. बाकीचे राजासारखेच मूर्ख आहेत. नंतर राजानें घुवडांस सांगितलें कीं, स्थिरजीवीला राहण्यास चांगली जागा द्या. हें ऐकून स्थिरजीवी मनांत ह्मणाला, आतां यांचा संहार करण्याची तजवीज योजिली पाहिजे. मी यांच्यामध्येंच राहिलों तर माझी मस-लत साधणार नाहीं. माझा संशय येऊन कदाचित् ते सावध होतील; याकरितां या किल्ल्याच्या दरवाज्याजवळ राहूनच आपला कावा साधावा. नंतर तो अरिमर्दनास ह्मणाला, आपण म्हणतां हें योग्यच आहे; परंतु मीही नीतिशास्त्रज्ञ आहें, याकरितां आपणास हितकारक असेल तेंच मला सांगितलें पाहिजे. मी मनापासून तुम्हांस अनुकूल झालों आहें तरी मला किल्ल्यांत ठेवणें योग्य नाहीं. मी किल्ल्याच्या दरवाज्याजवळच राहून भक्तीनें आपली सेवा करीन. नंतर वक्रनास आपल्या इष्टमित्रांस ह्मणाला, आजपर्यंत राजाचें आणि आपलें या किल्ल्यांत रक्षण झालें. आतां आपण दुसऱ्या एखाद्या डोंगरावर राहण्यास जाऊं. विघ्न येण्यापूर्वींच उपाय करावा, म्हणजे पश्चात्ता-प करण्याची वेळ येत नाहीं. याकरितां मजबरोबर चला. असें ह्मणून तो त्यांसहवर्तमान परदेशीं गेला.

वक्रनास गेल्यावर स्थिरजीवी आनंदित होऊन मनांत म्हणाला, हें एक चांगलेंच झालें. एक शहाणा होता तोही गेला आतां या मूर्खांस तेव्हांच मारितां येईल. ज्या राजाजवळ दूरदर्शी प्रधान नाहींत, त्याचा तेव्हांच नाश करितां येईल. नंतर किल्ल्यास आग लावण्याकरितां तो रोज एकेक काटूक आणून ठेवूं लागला. आम-च्या किल्ल्यास आग लावण्याकरितां हा काटकें जमवितो हें त्या घुवडांस कळलें नाहीं. मृत्यु जवळ आला म्हणजे बुद्धिभ्रंश होतो. याप्रमाणें घरट्याच्या निमित्तानें त्यानें काटकांचा बराच मोठा ढीग केला. नंतर एके दिवशीं सूर्योदय होऊन घुवड आंधळे झाल्यावर स्थिरजीवी ऋष्यमूकपर्वताजवळ जाऊन मेघवर्णास ह्मणाला, महाराज,

शत्रूच्या किल्ल्यास आग लावण्याची तयारी करून आलों आहें. याकरितां सर्व कावळ्यांनीं रानांतून एकेक जळकें काठुक चोंचींत धरून यावें आणि माझ्या घरट्यास आग लावावी म्हणजे ते सर्व भाजून पटापट मरतील.

**मेघवर्ण**—आपण तेथें काय केलें? तुम्हांस जाऊन पुष्कळ दिवस झाले, आपलें सर्व वर्तमान सांगा.

**स्थिरजीवी**—राजा, सांगत बसण्याची ही वेळ नव्हे, त्यांचा कोणी हेर हेरून त्यांस हें वर्तमान कळवील, त्यामुळें ते दुसरीकडे निघून जातील, याकरितां जलदी करा. लवकर करावयाच्या कामास उशीर लाविला ह्मणजे कार्यनाश होतो. काम करून परत आल्यावर स्वस्थपणें हकीकत सांगेन. नंतर सर्व कावळे रानांत जाऊन जवळ असलेल्या शेतांतून एकेक जळकें काठुक घेऊन किल्ल्याच्या दाराजवळ गेले. त्यांनीं स्थिरजीवीच्या घरट्यास आग लाविली, त्यामुळें सर्व किल्ला पेटला. किल्ल्याचें दार लाविलेलें असल्यामुळें त्यांस बाहेर पडतां येईना. तेव्हां त्यांस वक्रनासाच्या बोलण्याचें स्मरण झालें. किल्ल्यास चोंहोंकडून आग लागल्यावर सर्व घुबड भाजून मेले.

## तात्पर्य.

राज्यनीति मोठी कठिण आहे. तिजविषयीं शास्त्रावलोकन करावें तितकें थोडेंच. सामान्य नीतीहून राजनीति वेगळी असावी हा मोठा चमत्कार आहे! राजनीति म्हणजे ठकविद्या, अशीच पुष्कळ लोकांची समजूत झाली आहे. नीतिशास्त्रांत शत्रूशीं वागण्याचे अनेक उपाय सांगितले आहेत; तथापि कोणत्या वेळेस कोणता योजावा, हें कळण्यास राजाच्या आंगीं शहाणपण पाहिजे. पुस्तकी विद्येनें या गोष्टी कळावयाच्या नाहींत. अमुक प्रसंगीं अमुक उपाय योजावा, असें नीतिशास्त्रांत सांगितलेलें असतें, तथापि हा प्रसंग तसा आहे किंवा नाहीं हें ठरविणें बुद्धीचें काम आहे. शत्रूंशीं वागण्याचे साम, दान, दंड, भेद, असे चार उपाय नीतिशास्त्रांत सांगितले आहेत. त्यांपैकीं पहिले तीन हे व्यक्तिसंबंधानेंही वाईट दिसत नाहींत. परंतु भेद म्हणजे फितूर किंवा विश्वासघात याची योजन व्यक्तिसंबंधाच्या कलहांत केली तर लोक निंदा करतील. पण राष्ट्रसंबंधाच्या कलहांत ही गोष्ट नीतीमध्यें कशी शिरली, हें मोठें आश्चर्य आहे. मोठा

नाश टाळण्याकरितां थोडा नाश सोसणें हें योग्य आहे. याकरितांच दुष्ट शत्रु देश जिंकून हजारों लोकांच्या जीवांचा नाश करतील, तो टाळण्याकरितां आपणाकडील सैन्यांतील लोक मरतील असें ठाऊक असतांही शत्रूशीं लढाई करून त्याचा पराभव करणें ही नीतिच आहे असें समजतात. त्याप्रमाणेंच एकादा दुष्ट राजा विनाकारण त्रास देत असेल तर विश्वासघातानें त्याचा नाश करून प्रजेची पीडा दूर करणें योग्य आहे. यामुळेंच हा नीतीचा उपाय मानिला आहे असें वाटतें. विश्वासघातानें दुष्टांचा नाश केल्यास अनीति होणार नाहीं. तथापि फितूर हा राजनीतीचाच प्रकार समजला गेल्यामुळें अनेक दुष्ट राजांनीं याच्या योगानें चांगल्या राजांचीं राज्यें रसातळास नेलीं. याच्या योगानें घाला एकाएकीं पडतो, त्यामुळें संकट टाळण्यास मार्ग रहात नाहीं. यासाठीं राज्यांत फितूर न होण्याविषयीं जो राजा जपेल, त्याच राजाचें राज्य चिरस्थायी होईल.

---

## गोष्ट ५८.

## सिंह आणि बैल.

दक्षिणदेशीं महिलारोप्य नांवाचें नगर होतें. तेथें वर्धमानक नांवाचा श्रीमान् वाणी रहात असे. जवळ पुष्कळ द्रव्य असतांही त्याला वाटलें कीं, आणखी व्यापार करून आपली संपत्ति वाढवावी. असें मनांत आणून तो व्यापाराचा माल घेऊन मथुरेकडे जाण्यास निघाला. त्याच्या घरच्याच गाईचे गोऱ्हे संजीवक व नंदक नांवाचे बैल होते, तेच त्यानें आपल्या गाडीला लाविले होते. यमुना नदीजवळ गाडी गेली तेव्हां संजीवकाचा पाय गाळांत रुतल्यामुळें तो खालीं बसला, त्यामुळें गाडीचें जूंही मोडून गेलें. तेव्हां वर्धमानकास फार वाईट वाटलें. बैलाचा दुखावलेला पाय बरा होण्याच्या आशेनें त्यानें तीन दिवस तेथें मुक्काम केला, परंतु कांहीं होईना. तेव्हां बरोबरचे दुसरे व्यापारी ह्मणाले, शेटजी, बैलाकरितां या भयंकर जागीं राहून उपयोग नाहीं. हें ऐकून संजीवकाजवळ कांहीं मनुष्यें ठेवून तो पुढें चालता झाला. कांहीं पुढें गेल्यावर ते मनुष्य अरण्यांत रहाण्यास कंटाळून चालते झाले. वर्धमानकाची गांठ पडल्यावर त्यांनीं त्यास सांगितलें कीं, शेटजी, तो बैल मेला. हें ऐकून त्यास फार वाईट वाटलें.

आयुष्य संपलें नसल्यामुळें संजीवकही हळूहळू लंगडत इकडे तिकडे जाऊं लागला. पाय बरा होऊन चारा चांगला मिळाल्यामुळें तो पहिल्यापेक्षांही अधिक पुष्ट झाला. तेव्हां शिंगांनीं माती उकरून डुरकूं लागला. एके दिवशीं पशूंचा राजा पिंगलक नांवाचा सिंह पाणी पिण्याकरितां यमुनेवर गेला असतां दुरून संजीवकाचें डुरकणें ऐकतांच मनांत भिऊन पाणी न पितां दूर जाऊन वडाच्या झाडाखालीं तो उभा राहिला.

त्या सिंहाचे करटक व दमनक नांवाचे दोन कोल्हे प्रधानाचे पुत्र होते. पाणी न पितां राजा परत आला हें पाहून ते परस्पर बोलूं लागले.

**दमनक**—करटका, आज राजा पाणी पिण्यास गेला असून तसाच परत येऊन व लोक जमवून काळजी करीत येथें कां उभा राहिला ?

**करटक**—आम्हाला या गोष्टीची चौकशी करून काय करावयाचें ? सध्या आपणाजवळ खावयास आहे, मग उगीच उलाढाल हवी कशाला ?

**दमनक**—केवळ पोटाकरितांच सर्व गोष्टी करावयाच्या काय ? कावळादेखील पोट भरितो. कांहीं तरी पराक्रम करून कीर्तिसंपादन करण्याकरितां राजाश्रय करावयाचा.

**करटक**—अरे खरें, पण आपण कांहीं मुख्य कारभारी नाहीं; अरे आपलें चालेल तेथें बोलावें. उगाच फाजीलपणा करून फजिती करून घेण्यांत काय हांशील?

**दमनक**—हुशारी दाखविली तर आपण मुख्य कारभारी होऊं.

**करटक**—बरें, मग तुझ्या मनांत काय करावयाचें आहे?

**दमनक**—आज राजा भ्याल्यासारखा दिसत आहे, तर त्याकडे जाऊन भयाचें कारण विचारून भय दूर करीन म्हणावें म्हणजे आपणावर त्याची मेहरबानी होईल.

**करटक**—राजास भयच वाटलें आहे असें तुला कशावरून समजलें ?

**दमनक**—चेहरा पालटण्याच्या योगानें दुसऱ्याच्या मनांत काय आहे याचा तर्क करितां येतो. त्याकडे जाऊन आपल्या बुद्धिबलानें

त्याचें भय नाहींसें करून मुख्य प्रधानाची जागा मिळवितों.

**करटक**—अरे, दुसऱ्याची चाकरी कशी करावी, हें तुला माहीत नाहीं. तू त्याची मर्जी कशी संभाळशील?

**दमनक**—राजाची मर्जी कशी संभाळावी, हें मला माहीत आहे. राजाच्या मर्जीतले लोक असतील त्यांशीं आर्जवानें वागावें. राजाची मर्जी आपणावर असली तरी पाहिजे तसें वागूं नये. राजाचा द्वेषी तो आपला द्वेषी. राजाचा मित्र तो आपला मित्र. राजाबरोबर बोलण्याची वगैरे सलगी करूं नये. याप्रमाणें सावधपणें वागल्यावर राजाची कृपा संपादण्याचें काय कठिण आहे?

**करटक**—तू तेथें जाऊन काय करशील?

**दमनक**—मी अप्रासंगिक भाषण करणार नाहीं. अप्रासंगिक भाषणानें शहाण्याची सुद्धां अप्रतिष्ठा होते. राजास आवडेल असेंच बोलेन.

**करटक**—सर्व खरें, पण राजांपाशीं दुष्ट लोक असतात, त्यामुळें त्यांशीं वागण्याचें कठिण आहे.

**दमनक**—कसेंही असलें तरी युक्तीनें मी आपलें काम करीन.

**करटक**—असें असेल तर तुला योग्य दिसेल तें कर.

नंतर दमनक करटकाचा निरोप घेऊन पिंगलकाजवळ गेला. दमनकास दुरून पाहतांच पिंगलक द्वारपालास ह्मणाला, अरे याला लवकर येऊंद्या. हा आमच्या पिढीजाद्या प्रधानाचा मुलगा आहे. दमनक पिंगलकाजवळ गेल्यावर मुजरा करून नम्रतेनें बसला. तेव्हां पिंगलक त्याशीं प्रेमानें बोलूं लागला.

**पिंगलक**—कसें काय, बरें आहेना? फार दिवसांनीं दृष्टीस पडलास.

**दमनक**—महाराजांच्या पायांस आमचें कांहीं कारण पडलें नाहीं ह्मणून आलों नाहीं. महाराज, लहान मोठा कसाही सेवक असला तरी त्यानें योग्य दिसेल तें राजास कळविलें पाहिजे. मोठ्या सेवकाचाच नेहमीं उपयोग होतो असें नाहीं कित्येक वेळा हलका देखील उपयोगीं पडतो. राजाला देखील दांत कोरण्यास गवताची काडी लागते. आम्ही आपले पिढीजादे सेवक. आम्ही सर्वकाळ आपल्या आज्ञेंत राहतों, तथापि आम्हांस मोठा अधिकार मिळत नाहीं, ही गोष्ट आपणासही चांगली नाहीं. कारण येणेंकरून

राजास गुणांची परीक्षा नाहीं असें लोकांस वाटतें. राजानें ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें अधिकार दिले पाहिजेत. एकादा हलकट लाडका असला म्हणून त्यास डोकीवर घेऊन उपयोग नाहीं. असें केल्यानें चांगले सेवक उदासीन होऊन राजाचें नुकसान होतें. खरा शहाणा असतो त्याची अप्रतिष्ठा होते असें नाहीं. आपण मला म्हणता कीं, फार दिवसांनीं आलास. परंतु याचें कारण आपणाकडेच आहे. कांच व हिरा एकाच मोलानें विकूं लागले म्हणजे तेथून दूर रहावें हें चांगलें.

उद्योग करणारा व न करणारा असे दोन्ही राजास सारखे वाटूं लागले म्हणजे उद्योगी असतो त्यास उत्साह राहत नाहीं. सेवकांशिवाय राजास शोभा नाहीं, व राजाशिवाय सेवकांस शोभा नाहीं. राजा संतुष्ट झाला तर नुसतें बक्षीस देईल, परंतु सेवक स्वामिभक्त असला म्हणजे तो राजाकरितां आपला जीवदेखील देईल. याकरितां राजानें शहाणे, शूर, विश्वासू, पिढीजादे, असे सेवक ठेवावे. चाकर असे असावे कीं, त्यांवर काम सोंपवून राजानें स्वस्थ रहावें. नम्र, मितभाषी, उद्योगी, सत्यवक्ता व न सांगतांही राजाचे कामांस जपणारा असा सेवक असावा. हा यःकश्चित् कोल्हा असें समजून आपण माझा अपमान केला, परंतु हें चांगलें नाहीं. कारण एरंडाचीं लांकडें पुष्कळ असलीं तरी सर्पण होत नाहीं, त्याप्रमाणें मूर्ख सेवक पुष्कळ असले तरी त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. तसेंच सेवक स्वामिभक्त असून दुर्बल असला किंवा बलिष्ठ असून स्वामिभक्त नसला तर काय उपयोग? मी बुद्धिमान् असून स्वामिभक्त आहें, याकरितां माझा अपमान करूं नका.

**पिंगलक**—असो, पुरे आतां तू शहाणा असलास किंवा नसलास तरी आमच्या पिढीजाद्या प्रधानाचा मुलगा आहेस. तुला काय बोलावयाचें असेल तें निर्भयपणें बोल.

**दमनक**—महाराज, कांहीं बोलावयाचें आहे. आज्ञा असावी.

**पिंगलक**—बोल काय तें?

**दमनक**—राजाचें लहान मोठें कसेंही काम असलें तरी चौघांत सांगूं नये याकरितां एकांतीं सांगेन. मसलत षट्कर्णी झाली म्हणजे फुटते. नंतर राजाचा अभिप्राय जाणून सर्व पशु दूर निघून गेले. तेव्हां दमनक बोलूं लागला.—

**दमनक**—महाराज, आज पाणी पिण्यास जाऊन तसेच परत येऊन येथें कां उभे राहिलां?

**पिंगलक**—कांहीं नाहीं, उगाच.

**दमनक**—असें असलें म्हणजे ठीक आहे. किंवा सांगण्यासारखें नसेल तर सांगू नये. कित्येक गोष्टी सेवकाजवळ सांगण्यासारख्या नसतात.

हें ऐकून पिंगलक मनांत म्हणाला, हा शहाणा दिसतो. आपल्या मनांतील गुप्त गोष्ट यास सांगावी. विश्वासू चाकरास मनांतील दुःख सांगितलें तर तो त्याचा उपशम करील.

**पिंगलक**—आज त्वां एकादा मोठा शब्द ऐकिला काय?

**दमनक**—होय महाराज, ऐकिला.

**पिंगलक**—आज हा कोणी तरी विलक्षण पशु या आमच्या वनांत आला आहे, त्याचा शब्द असावा. शब्दाप्रमाणेंच तो मोठा पराक्रमी असेल.

**दमनक**—नुसत्या शब्दावरूनच भिणें चांगलें नाहीं. हें भित्र्याचें काम आहे. नुसत्या शब्दाला भिऊन आपलें राज्य सोडून या वनांतून जाणेंही ठीक नाहीं. भय वाटलें तरी अवसान धरून पराक्रम केला पाहिजे.

**पिंगलक**—पहा, सर्व पशु भिऊन पळूं लागले आहेत. मग मला तरी धैर्य कसें येईल?

**दमनक**—हा त्यांचा दोष नाहीं. जसा राजा तशी प्रजा. आपण धैर्य धरून येथेंच उभे रहा. मी कोणाचा शब्द झाला तें पाहून येतों. नंतर योग्य दिसेल तें करावें.

**पिंगलक**—तू तिकडे कसा जाशील?

**दमनक**—राजाचें काम असलें म्हणजे तें कसें करूं, हें मनांत आणावयाचें नाहीं. भय टाकून सापाच्या तोंडांत हात घालावा लागतो, किंवा समुद्रांत उडी टाकावी लागते. राजाची एकवेळ आज्ञा झाल्यावर मागें पाऊल काढील असा चाकर राजानें बाळगूंच नये.

**पिंगलक**—बरें आहे, जा.

नंतर दमनक राजास मुजरा करून चालता झाला. तो गेल्यावर पिंगलक भिऊन मनांत म्हणाला, मीं त्यास आपल्या मनांतील गोष्ट सांगितली हें चांगलें केलें नाहीं. मीं याला कामावरून काढिल्या-

मुळें याच्या मनांत मजविषयीं वांकडें असेल, हा दोहींकडून लांच खाऊन माझा नाश करणार नाहीं कशावरून? याकरितां हा काय करतो तें कळेपर्यंत दुसऱ्या जागीं जाऊन उभें रहावें. ज्यानें शब्द केला त्यास आणून मला मारण्याचें याच्या मनांत नसेल कशावरून? असें मनांत आणून दूर जाऊन एकटा उभा राहिला. इकडे दमनकही संजीवकाजवळ गेला तेव्हां हा बैल आहे असें त्यास कळलें. तेव्हां तो आपणाशीं म्हणाला, चांगलें झालें. याशीं सख्य किंवा लढाई कांहीं तरी करवून पिंगलकास मी म्हणेन तसें करावयास लावीन. संकट आल्याशिवाय राजा प्रधानाचें ऐकत नाहीं. प्रकृति बरी झाल्यावर रोग्यास वैद्याची गरज रहात नाहीं; त्याप्रमाणें संकट नसलें म्हणजे राजाही प्रधानाची गरज बाळगीत नाहीं. असा विचार करून पिंगलकाकडे गेला आणि त्यास नमस्कार करून उभा राहिला.

**पिंगलक**—कां त्वां तो प्राणी पाहिला काय?

**दमनक**—महाराजांच्या कृपेनें पाहिला.

**पिंगलक**—खरेंच काय?

**दमनक**—महाराजांचे पायांपाशीं खोटें बोलून काय करावयाचें?

**पिंगलक**—खरोखर, त्याला पाहून तू सुटून आलास हें मोठें आश्चर्य आहे. किंवा मोठे असतात ते हलक्यावर रागावत नाहींत, म्हणून तुला त्यानें मारिलें नाहीं असें वाटतें. गवत लवतें म्हणून वारा त्याला उपटित नाहीं, परंतु मोठे वृक्ष ताठ रहातात ह्मणून त्यांस तो उपटितो, त्याप्रमाणें शूर असतात ते आपल्यासारखा वीर भेटला तरच पराक्रम करतात.

**दमनक**—खरी गोष्ट. तो फारच मोठा आहे. आह्मी यःकश्चित्, त्यापुढें आमची कथा काय? पण महाराजांचा हुकूम होईल तर त्यास मी आपला चाकर करून टाकितों.

**पिंगलक**—तुला असें कसें करितां येईल?

**दमनक**—बुद्धिमानाला काय अशक्य आहे?

**पिंगलक**—असें आहे तर मीं तुला मुख्य प्रधान नेमलें. आजपासून सर्व कारभार तूच पहात जा.

नंतर दमनक त्या बैलाकडे जाऊन त्यास ह्मणाला, अरे दुष्टा बैला, राजाधिराज महाराज पिंगलक यांनीं तुला विचारलें आहे कीं, असा वारंवार उगाच कशाकरितां डुरकतोस?

**संजीवक**—पिंगलक कोण?

**दमनक**—अरे, राजा पिंगलक देखील तुला ठाऊक नाहीं काय? बरें आहे, क्षणभर दम खा. आतां तुला कळेल कोण आहे तो. राजा पिंगलक सिंह सर्व पशूंसहवर्तमान वडाच्या झाडाखालीं उभाच आहे.

हें ऐकून आपण आतां मेलों यांत संशय नाहीं, असें वाटून संजीवक भयानें अगदीं व्याकुळ झाला. तो दमनकास म्हणाला, मित्रा, तू मोठा चांगला चतुर दिसतोस. मला तिकडे नेऊन अभय देववून राजा मजवर कृपा करील असें कर.

**दमनक**—असें करावें खरें, पण राजांच्या बोलण्यांत भरंवसा नसतो. त्यांचा नेम नाहीं याकरितां तू येथेंच उभा रहा. मी त्यापाशीं जाऊन योग्य वेळ आली ह्मणजे तुला घेऊन जाईन.

असें बोलून तो पिंगलकाकडे गेला आणि त्यास म्हणाला, तो मोठा प्राणी आहे; मीं विचारलें तेव्हां तो म्हणाला, मी शिवाचा नंदी आहें. शिवानें प्रसन्न होऊन मला यमुनातीरीं चरावयास पाठविलें आहे. त्यानें क्रीडा करण्याकरितां मला हें सर्व अरण्य बक्षीस दिलें आहे.

**पिंगलक**—( भिऊन ) खरें आहे. आतां मला समजलें. देवाची कृपा असल्याशिवाय या भयंकर अरण्यांत गवत खाणारे पशु निःशंक चरून ओरडावयाचे नाहींत. बरें, मग त्वां त्याला काय सांगितलें?

**दमनक**—महाराज, म्यां असें सांगितलें कीं. चंडिकादेवीचें वाहन जो सिंह त्याचें हें वन आहे. याकरितां त्याच्या घरीं तुम्ही पाहुणेच आलां आहां. याकरितां त्यापाशीं येऊन यथेच्छ खाऊन पिऊन बोलत चालत स्वस्थपणें मित्रत्वानें रहावें. हें ऐकून तो आनंदानें म्हणाला, मला राजाकडून अभयवचन मिळावें. याप्रमाणें हकीकत आहे. आतां महाराजांची आज्ञा होईल तसें करतों.

**पिंगलक**—शाबास शाबास! तू बुद्धिमान् खरा. तूच सर्व प्रधानांमध्यें श्रेष्ठ होण्यास योग्य आहेस. माझ्या मनांत होतें तसेंच त्वां केलें. मी त्यास अभयवचन देतों. त्याजवळही आम्हांस अभयवचनें मागून त्यास लवकर घेऊन यावें. असे प्रधान असले म्हणजे सुरळीतपणें राज्य चालतें. संकटसमयींच प्रधानाची बुद्धिमत्ता कळते.

स्वस्थपणा असला म्हणजे शहाणा कोण नाहीं?

नंतर दमनक राजास मुजरा करून निघाला आणि मनांत म्हणा-

ला, राजाची मर्जी संपादून आपल्या म्हणण्याप्रमाणें त्यास करावयास लाविलें. आज मी धन्य आहें. राजानें एवढा सन्मान केला यापेक्षां कोणता मोठा लाभ आहे? नंतर संजीवकाजवळ जाऊन नम्रतेनें म्हणाला, अहो, तुम्हांस अभयवचन देण्याविषयीं राजाची प्रार्थना केली, आतां निःशंकपणें चलावें. परंतु तुमच्यावर राजाची कृपा झाली तर मी सांगेन त्याप्रमाणें मजशीं वागलें पाहिजे. गर्वानें फुगून पाहिजे तसें करूं नये. तुझ्या योगानें मीही प्रधानकीचीं सर्व कामें करीन. मग आपली दोघांची चैन होईल.

**संजीवक**—ठीक आहे, तू म्हणतोस तें मला कबूल आहे. तू सांगशील तसें करीन.

असें म्हटल्यावर दमनक संजीवकास घेऊन पिंगलकाजवळ गेला आणि म्हणाला, महाराज, संजीवकास घेऊन आलों, आतां योग्य वाटेल तें करावें. संजीवकही नमस्कार करून पुढें उभा राहिला. पिंगलकही त्याचा आदरसत्कार करून म्हणाला, कसें काय, बरें आहे ना? या ओसाड रानांत कोणीकडून आलां? नंतर संजीवकानें सर्व हकीकत सांगितल्यावर पिंगलक पुनः म्हणाला, मित्रा, आतां भिऊं नको. स्वस्थपणें माझ्याजवळ रहा. येथें मोठमोठ्या पशूंस देखील भय वाटतें मग तुम्हा तृणभक्षकांस तर फारच भय आहे. याकरितां नेहमीं मजबरोबर असावें. असें म्हणून पिंगलक सर्व पशूंबरोबर यमुनेवर जाऊन पाणी पिऊन वनांत गेला. नंतर करटक आणि दमनक यांस सर्व राज्यकारभार सांगून आपण संजीवकाबरोबर स्वस्थपणें गोष्टी सांगत बसे. संजीवकानेंही शहाणपणाच्या नानाप्रकारच्या गोष्टी सांगून पिंगलकाला इतका शहाणा केला कीं, तेणेंकरून तो हिंसा सोडून गांवठी पशूंप्रमाणें वागूं लागला. इतर पशूंस तो जवळ देखील येऊं देईनासा झाला. करकट व दमनक यांची आणि त्याची भेट होईनाशी झाली. पराक्रम करून सिंह शिकार करीनासा झाल्यामुळें सर्व पशु पाहिजे तिकडे गेले. तेव्हां क्षुधेनें व्याकुळ झालेले करकट आणि दमनक एकमेकांशीं मसलत करूं लागले.

**दमनक**—पिंगलक आपणास पुनः विचारीनासा झाला. दिवसभर संजीवकाबरोबर फिरून आपलें काम मुळींच पहात नाहीं. सर्व सेवक चाकरी सोडून गेले.

**करकट**—आपलें ऐकत नाहीं तरी आपल्यावरचा दोष उडवि-

ण्याकरितां राजास खरें असेल तें कळविलें पाहिजे. त्यांच या तृण-भक्षकास येथें आणून आपल्या घरास आग लावून घेतली.

**दमनक**—खरें आहे, ही माझीच चूक आहे, राजाकडे कांहीं नाहीं.

**करटक**—असें तर झालें, आतां आपण काय करावें ?

**दमनक**—मला एक युक्ति सुचली आहे, तिच्या योगानें राजाचा आणि संजीवकाचा वियोग करितों.

**करटक**—तू शहाणा असलास तरी तुझ्यानें ही गोष्ट होणें नाहीं.

**दमनक**—दादा. पहा तर खरें होईल किंवा नाहीं तें ? बुद्धीच्या योगानें पाहिजें तें करितां येईल. तू सांगशील तर आतांच जाऊन काम करतों.

**करटक**—असं असेल तर जा, तुला वाटेल तसें कर.

नंतर एके वेळीं संजीवक जवळ नाहीं असें पाहून दमनक पिंगलकाजवळ गेला आणि मुजरा करून उभा राहिला. तेव्हां पिंगलक म्हणाला, दमनका, फार दिवसांनीं दृष्टीस पडलास ?

**दमनक**—महाराजांच्या चरणांला गरज नाहीं, म्हणून आलों नाहीं. पण महाराजांस एक मोठें विघ्न आलें आहे, तें ऐकून चैन पडेनासें झालें म्हणून आलों आहें. ज्यांत धन्याचा नफा अथवा नुकसान आहे, तें विचारल्याशिवायही सेवकानें सांगितलें पाहिजे.

त्याचें भाषण ऐकून पिंगलक म्हणाला, काय बोलावयाचें असेल तें बोल.

**दमनक**—महाराज, आतांशीं संजीवक मनांतून आपला फार द्वेष करितो. माझा त्याचा स्नेह आहे, म्हणून मला त्यानें एकांतीं असें सांगितलें कीं, या पिंगलकाला कांहींच शहाणपण नाहीं. याला मारून मीच राजा होतों. मी तुला आपला प्रधान करीन.

हें कठोर भाषण पिंगलकाच्या हृदयास बाणासारखें लागून तो स्तब्ध झाला. कांहीं वेळानें दमनकास म्हणाला, दमनका, संजीवक माझा जीवकाप्राण इतका आवडता आहे, तो माझा द्वेष कसा करील ?

**दमनक**—लाडका किंवा कसा असला तरी राज्य कोणाला नकोसें आहे काय ?

अनेक रोग झाले तरी शरीर कोणाला नकोसें नाहीं. तसें जो आवडता असतो त्यानें कांहीं केलें तरी तो नकोसा होत नाहीं,

हेंच वाईट. राजा ज्याचे फार लाड करितो, तोच राज्याची इच्छा करूं लागतो. संजीवकावर आपली एवढी प्रीति आहे असा त्यामध्यें गुण तरी कोणता आहे? लठ्ठ आहे म्हणून युद्धाच्या वेळेस उपयोगीं पडेल असें आपणास वाटत असेल, पण याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. आपले शत्रु मांसभक्षक. या तृणभक्षकाचें त्यांपुढें कांहीं चालणार नाहीं. याकरितां याला मारून टाकावें हें चांगलें.

**पिंगलक**—अरे, ज्यास आपण चारचौघांत शहाणा असें ह्मटलें, त्यास वाईट म्हणणें यांत आपलाच मूर्खपणा दिसतो. दुसरें असें आहे कीं, मी याला अभयवचन दिलें आहे, तर याला कसें मारावें? तो आमचा इष्ट आहे, मी त्याचें वाईट करणार नाहीं. अरे, आपण विषवृक्ष लावला असला तर तो सुद्धां तोडूं नये असें म्हणतात. आधीं कोणाला चढवूं नये, चढविल्यावर उतरूं नये. चांगल्याचें चागलें केलें यांत काय चांगुलपणा? वाईटाचें जो चांगलें करील तोच चांगला. त्यानें माझा द्वेष केला तरी त्याचें मी वाईट करणार नाहीं.

**दमनक**—महाराज, शत्रूची क्षमा करावी, असें नीतिशास्त्र सांगत नाहीं. आपला व याचा स्नेह झाल्यापासून आपण सर्व राज्यकारभार सोडून दिला. त्यामुळें सर्व सेवक त्रासून गेले. संजीवक तृणभक्षक, आपण व आपले सेवक मांसभक्षक. तुम्हीं शिकारीचा उद्योग केल्याशिवाय मांस कोठून मिळणार? मांस खावयास मिळालें नाहीं तर सर्वजण तुह्मांस सोडून जातील. मग एकटे राहिल्यामुळें तुमचाही नाश होईल. याच्या संगतीमुळें तुम्हांस शिकार करावी असें वाटत नाहीं. जशी संगत धरावी तसा गुण लागतो. तापलेल्या लोखंडावर पाणी पडलें ह्मणजे त्याचा मागमूस देखील रहात नाहीं. तेंच पाणी कमलपत्रावर पडलें तर मोत्यासारखें दिसतें. तेंच स्वातीनक्षत्रांत समुद्रांतील शिंपल्यांत पडलें तर स्वतःच मोतीं होतें. चांगला, वाईट, मध्यम गुण आंगीं असणें हें सर्व सहवासाचें फळ आहे. जर या दुष्टाचा तुम्हीं नाश न केला तर हा तुम्हांस मारील.

**पिंगलक**—तू म्हणतोस, परंतु तो आमचा द्वेष करतो, याला प्रमाण काय?

**दमनक**—उद्यां सकाळीं पिंगलकाला मारतों, असा त्यानें मजजवळ निश्चय केला हेंच प्रमाण. उद्यां सकाळीं डोळे वटारून रागानें

तुम्हांकडे पहात येईल, तेव्हां तुम्हांस समजेल. मग आपणास योग्य वाटेल तसें करावें.

असें म्हणून तो संजीवकाकडे गेला आणि त्याला नमस्कार करून खालीं बसला. तो काळजींत पडला आहे असें पाहून संजीवक मोठ्या प्रीतीनें म्हणाला, मित्रा, बरें आहेना? फार दिवसांनीं दृष्टीस पडलास. काय पाहिजे आहे तें सांग. देण्यासारखें नसलें तरी तें देईन.

**दमनक**—सेवकाचें कसलें बरें? पगार मिळाला तरच खावयास मिळणार. नेहमीं काळजी. एखादे वेळेस जिवावर देखील बाणीं यावयाची. सेवकाचें शरीर देखील त्याच्या स्वाधीन नाहीं, यापेक्षां वाईट तें काय?

**संजीवक**—काय बोलावयाचें असेल तें स्पष्ट बोल.

**दमनक**—राजा आणि प्रधान यांची मसलत फोडणें चांगलें नाहीं; पण माझ्या सांगण्यावरून तू तेथें आला आहेस याकरितां तुझ्या स्नेहामुळें तुला कळविणें मला प्राप्त आहे. मजवर विश्वास ठेविल्यामुळें तुझा नाश झाला तर मला हत्या घडेल, याकरितां तुला सांगतों कीं, पिंगलकाच्या मनांत तुजविषयीं वाईट आलें आहे. जवळ कोणीच नाहीं अशी वेळ पाहून त्यानें मला सांगितलें कीं, उद्यां संजीवकास मारून सर्व पशूंस त्याचें मांस खावयास देतों. त्यावर मीं त्यास सांगितलें, महाराज, मित्रद्रोह करणें चांगलें नव्हे. हें ऐकून तो ह्मणाला, अरे, संजीवक तृणभक्षक, आपण मांसभक्षक, आमचें व त्याचें स्वभावतःच वैर; शत्रूची उपेक्षा कशी करावी? त्याला मारलेंच पाहिजे. त्यांत कांहीं दोष नाहीं. हा त्याचा निश्चय पाहून मी तुजकडे आलों. आतां मला विश्वासघाताचें पातक नाहीं. आतां तुला वाटेल तसें कर.

हें भयंकर भाषण ऐकून संजीवकास मूर्च्छा आली. कांहीं वेळानें सावध होऊन ह्मणाला, राजाचें खरें प्रेम कोणावर आहे? मजवर राजाची मर्जी आहे, असें समजतो तो मूर्ख होय. भिक्षा मागून किंवा ओझीं वाहून पोट भरावें, किंवा उपाशीं मरावें, पण राजाची चाकरी करूं नये. मी त्याशीं स्नेह केला, हाच माझा मूर्खपणा झाला. ज्यांचें धन सारखें, शक्ति सारखी, त्यांनींच एकमेकांशीं स्नेह करावा. अशक्त आणि सशक्त यांचा स्नेह उपयोगी नाहीं. आतां जाऊन त्याच्या पायां पडलों तरी तो कृपा करणार नाहीं. जो कांहीं तरी

कारणानें रागावतो, तो तें कारण नाहींसें झालें म्हणजे शांत होतो. परंतु विनाकारण द्वेष करणाऱ्यांस संतुष्ट कसें ठेवावें ? राजाची चाकरी करणें मोठें कठिण. शाबासकी मिळेल किंवा नाहीं याचा संशयच; पण चूक झाली असतां जीव जाईल यांत मात्र संशय नाहीं. मला वाटतें कीं, मजवर असलेली पिंगलकाची मेहरबानी सहन न होऊन जवळच्या मंडळीपैकीं कोणी तरी याच्या मनांत वांकडें आणून दिलें आहे. नवऱ्याची कमजास्त प्रीति झाली म्हणजे जशा सवती एकमेकींचा द्वेष करितात, त्याप्रमाणेंच राजाच्या पदरचे लोक एकमेकांस पाण्यांत पहातात. राजाजवळ शहाणा असला म्हणजे तो त्यास आवडतो, त्यामुळें इतरांकडे त्याचें दुर्लक्ष होतें, हें स्वाभाविकच आहे. सूर्य मावळल्यावर दिव्याचा उजेड पडतो, त्याप्रमाणें राजाजवळ शहाणा असला म्हणजे दुसऱ्याचें तेज पडत नाहीं.

**दमनक**—अरे, असें आहे तर मग तुला मुळींच भय नाहीं. दुष्टांच्या सांगण्यावरून रागावला असला तर तुझ्या सांगण्यावरून संतुष्टही होईल.

**संजीवक**—छेः, तुला समजत नाहीं. दुर्जन यःकश्चित् असले तरी त्यांच्यांत रहाणें ठीक नाहीं. कांहीं तरी युक्ति करून ते नाश करितात. या राजाजवळ पुष्कळ दुष्ट लोक आहेत. यांतून कोणी तरी एकानें चहाडी सांगून त्याच्या मनांत मजविषयीं वांकडें आणून दिलें आहे. कान फुंकल्यावर काय काय होणार नाहीं ? दुर्जन सापापेक्षां देखील वाईट आहे. साप चावला तर ठार मारतो, पण हा नुसता कानाशीं लागून देखील दुसऱ्याचा नाश करील. आतां अशी गोष्ट झाली तर खरी, पुढें काय करावें तें तुला मी स्नेहाच्या नात्यानें विचारतों.

**दमनक**—देशत्याग करवा हें चांगलें. अशा दुष्ट राजाची चाकरी करणें योग्य नाहीं. तो मोठा असला तरी त्याजवळ राहूं नये.

**संजीवक**—हें खरें, पण राजा रागावला असतां दुसरीकडे जाऊन उपयोग नाहीं. दुसरीकडे गेलें असतां तो सूड उगविणार नाहीं असें नाहीं. मोठ्यांशीं द्वेष पडला म्हणजे दूर गेलें तरी स्वस्थपणा होत नाहीं. याकरितां मला आतां युद्धाशिवाय दुसरा कोणताही मार्ग बरा दिसत नाहीं. मेलों तर स्वर्गप्राप्ति, जय झाला तर राज्यप्राप्ति. दोन्ही गोष्टी चांगल्याच आहेत.

हें ऐकून दमनक मनांत ह्मणाला, या दुष्टाच्या मनांत युद्ध करावयाचें आहे. जर यानें आपल्या तीक्ष्ण शिंगांनीं राजास जखमा केल्या तर मोठा अनर्थ होईल. याकरितां याला आणखीं कांहीं तरी सांगून देशत्याग करावयास लावतों. असा विचार करून त्यास ह्मणाला, अरे, धन्याचें आणि चाकराचें युद्ध कोठें बोललें आहे काय? बलवानाशीं गांठ पडली ह्मणजे पळून जाऊन आपला जीव वांचवावा हें चांगलें. हें ऐकून संजीवक पुनः त्यास विचारूं लागला, मित्रा, पण पिंगलक मजवर रागावला आहे हें कशावरून कळलें? आजपर्यंत तर दिवसेंदिवस त्याचा व माझा स्नेह वाढत आहे. त्यांत कधीं देखील विपर्यास दृष्टीस पडला नाहीं. असें आहे तर आपलें रक्षण करून त्याचा नाश करण्याविषयीं कांहीं तरी युक्ति सांग.

**दमनक**—अरे, तुजविषयीं त्याचे मनांत वांकडें आहे किंवा नाहीं, हें समजण्यास फार कठिण नाहीं; तुला लागलींच अनुभव येईल. रागानें डोळे लाल करून भिंवया चढवून ओंठ चावून तुजकडे पाहूं लागला ह्मणजे तुला कळेल. आतां मी तुझा निरोप घेऊन घरीं जातों. तूं ही गोष्ट कोणास कळूं देऊं नको. रात्र झाली ह्मणजे हळूच दूर देशीं पळून जा. सर्व गोष्टी पुनः मिळतील, पण शरीर पुनः मिळावयाचें नाहीं. बळवानाशीं गांठ पडली तर पळून जाऊन किंवा त्याशीं सल्ला करून आपलें रक्षण करावें. असें ह्मणून दमनक करटकाजवळ गेला.

दमनकास पाहून करटक म्हणाला, काय झालें?

**दमनक**—उद्योग केला आहे, फलप्राप्ति होणें दैवाधीन आहे.

**करटक**—उद्योग तरी काय केला आहे? तो ऐकूं दे.

**दमनक**—एकमेकांच्या खोड्या चहाड्या सांगून फुटाफुट केली. आतां ते एके ठिकाणीं जमून बोलत बसणार नाहींत.

**करटक**—अरे, हें चांगलें केलें नाहीं. ते परस्पर स्नेहानें वागून सुखांत काळ घालवीत होते. आतां तूं त्यांच्या मनांत असा द्वेष उत्पन्न केला. अरे तुला असें केल्यानें बरें वाटतें, पण हें फार वाईट आहे. सर्वांला वाईट करतां येतें, पण चांगलें करणें फार कठिण आहे.

**दमनक**—तुला नीतिशास्त्र माहीत नाहीं, ह्मणून असें बोलतोस. शत्रु उत्पन्न झाल्याबरोबर त्याचा नाश केला पाहिजे. आमचें प्रधा-

नकीचें काम करूं लागल्यापासून हा आमचा शत्रु झाला आहे. आपला अधिकार घेण्यास जो इच्छितो, तो स्नेही असला तरी त्याचा नाश केला पाहिजे. यानें उदासीन रहावें ह्मणून याला घेऊन आलों, असें असून यानें आम्हांसच कामावरून दूर करविलें. दुर्जनाचा एकदा शिरकाव झाला कीं तो अधिकाधिक आपला पगडा बसवूं लागतो, ह्मणून त्याच्या नाशाचा हा उपाय केला. देशत्याग करून गेला तरी बरेंच आहे. तुझ्याशिवाय ही गोष्ट कोणास ठाऊक होऊं नये. स्वहिताकरितां मीं असें केलें. मन सुरीसारखें असलें तरी साखरेप्रमाणें गोड बोलून कार्य करून घेतलें पाहिजे. मेला तर खावयास मिळून पुनः आपला अधिकार आपणास प्राप्त होईल. इतक्या गोष्टी साधत असून मला वाईट ह्मणतोस हा तुझा वेडेपणा आहे.

दमनक गेल्यावर संजीवक आपणाशीं म्हणाला, म्यां तृणभक्षकानें मांसभक्षकाशीं स्नेह केला, हें वाईट केलें. आतां कोठें जावें आणि काय करावें ? आतां त्यालाच शरण जावें ह्मणजे तोच माझें रक्षण करील. काय व्हावयाचें असेल तें होईल. दुसरीकडे गेलों तरी तेथें असाच कोणी तरी दुष्ट भेटून तो जीव घेणार नाहीं कशावरून ? याकरितां सिंहापासूनच मृत्यु आलेला बरा. असें ह्मणून सिंहाच्या जागेजवळ गेला; आणि ह्मणाला, घरांत साप असला किंवा तळ्यांत सुसर असला ह्मणजे आंत जाण्याचें कठिण, त्याप्रमाणें राजाजवळ अनेक दुष्ट असतात, त्यामुळें त्यापाशीं जाणें मोठें भयंकर होय. असें ह्मणून जवळ गेला तेव्हां दमनकानें सांगितल्याप्रमाणें त्याचा आकार पाहून त्यास मुजरा न करितां दूर उभा राहिला. तेव्हां दमनकानें सांगितलें तें खरें वाटून पिंगलक धांवून त्याच्या आंगावर गेला, आणि पंजांनीं त्यास फाडूं लागला. तेव्हां संजीवक त्याच्या पोटांत शिंगें खुपसूं लागला.

याप्रमाणें झुंज चाललें असतां दोघेही रक्तबंबाळ झाले. तेव्हां करटक दमनकास ह्मणाला, त्वां या दोघांचें युद्ध उत्पन्न केलें हें चांगलें केलें नाहीं. तुला राजनीति मुळींच कळत नाहीं. अरे होईल तितका यत्न करून शत्रूशीं सल्ला करावा. आतां जर राजाचें कांहीं बरें वाईट झालें तर तुझ्या मसलतीचें काय करावयाचें ? संजीवक मेला नाहीं तर आपलें बरें होणार नाहीं. असें असून तूं प्रधान होण्यास इच्छितोस, तुला समेट करणें मुळींच ठाऊक नाहीं. तुला कधींही

प्रधानगिरी मिळावयाची नाहीं. अरे, गोडीनें काम होत नसेल तर भांडण करावयाचें. तुला मंत्र म्हणजे काय हें कळत नाहीं. काम आरंभणें, तें तडीस नेतील असे लोक व साधनें योजणें, तें करण्यास योग्य जागा व काळ शोधून काढणें, मध्यें संकट आलें असतां तें निवारण्याचा यत्न करणें, आणि तें शेवटास नेणें, हे मंत्राचे पांच प्रकार होत. तू तर मसलत करून राजा किंवा प्रधान यांतून एकाचा किंवा दोघांचाही नाश करण्याचा प्रसंग आणिला. तुला कांहीं समजत नाहीं. असो, तुला तरी काय ह्मणावें? राजानें तुझ्यासारख्याच्या बोलण्यावर भरंवसा ठेवावा हा त्याचा मूर्खपणा होय. शहाण्याचा उपदेश सोडून हलकटाच्या सांगण्याप्रमाणें राजा वागूं लागला ह्मणजे त्यास अनर्थ यावयाचेच. तू याचा प्रधान झालास ह्मणजे दुसरा कोणी चांगला याजवळ येणारदेखील नाहीं. राजा चांगला असून प्रधान वाईट असला तर त्याजवळ जाणें कठिण. यामुळें सज्जन जवळचा नाहींसा होऊन राजाचाही नाश होतो. असो, मूर्खाला उपदेश करून काय उपयोग? मूर्खा, संजीवकावर झालेली राजाची कृपा सहन न होऊन त्वां असें केलें. ठीकच आहे, नीच कुलीनाची निंदा करितो, दरिद्री धनवानाची निंदा करितो, मूर्ख पंडिताची निंदा करितो, आणि शिनळ पतिव्रतेची निंदा करिते, ही जगाची रीतच आहे. त्वां आपल्या मतें हित केलें परंतु त्यापासून अनर्थ उत्पन्न झाला. याप्रमाणें ते बोलत होते. कांहीं वेळ युद्ध केल्यावर पिंगलकाच्या तीक्ष्ण पंजांच्या जखमांनीं संजीवक घायाळ होऊन रणांगणीं पडला आणि मरण पावला. त्यास मेलेला पाहून त्याचे मागील गुण आठवून पिंगलकास फार वाईट वाटलें. तो म्हणाला, मीं याचा जीव घेतला, ही फार वाईट गोष्ट केली. आजपर्यंत त्याची लोकांजवळ मीच स्तुति करीत होतों. त्यांस आतां काय सांगावें? आतां आपणाकडेच मूर्खपणा येणार. याप्रमाणें शोक करूं लागला असतां दमनक जवळ येऊन हंसून त्यास म्हणाला, महाराज, हा काय वेडेपणा? या तृणभक्षक दुष्ट शत्रूस मारून असा शोक कां करावा? राजास हें योग्य नाहीं. दुष्टास मारण्यांत पातक नाहीं. राजास अत्यंत दयालुत्वही उपयोगीं नाहीं. याप्रमाणें सांत्वन केल्यावर पिंगलक स्वस्थ होऊन दमनकास प्रधान नेमून राज्य करूं लागला.

## तात्पर्य.

राज्यांत अनेक प्रकारचे दुष्ट, स्वार्थसाधु, विश्वासघातकी असे लोक असावयाचेच. आपणास मोठा अधिकार मिळावा असें पुष्कळांस वाटतें. परंतु मिळाल्यावर कितीही भेलेपणानें वागलें तरी वर सांगितलेल्या लोकांच्या तडाक्यांतून सुरक्षितपणें निघून जाण्याचें फार कठिण आहे. आपण निष्पाप आहों, आपलें काम चोख असल्यामुळें कोणाचें भय नाहीं, राजाची आपणावर मर्जी आहे, असें मानून कारभाऱ्यानें स्वस्थ राहूं नये. दरबारांत कोण कसा आहे, काय करितो, याकडे प्रधानाचें नेहमीं लक्ष असलें पाहिजे. राजाच्या मनांत कोण केव्हां खोटेंच कांहीं भरवून देईल याचा नेम नाहीं. तसेंच राजानेंही, कोणीं चहाडी सांगितली असतां सांगणारा मनुष्य कसा आहे, सांगण्यांत त्याचा कांहीं मतलब आहे किंवा नाहीं, ज्याच्याविषयीं चुगली केली तो तसें करण्यासारखा आहे किंवा नाहीं, या गोष्टींचा नेहमीं विचार केला पाहिजे. नाहीं तर तो केव्हां फसेल याचा नेम नाहीं.

---

# गोष्ट ५२.

## कावळा, उंदीर कांसव, आणि हरिण.

दक्षिण देशीं महिलारोप्य नांवाच्या नगराजवळ मोठा विस्तीर्ण एक वटवृक्ष होता. त्यावर अनेक पक्षी व इतर जीवजंतु रहात असत. त्याची सावली मोठी असल्यामुळें पुष्कळ वाटसरूही तेथें उतरत. त्या वृक्षावर लघुपतनक नांवाचा एक कावळा रहात होता. एके दिवशीं सकाळींच भक्ष्य मिळविण्याकरितां तो बाहेर चालला असतां, हातांत जाळें घेतलेला, काळा कुट्ट, साक्षात् यमकिंकरच काय, असा एक पारधी त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां लघुपतनक मनांत म्हणाला, हा दुष्ट आमच्या रहाण्याच्या वडाकडेच येत आहे, न जाणो कदाचित् त्यावरच्या पक्ष्यांवरच धाड येईल. असें मनांत आणून त्या वटवृक्षाकडे परत जाऊन तो सर्व पक्ष्यांस म्हणाला, हा दुष्ट पारधी हातांत जाळें व तांदूळ घेऊन येत आहे; याच्या फांसांत सांपडूं नका. आतां हा जाळें पसरून तांदूळ फेंकील, ते तुम्ही विषासारखे माना.

इतकें तो बोलत आहे तोंच तेथें पारधी आला. तो जाळें पसरून आंत पांढरेशुभ्र तांदूळ फेंकून दूर जाऊन गुपचुप बसला. लघुपतनकाच्या सांगण्याप्रमाणें त्या तांदुळांस केवळ विष समजून पक्षी तिकडे पाहीनातसे झाले. इतक्यांत तेथें चित्रग्रीव नांवाचा पारव्यांचा राजा पुष्कळ पारवे बरोबर घेऊन भक्ष्य शोधण्यास फिरत होता तो आला. लघुपतनकानें त्यास सांगितलें, तरी तें न ऐकतां तो तांदूळ खाण्यास गेला आणि पारव्यांसहवर्तमान जाळ्यांत सांपडला. पारधी आनंदित होऊन त्यांस मारण्यास निघाला, तेव्हां चित्रग्रीव पारव्यांस म्हणाला, भिऊं नका, बुद्धिमानास संकट प्राप्त झालें तरी तो त्यांतून पार पडतो. सर्वजण मिळून हें जाळें घेऊन या पारध्यापासून उडून लांब जाऊं. मग यांतून कसे तरी सुटूं. तुम्ही भिऊन असें करणार नाहीं तर मराल. जुटानें अशक्तांसुद्धां मोठालीं कामें करितां येतात. नंतर ते सर्व पक्षी जाळें घेऊन एकदम उडाले तेव्हां पारधी त्यांच्या मागें धांवला, परंतु ते दिसत नाहींतसे झाले तेव्हां म्हणाला, दैव प्रतिकूळ झालें म्हणजे मिळविलेलें जें कांहीं घरांत असेल त्यासही घेऊन जातें. पक्षी गेले आणि जाळेंही नाहींसें झालें.

पारधी गेला असें पाहून चित्रग्रीव पारव्यांस ह्मणाला, त्या दुष्टाच्या हातांतून तर सुटलों. आतां महिलारोप्य नांवाच्या नगराच्या ईशान्य दिशेस हिरण्यक नांवाचा उंदीर माझा मित्र रहात आहे; त्याकडे जाऊं, ह्मणजे तो जाळें तोडून आपणा सर्वांस मुक्त करील. संकटकालीं मित्राशिवाय दुसरा कोण उपयोगीं पडणार? असा विचार करून ते हिरण्यकाकडे गेले. बिळास हजारों द्वारें करून त्यांत हिरण्यक स्वस्थ रहात होता. चित्रग्रीव बिळाजवळ जाऊन मोठ्यानें म्हणाला, अरे मित्रा हिरण्यका, लवकर बाहेर ये. मी मोठ्या संकटांत पडलों आहें. हें ऐकून हिरण्यक बिळांतूनच म्हणाला, कोणरे तू? येथें कशाकरितां आलास? तुला कोणतें संकट प्राप्त झालें आहे?

**चित्रग्रीव**—अरे, मी चित्रग्रीव, पारव्यांचा राजा. तुझा मित्र आहें, लवकर बाहेर ये, मोठें काम आहे.

हें ऐकून हिरण्यक आनंदित होऊन बाहेर आला, आणि चित्रग्रीवाची तशी दशा पाहून दुःखित होऊन म्हणाला, मित्रा, हें काय?

**चित्रग्रीव**—हें खाण्याच्या लोभाचें फळ. असो, नशिबीं असेल तें चुकत नाहीं. आतां तू जाळें तोडून आम्हांस लवकर मुक्त कर.

**हिरण्यक**—दैवीं असेल तें चुकत नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. नाहीं तर पक्षी आकाशांत रहातात, मासे पाण्यांत रहातात, असें असून त्यांस बंधन कां प्राप्त व्हावें?

असें ह्मणून तो चित्रग्रीवाचें बंधन तोडूं लागला. तेव्हां चित्रग्रीव ह्मणाला, असें करूं नको. आधीं इतरांचे पाश तोड, मग माझे तोड. हें ऐकून हिरण्यक रागानें ह्मणाला, अहो, तुमचें ह्मणणें बरोबर नाहीं; आधीं धनी मग चाकर.

**चित्रग्रीव**—मित्रा, असें ह्मणूं नको. हे बिचारे आपलीं बायकापोरें एकीकडे ठेवून मजबरोबर हिंडतात. मला यांचें रक्षण अवश्य केलें पाहिजे.

**हिरण्यक**—तुझें मन पाहण्याकरितां मी असें बोललों. आतां तुझें दयालुत्व पाहून मला मोठा आनंद झाला. आतां जाळें तोडून सर्वांस मोकळे करितों, ह्मणजे तुलाही पुष्कळ परिवार होईल. असें बोलून सर्वांस मुक्त करून त्यास म्हणाला, मित्रा, आतां आपल्या घरीं जा. पुनः संकट प्राप्त झालें तर असाच ये. याप्रमाणें चित्रग्रीवास निरोप देऊन हिरण्यक बिळांत शिरला. चित्रग्रीवही पारव्यांसहवर्तमान घरीं गेला.

लघुपतनक कावळा पारवे उडाल्यापासून पुढें काय होतें तें पाहण्याकरितां लांबून त्यांच्यामागें फिरत होता. हिरण्यकानें पारव्यांस मुक्त केलें हें पाहून त्यास आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, हा हिरण्यक मोठा बुद्धिमान् असून पक्ष्यांस बंधनांतून मुक्त करण्यास समर्थ आहे. मी कोणावरही विश्वास ठेवीत नाहीं त्यामुळें फसत नाहीं, तरी याचा स्नेह करून ठेवावा हें चांगलें. मोठ्यांस देखील मित्राची गरज लागते. असा विचार करून झाडावरून उतरून हिरण्यकाच्या बिळाजवळ गेला; आणि त्यास ह्मणाला, हिरण्यका मित्रा, बाहेर ये. हें ऐकून हिरण्यक मनांत म्हणाला, हा दुसरा कोणी पारवा जाळ्यांत सांपडून आला आहे कीं काय कोण जाणे. तो आंतूनच त्यास ह्मणाला, कोण रे तू?

**लघुपतनक**—मी लघुपतनक नांवाचा कावळा आहें.

हें ऐकतांच हिरण्यक अगदीं आंत जाऊन ह्मणाला, येथून लवकर निघून जा.

**लघुपतनक**—अरे, तुझ्याजवळ माझें मोठें काम आहे, असें असून तू मला कां भेटत नाहींस ?

**हिरण्यक**—मला तुझ्या भेटीची गरज नाहीं.

**लघुपतनक**—चित्रग्रीवास त्वां बंधमुक्त केलें, हें पाहून मला मोठा आनंद झाला, आपणासही बंधन प्राप्त झालें असतां तू सोडविशील असें मनांत येऊन तुझ्याशीं स्नेह करण्यास आलों आहें.

**हिरण्यक**—अरे तू मला खाणारा, तुझ्याबरोबर स्नेह कसा करावा ? ही गोष्ट घडणार नाहीं. निघून जा. असल्या प्रकारचा स्नेह चांगला नाहीं.

**लघुपतनक**—हा मी तुझ्या दाराजवळ बसलों आहें. जर तुझें मित्रत्व होणार नाहीं तर जीव देईन.

**हिरण्यक**—अरे तू तर आमचा वैरी, तुझें दर्शन देखील नको, मग स्नेहाची गोष्ट तर लांबच आहे.

**लघुपतनक**—अरे, आपण एकमेकांला पाहिलें देखील नाहीं, मग वैर कोठलें ?

**हिरण्यक**—अरे, वैर दोन प्रकारचें. एक हाडवैर व दुसरें कारणवैर. कारणवैर नाहींसें होतें, पण हाडवैर नाहींसें व्हावयाचें नाहीं. साप व मुंगुस, तृणभक्षक व मांसभक्षक, पाणी व विस्तव, कुत्रें व मांजर, श्रीमंत व दरिद्री, सवत व सवत, सिंह व हत्ती, हरिण व पारधी, धार्मिक व धर्मभ्रष्ट, मूर्ख व पंडित, पतिव्रता व शिनळ, सज्जन व दुर्जन, यांचें हाडवैर आहे.

**लघुपतनक**—यांमध्यें हाडवैर असतें खरें, पण विनाकारण वैर असणें चांगलें नाहीं. आपणांमध्यें वैर असण्यास कांहीं कारण नाहीं. याकरितां मजशीं मित्रत्व कर. मी शपथ वाहून सांगतों कीं, मजपासून तुला कांहीं भय नाहीं.

**हिरण्यक**—मला वैऱ्याच्या शपथेनें भरंवसा यावयाचा नाहीं.

हें ऐकून लघुपतनक निरुत्तर होऊन आपणाशींच ह्मणाला, हा नीतिशास्त्रांत निपुण आहे. याकरितांच याच्याशीं स्नेह करावा असें वाटतें. असें मनांत आणून हिरण्यकास म्हणाला, जर तुला माझा भरंवसा येत नाहीं, तर तू बिळांतूनच मजशीं गोष्टी सांगत जा.

हें ऐकून हिरण्यक मनांत म्हणाला, हा मोठा हुशार दिसतो,

याशीं स्नेह करावा. नंतर त्यास म्हणाला, ठीक आहे; पण त्वां माझ्या बिळांत कधींही पाऊल घालूं नये.

**लघुपतनक**—ठीक आहे, तसें करीन.

याप्रमाणें ते उभयतां मित्र होऊन सुखानें राहूं लागले. लघुपतनक अनेक प्रकारच्या मांसांचे व पक्वान्नांचे तुकडे गांवांतून आणून हिरण्यकास देई. हिरण्यकही रात्रीस शेतांतून साळी, ओंब्या वगैरे धान्यें आणून लघुपतनकास देई. याप्रमाणें करितां करितां दोघांचा एकमेकांवर इतका विश्वास बसला कीं, ते एकमेकांच्या गळ्यांत मिठ्या मारूं लागले!

नंतर एके दिवशीं लघुपतनक हिरण्यकास ह्मणाला, मित्रा हिरण्यका, आतां मला या जागेचा कंटाळा आला, याकरितां दुसरीकडे जातों.

**हिरण्यक**—कंटाळा कां आला?

**लघुपतनक**—मित्रा, येथें पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ पडला आहे. त्यामुळें कोणी काकबळी देखील टाकीत नाहींत. कित्येक लोक तर पाखरें मारून पोट भरूं लागले आहेत. मी देखील फांसांत सांपडलों असतों, पण नशीबानें सुटलों. ह्मणून मी देशांतरीं जाणार.

**हिरण्यक**—जाणार तरी कोठें?

**लघुपतनक**—दक्षिण देशीं एका अरण्यांत मोठें सरोवर आहे, तेथें माझा जिवलग मित्र मन्थरक नांवाचा कांसव रहात आहे. तो मला मासे खावयास देतो, ते खाऊन त्याजबरोबर बोलत चालत मी सुखानें राहीन. येथें राहून पक्ष्यांचे हाल माझ्यानें पहावत नाहींत.

**हिरण्यक**—असें असेल तर मीही तुजबरोबर येतों.

**लघुपतनक**—तू तर जमिनीवरून चालणारा, मजबरोबर कसा येशील?

**हिरण्यक**—मला पाठीवर घेऊन चालशील तर माझें रक्षण होईल.

**लघुपतनक**—बरें आहे, तुझाही समागम मला तेथें प्राप्त होईल.

असें म्हणून हिरण्यकास पाठीवर घेऊन लघुपतनक उडाला, तो हळुहळू त्या सरोवराजवळ येऊन पोहोंचला. उंदरास पाठुंगळीस घेतलेला कावळा येत आहे, असें पाहून मंथरक भिऊन पाण्यांत

गेला. तेव्हां झाडाच्या खांदीवर उंदरास उतरून आपण एका खांदीवर बसून मोठ्यानें ह्मणाला, मन्थरका, ये लवकर ये. तुझा मित्र लघुपतनक नांवाचा कावळा मी आहें. फार दीवस झाल्यामुळें मोठ्या उत्कंठेनें तुला भेटण्यास आलों आहें. हें ऐकून मन्थरक आनंदानें बाहेर येऊन ह्मणाला, मित्रा, लवकर ये आणि मला भेट दे. पुष्कळ दिवस झाल्यामुळें मीं तुला ओळखिलें नाहीं, ह्मणून पाण्यांत गेलों. नंतर उभयतां भेटून पुष्कळ दिवसांच्या राहिलेल्या गोष्टी बोलूं लागले. हिरण्यकही मन्थरकाला नमस्कार करून कावळ्याजवळ बसला. त्यास पाहून मंथरक ह्मणाला, मित्रा, हा उंदीर कोण? हा भक्ष्य असून त्वां यास आपल्या पाठीवर कसें घेतलें? हें ऐकून लघुपतनक म्हणाला, मित्रा, हा हिरण्यक नांवाचा उंदीर माझा जिवलग मित्र आहे. हा मोठा दयाळु, गुणवान्, नीतिमान्, शहाणा असा आहे, ह्मणून मीं याबरोबर स्नेह केला आहे. नंतर त्यानें मंथरकास चित्रग्रीवाचा आरंभापासून सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून मंथरकास मोठा आनंद होऊन तो ह्मणाला, मित्रा, स्वस्थपणें येथें रहा; घर तुझें आहे.

याप्रमाणें ते बोलत आहेत तों चित्रांग नांवाचा एक हरिण पारध्याच्या भयानें पळून तेथें आला. त्यास पाहून हिरण्यक बिळांत गेला. लघुपतनक झाडावर चढला, आणि मंथरक पाण्यांत गेला. हा निरुपद्रवी हरिण आहे असें पाहून लघुपतनक हिरण्यकास ह्मणाला, ये मित्रा, हा हरिण तान्हेनें व्याकुळ होऊन पाणी पिण्यास येथें आला आहे.

**मंथरक**—अरे, हा कावराबावरा होऊन वारंवार मागें पहातो, यावरून तान्हेनें व्याकुळ झाल्यामुळें पळत येऊन दमल्यामुळें धापा टाकीत आहे असें वाटत नाहीं. हा पारध्यांस भिऊन पळाला असावा, पाठीमागून पारधी येत आहेत किंवा नाहींत तें पहा.

हें ऐकून चित्रांग ह्मणाला, मन्थरका, तुझें म्हणणें बरोबर आहे. मी पारध्यांला भिऊन मोठ्या संकटानें सुटून येथें पळून आलों. माझ्या कळपांतील सगळीं हरणें बहुतकरून त्यांनीं मारिलीं असतील. मी तुम्हांस शरण आलों आहें, याकरितां मी पारध्यांच्या हातीं लागणार नाहीं, अशी एकादी जागा मला लपण्यास दाखवाल तर बरें होईल.

**मंथरक**—अरे, असें असेल तर पारधी आले नाहींत तों दाट झाडी असेल तेथें लवकर पळून जा.

हें ऐकून लघुपतनक झाडावरून म्हणाला, मन्थरका, ते दुष्ट पारधी पुष्कळ मांस मिळाल्यामुळें घरीं गेले. चित्रांगा, आतां तूं येथेंच स्वस्थ रहा.

नंतर ते चौघेही मोठ्या प्रेमानें वागून तेथें सुखानें राहूं लागले. दुपारच्या वेळीं चौघेही सरोवराच्या कांठीं झाडाच्या सावलींत बसून गोष्टी सांगत असत. याप्रमाणें कांहीं काळ गेल्यावर एके दिवशीं हरिण आला नाहीं तेव्हां ते मोठ्या काळजींत पडले. अहो, आज आपला मित्र चित्रांग आला नाहीं. त्यास सिंहानें अथवा वाघानें अथवा पारध्यानें मारिलें किंवा तो वणव्यांत सांपडला, अथवा कोंवळ्या गवताच्या आशेनें एखाद्या खड्ड्यांत पडला असावा, असें आपसांत बोलूं लागले. नंतर मंथरक कावळ्यास ह्मणाला, लघुपतनका, हिरण्यक आणि मी दोघेही अशक्त. आह्मांस त्याचा शोध करितां येणार नाहीं. याकरितां तू रानांत फिरून कोठें जिवंत असल्यास शोधून काढ. नंतर लघुपतनक त्यास पाहण्यास गेला तेव्हां, जवळच पाण्याच्या एका डबक्यापाशीं फांसांत पडलेला चित्रांग त्याच्या दृष्टीस पडला. त्यास पाहून दुःखानें लघुपतनक त्यास म्हणाला, मित्रा, हें काय?

**चित्रांग**—( डोळ्यांत अश्रु आणून ) मित्रा, मृत्युपाशांत सांपडलों. शेवटीं तुझी भेट झाली एवढें तरी बरें झालें. आतां आजपर्यंत कांहीं कमजास्त बोललों असलों तर क्षमा कर. आणि हिरण्यक व मंथरक यांसही सांग कीं, समजून न समजून मीं तुमचें कांहीं वाईट केलें असलें तर क्षमा करा.

**लघुपतनक**—मित्रा, आमच्यासारखे मित्र असल्यावर भिण्याचें कारण नाहीं. मी हिरण्यकास लवकरच घेऊन येतों. असें ह्मणून मंथरक आणि हिरण्यक यांकडे जाऊन त्यानें चित्रांगाचें वर्तमान सांगितलें. हिरण्यकाचा चित्रांगास सोडविण्याविषयीं निश्चय पाहून त्यास पाठीवर घेऊन पुनः चित्रांगाकडे आला. हिरण्यकास पहातांच हा आपला फांस तोडील असें वाटून चित्रांगास जरा अवसान आलें. तो हिरण्यकास ह्मणाला, मित्राशिवाय संकटांतून कोण तारील?

**हिरण्यक**—अरे तू मोठा हुशार असून असा कसा फसलास?

**चित्रांग**—गोष्टी सांगत बसण्याची ही वेळ नाहीं. तो दुष्ट पारधी आला नाहीं तोंच एवढा फांस तोडून टाक.

**लघुपतनक**—हिरण्यक आणि मी असल्यावर त्यापासून काय भय आहे? ही तुझी अवस्था पाहून मला असें वाटूं लागलें आहे कीं, शास्त्र पढून तरी काय उपयोग?

**चित्रांग**—दुर्दैव प्राप्त झालें ह्मणजे शास्त्राचा कांहीं उपयोग होत नाहीं. कपाळीं असेल तें चुकवितां येत नाहीं.

ते असें बोलत आहेत तों मित्राच्या दुःखानें दुखित झालेला मंथरक हळुहळू सरपटत तेथें आला. त्यास पाहून लघुपतनक हिरण्यकास ह्मणाला, अहो हें चांगलें नाहीं.

**हिरण्यक**—पारधी आला काय ?

**लघुपतनक**—पारधी असो, आधीं हा मंथरक आला. यानें वेडेपणा केला. पारधी आला तर याचा नाश होईल. मी उडून जाईन, तू बिळांत जाशील, चित्रांग पळून जाईल, पण याचें कसें होईल? हीच मला काळजी लागली आहे.

**हिरण्यक**—मंथरका, येथें आलास हें त्वां चांगलें केलें नाहीं. आतां तरी पारधी आला नाहीं तोंच लवकर निघून जा.

**मंथरक**—तेथें राहून काय करूं? मित्राशिवाय मला चैन पडेना ह्मणून आलों.

ते असें बोलत आहेत तोंच हातीं तिरकमठा घेऊन पारधी तेथें आला. त्यास पाहतांच उंदिरानें फांस तोडिला. लागलींच चित्रांग पळून गेला, कावळा झाडावर चढला, हिरण्यक जवळच्या बिळांत शिरला. हरिण पळाला, हें पाहून पारध्यास फार वाईट वाटलें. इतक्यांत कांसव त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां तो आपणाशीं ह्मणाला, देवानें हरिण नेला, पण हा कांसव तरी खावयास दिला. आज यावरच पोरेंबाळें निर्वाह करतील. असें ह्मणून त्याला गवतांत गुंडाळून तीरकमठ्यावर बांधून तो घराकडे चालला. मथंरकाची ही दशा पाहून हिरण्यक म्हणाला, शिवशिव! काय झालें हें!! एक दुःख कमी झालें तोंच दुसरें येऊन ठेपलें! दैव फिरलें ह्मणजे एकामागून एक संकटें येऊं लागतात. मंथरकासारखा मित्र मिळणार नाहीं. इतक्यांत लघपतनक व चित्रांग त्याजवळ येऊन तेही शोक करूं

लागले, त्यांस हिरण्यक ह्मणाला, व्यर्थ शोक करून काय उपयोग? तो दिसत आहे तोंपर्यंत त्यास सोडविण्यास कांहीं तरी उपाय करावा.

**लघुपतनक**—मी ह्मणतों असें करावें. चित्रांगानें पारध्याच्या वाटेवरील डबक्याजवळ मेल्याचें सोंग घेऊन पडावें, मी त्याच्या डोक्यावर बसून हळूच त्याचे डोळे चोचकल्यासारखे करीन. हरिण मेला असें समजून मंथरकास खालीं ठेवून पारधी धांवतच हरिणाकडे येईल. इतक्यांत त्वां तीरकमठ्याजवळ जाऊन मंथरकास गवतांत बांधून ठेविलें आहे ते बंद तोडून टाकावे ह्मणजे तो डबक्यांतल्या पाण्यांत शिरेल.

**चित्रांग**—मसलत तर फार चांगली आहे. असें झालें तर मंथरक सुटलाच ह्मणून समजा.

संकेताप्रमाणें केल्यावर चित्रांगास मेलेला पाहून पारधी मोठ्या हर्षानें ह्मणाला, हा हरिण फांसांतून सुटून पळतां पळतां पडून मेला असावा. कांसव तर सांपडलाच आहे, यालाही घेऊन जावें. असें ह्मणून तिरकमठा खालीं ठेवून हरिणास आणावयास गेला. इतक्यांत हिरण्यकानें गवताचे बंद तोडतांच मंथरक पाण्यांत शिरला. पारधी जवळ येण्यापूर्वींच चित्रांग आणि लघुपतनक पळून गेले. हरिण पळाल्यानें दुःखित होऊन पारधी परत आला, तों तेथें कांसवही नाहीं; असें पाहून निराश होऊन नशीबास दोष देत घरीं गेला. तो दूर गेल्यावर कावळा, कांसव, हरिण आणि उंदीर, पुनः एकठिकाणीं जमून आनंदानें एकमेकांस भेटले, आणि पूर्वीप्रमाणें सुखानें राहूं लागले

## तात्पर्य.

संसारांत अनेक दुःखें व संकटें मनुष्यांस प्राप्त होतात. कोणी कितीही मोठा समर्थ असला तरी त्यास कधीं तरी दुसऱ्याची गरज लागेलच लागेल. संकटें अनेक प्रकारचीं येतात, त्यांतून पार पडण्यास कधीं विद्या उपयोगीं पडते, कधीं शौर्य उपयोगीं पडतें, कधीं नुसत्या मसलतीनेंच काम होतें. एकाच्या आंगीं सर्व गोष्टी असणें कठिण. याकरितां अनेक मित्र असले ह्मणजे कोणीना कोणी तरीं प्रसंगीं उपयोगीं पडतोच. प्रसंगीं उपयोग होण्याकरितां आपण मित्र मिळवितों, त्याप्रमाणें आपणही मित्रांवर संकट आलें असतां कायावाचामनेंकरून त्यांस साहाय्य करण्यास झटलें पाहिजे. केवळ एकपक्षीं स्नेह

असतो तो खरा स्नेह नव्हे. प्रसंगीं उपयोगीं पडणें एवढाच मित्राचा उपयोग आहे असें नाहीं. सर्व संपत्ति असून मनुष्यास मित्र नसेल तर तिजपासून कांहीं एक सुख व्हावयाचें नाहीं. संसारांत सत्समागम आणि सन्मित्र या दोन अमोलिक चिजा आहेत, असें सर्व काळीं सर्व देशांतील लोक ह्मणत आले आहेत. मित्रत्वाचा महिमा वर्णावा तेवढा थोडाच. मित्र असावे ह्मणून पाहिजे त्याशीं स्नेह करून उपयोगीं नाहीं. जे सज्जन, उदार मनाचे, नीतिमान्, दयाळु अशांशींच स्नेह करावा. ह्मणजे मित्रत्वाचें खरें सुख प्राप्त होईल.

समाप्त.